# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# स्थानिक इतिहासातील संकल्पना आणि पद्धत
## (Concept and Method of Local History)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-३**

**इतिहास**

Major Elective : ME 7

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
एम. ए. भाग - २ करिता (स्थानक इतिहासातील संकल्पना आणि पद्धती)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-93-48427-92-2

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अ‍ॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**स्थानिक इतिहासातील संकल्पना आणि पद्धत**'' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०२४-२५ या वर्षात तयार केले. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**स्थानिक इतिहासातील संकल्पना आणि पद्धत** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये स्थानिक इतिहास म्हणजे काय?, नवे विचारप्रवाह, स्थानिक इतिहासाचे स्त्रोत, स्थानिक इतिहासातील पुराभिलेखीय संशोधन इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष प्रा. डॉ. चंद्रवदन नाईक आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

■ **संपादक** ■

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,

दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | १, ४ |
| **डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील**<br>मिरज महाविद्यालय, मिरज | २ |
| **डॉ. प्रमोद ओलेकर**<br>आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, आष्टा,<br>ता. वाळवा, जि. सांगली | ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका



| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्थानिक इतिहास म्हणजे काय? | १ |
| २. | नवे विचारप्रवाह | ४७ |
| ३. | स्थानिक इतिहासाची साधने | ६९ |
| ४. | स्थानिक इतिहासातील पुराभिलेखीय संशोधन | ९२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# स्थानिक इतिहास म्हणजे काय

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ संकल्पना (Concept)

  १.२.२ स्वरूप (Nature)

  १.२.३ उद्देश आणि महत्व (Purpose and Importance)

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणांस;

- स्थानिक इतिहास म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.
- स्थानिक इतिहासाची संकल्पना सांगता येईल.
- स्थानिक इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- स्थानिक इतिहासाचे उद्देश स्पष्ट करता येतील.
- स्थानिक इतिहासाचे महत्व सांगता येईल.
- स्थानिक इतिहासाचे महत्व व विविध घटक सांगता येतील.

## १.२ विषय विवेचन

इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी

संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहास आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची आंतरविद्याशाकीय (Interdisciplinary) मांडणी होवू पाहत आहे. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी (Macro History) इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी (Micro History) इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. स्थानिक ते वैश्विक (Local to Global) आणि वैश्विक ते स्थानिक (Global to Local) असा सर्वस्पर्शी इतिहास आविष्कृत होत आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोणातून लिहीलेला असतो. यामध्ये मुख्य वर्ण विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप, उदर निर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ठ असतो. स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषत: स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रीत करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोणातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. प्रस्तुत स्थानिक इतिहास म्हणजे काय, त्यांची संकल्पना, स्वरूप, उद्देश आणि महत्त्व याचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ संकल्पना: (Concept)

इतिहास म्हणजे गाडलेले मुडदे उकरून काढणे, इतिहास म्हणजे राजा आणि राणी, इतिहास म्हणजे युद्ध, इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, इतिहास म्हणजे नेत्यांची चरित्र असा एक समज सर्व सामान्याच्यामध्ये आहे. इतिहासकार 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' या विधांनावरती श्रद्धा ठेवत असल्याने ते या परीघाच्या बाहेर पाहावयास तयार नव्हते आणि नाहीत. इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जे-जे घडले ते-ते लिहणे अथवा पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या सहाय्याने कागदपत्रात ज्या घटनांचे प्रतिबिंब उमटले आहे त्याची मांडणी करण्याची संकल्पना रूढ होती. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे-राजवाडे, युद्ध, घटना व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा हा प्रकार जोमत सुरू होता. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये जतन करून ठेवलेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगतात हा प्रश्न त्याकाळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता

इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) मांडणी होवू पाहत आहे. ॲनाल्स परंपरा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाकीय मांडणी अधिक बळकट झाली. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी (Macro History) इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी (Micro History) इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. यातून 'स्थानिक इतिहासलेखन' परंपरा अथवा पद्धती विकसित झाली. स्थानिक इतिहास लेखन हे ॲनाल्स परंपरेचे फलित आहे. सद्य स्थितीत जगभरात स्थानिक इतिहासलेखन परंपरेला चालना मिळालेली आहे.

**१) स्थानिक इतिहास म्हणजे काय?**

स्थानिक इतिहास हा प्रामुख्याने खेडे, ग्राम, वाडी, पाडी, शहर, तालुका अथवा जिल्हा यासारख्या भौगोलिकदृष्ट्या मर्यादित क्षेत्राच्या इतिहासाशी संबंधित आहे. स्थानिक इतिहास प्रामुख्याने विशिष्ट परिसरांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकाशी निगडीत आहे. स्थानिक इतिहास हा प्रामुख्याने स्थानिक संदर्भ साधने, कागदपत्रे व इतर संसाधने वापरून लिहिला जातो. स्थानिक इतिहास हा केवळ राष्ट्रीय इतिहासाचा छोटासा भाग नसून विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील भूतकाळातील घटनांचा अभ्यास आहे जो विविध प्रकारच्या स्थानिक कागदोपत्री पुराव्यांवर आधारित आहे. स्थानिक इतिहासाचा अभ्यास प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्थरावरील तुलनात्मक संदर्भात केला जातो.

जगभरात ग्राम, नगर, शहर, महानगरांचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे. शहराचे प्राचीनत्व सांगणाऱ्या दंतकथा, शहर स्थापनेचा इतिहास, जडणघडण, विकास, ऱ्हासासांबंधीची स्थिती, एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेली नगरांची स्थिती, त्यात कालानुरूप होत जाणारे बदल, स्थित्यंतरे, युद्धकालीन बदलले गेलेले स्थानिक प्रदेश इत्यादी गावाच्या सीमा बदलत जातात, भौगोलिक परिस्थितीचा परिणाम सतत होतो. स्थानिक, प्रादेशिक स्तरांवरचे बदल हे वेगवेगळे असतात. राष्ट्रीय पातळीवर स्थानिक स्तरावरच्या सर्वच बदलांना इतिहासलेखनात स्थान देणे शक्य नसते. भारतासारख्या विभिन्न व खंडप्राय देशांमध्ये प्रत्येक राज्याची विविधता आहे. आधुनिक युगात प्रादेशिक व स्थानिक ऐतिहासिक घटनांचे समग्रपणे अध्ययन करणे, स्थानिक इतिहास या लेखन संकल्पनेमुळे शक्य झाले आहे. या सर्व पैलूंमुळे नवी ऐतिहासिक जाणीव व नवी दृष्टी विकसित झालेली आहे. अशाप्रकारे सांस्कृतिक इतिहास समृद्ध झाला आहे. सामान्य लोकांना शहरांच्या ऐतिहासिक वारशाची जिज्ञासा असते. शहराचे वाटणारे कौतुक, शहरांच्या देदीप्यमान इतिहासाची आठवण जागृत करणारे प्रसंग, शहरस्थापनेमागील विचार, परंपरांचा समावेश होतो. विविध कालखंडामधील त्या शहरांमध्ये, गावांमध्ये झालेला बदल, विकास, ऱ्हास, स्थित्यंतरे यांचा विज्ञानात्मक दृष्टीने घेतलेला ऐतिहासिक आढावा व मागोवा स्थानिक इतिहासामध्ये अंतर्भूत होतो. सामाजिक चळवळींमधील ग्रामस्थांनी घेतलेला सहभाग, स्थानिक-धार्मिक तीर्थक्षेत्रे, दंतकथा, लोककथा, आख्यायिका, सण, उत्सव, परंपरा या सर्व पैलूंचा अभ्यास स्थानिक इतिहास या विद्याशाखेमध्ये केला जातो.

## २) स्थानिक इतिहासाची व्याख्या:

स्थानिक इतिहासाची व्याख्या अनेक इतिहास संशोधक, इतिहासकारांनी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्थानिक इतिहास म्हणजे नेमके काय याचा अर्थबोध होणयास मदत होते. स्थानिक इतिहासाचे अनेक पैलू आपणास यामधून प्राप्त होतात.

**जॉन रॉजर्स:**

इतिहास संशोधक जॉन रॉजर्स यांनी त्यांच्या 'Local History: A Handbook for Enthusiasts' या ग्रंथात स्थानिक इतिहासाची व्याख्या करताना ते म्हणतात की, ''स्थानिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्राच्या भूतकाळाचा अभ्यास, जसे की गाव, शहर, किंवा प्रदेश, ज्यामध्ये तेथे राहणाऱ्या लोकांचे अनुभव आणि दृष्टीकोन यावर भर दिला जातो.'' रॉजर्स यांनी स्थानिक इतिहासाची व्याख्या करताना खालील प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकलेला आहे, स्थानिक इतिहास एका विशिष्ट परिभाषित भौगोलिक क्षेत्रावर केंद्रित आहे. स्थानिक इतिहास स्थानिक लोकांच्या कथा, दृष्टीकोन आणि स्थानिक अनुभवांना प्राधान्य देतो. स्थानिक इतिहासामध्ये केवळ अभिजनवादी अथवा उच्चभ्रू लोकांचाच नाही तर समाजातील सर्व स्तरातील सर्वसमावेशक दृष्टीकोन समाविष्ट करतो. रॉजर्स यांचा ग्रंथ स्थानिक इतिहासाचे संशोधन आणि लेखन करण्यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शन करतो. याशिवाय स्थानिक दृष्टीकोन आणि अनुभवांच्या महत्त्वावर जोर देतो. रॉजर्स यांचा ग्रंथ संशोधकांना स्थानिक समाजाच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण घटना अथवा कथांचे संशोधन करण्यास प्रोत्साहित करतो.

**रॉबर्ट स्टिफलर:**

इतिहास संशोधक रॉबर्ट स्टिफलर यांनी त्यांच्या 'Local History: A Guide to Research, Writing, and Publishing' या ग्रंथात स्थानिक इतिहासाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे: ''स्थानिक इतिहास हा एखाद्या विशिष्ट ठिकाणाच्या भूतकाळाचा अभ्यास आहे, ज्यामध्ये लोक, घटना आणि सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक घडामोडींचा समावेश आहे ज्याने त्या ठिकाणाला कालांतराने आकार दिला आहे.''

**शेरॉन स्लेटर:**

शेरॉन स्लेटर यांनी त्यांच्या 'Local History: A Study of the Past in Your Own Community' या ग्रंथात स्थानिक इतिहासाची व्याख्या करताना ते असे म्हणतात की, ''स्थानिक इतिहास म्हणजे तुमच्या स्वत:च्या समाजातील भूतकाळाचा अभ्यास, तिथे राहणाऱ्या लोकांचे अनुभव, परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि त्यांनी त्या ठिकाणाला त्याची ओळख कशी घडवली याचा शोध घेणे.'' स्लेटर यांची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या खालील पैलूंवर सखोलपणे प्रकाश टाकते. त्यांच्या मते स्थानिक इतिहास समाज आणि त्याच्या लोकांवर लक्ष्य केंद्रीत करतो. स्थानिक इतिहास स्थानिक लोकांच्या अनुभवांवर आणि परंपरांवर भर देतो. स्थानिक इतिहास समाजाचा सांस्कृतिक वारसा आणि ओळख मानतो.

स्थानिक इतिहास भूतकाळाने त्या समाजाची ओळख आणि त्या स्थानाची भावना कशी आकारली आहे हे शोधून काढतो. स्लेटर यांचा ग्रंथ स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक आहे. जसे की स्थानिक इतिहास संशोधन कसे सुरू करावे, स्थानिक साधने आणि संग्रहणांचा शोध घेणे, तोंडी इतिहास आणि मुलाखती आयोजित करणे, आणि स्थानिक इतिहासाच्या घटनांचा निष्कर्ष व अर्थ लावणे आणि तो सादर करणे. स्लेटर समाज आणि सांस्कृतिक वारशाच्या महत्त्वावर जोर देऊन, संशोधकांना स्थानिक समाजाच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण कथा आणि त्यांच्या स्थानाची भावना शोधण्यास करण्यास प्रोत्साहित करतात.

**जे. सी. प्राइसः**

जे. सी. प्राइस यांनी त्यांच्या 'Local History of Bengal' या ग्रंथामध्ये, स्थानिक इतिहासाची व्याख्या खालीलप्रमाणे केलेली आहे; ''स्थानिक इतिहास हा एखाद्या विशिष्ट ठिकाणाचा इतिहास आहे, अथवा देशाचा एक छोटासा भाग, ज्यामध्ये घटना, संस्था आणि तेथे राहणाऱ्या लोकांच्या चालीरीती आणि जिल्ह्याची नैसर्गिक वैशिष्ट्ये यांचा समावेश होतो.'' प्राइस यांची स्थानिक इतिहासाची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकते, यामध्ये स्थानिक इतिहास एका विशिष्ट, परिभाषित भौगोलिक विशिष्टता क्षेत्रावर लक्ष केंद्रित करतो (उदा. बंगाल). स्थानिक इतिहासामध्ये घटना, संस्था, प्रथा आणि नैसर्गिक वैशिष्ट्यांसह भूतकाळातील विविध पैलूंचा समावेश होतो. स्थानिक इतिहास स्थानिक लोकसंख्येच्या अद्वितीय वैशिष्ट्यांचा आणि अनुभवांचा विचार करतो. प्राइस यांचा ग्रंथ स्थानिक इतिहासातील एक अग्रगण्य कार्य मानले जाते, जे भविष्यातील संशोधकांसाठी विशेषत: भारतातील विशिष्ट भौगोलिक अथवा स्थानिक प्रदेशांच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण घटनांचा शोध घेण्याचा एक आदर्श आहे. प्राइस यांची व्याख्या आणि दृष्टीकोन स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील गुंतागुंत आणि बारकावे समजून घेण्याच्या महत्त्वावर जोर देते, जे आजही प्रासंगिक आहे.

**नंदिनी गुप्तू:**

नंदिनी गुप्तू यांनी स्थानिक इतिहासाची व्याख्या करताना म्हणतात की, ''स्थानिक इतिहास विशिष्ट स्थानिक अनुभव, परंपरा आणि विशिष्ट प्रदेश अथवा समाजाच्या सांस्कृतिक पद्धतींना संदर्भित करतो, जो त्यांच्या अद्वितीय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भाने आकारला जातो आणि व्यापक ऐतिहासिक शक्ती आणि ताकद गतिशीलतेने प्रभावित होतो.'' गुप्तू यांची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या खालील प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकते; स्थानिक इतिहास स्थानिक लोकांच्या दैनंदिन अनुभवांवर आणि परंपरांवर लक्ष केंद्रित करतो. स्थानिक इतिहास हा विशिष्ट प्रदेश अथवा समाजाच्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भाद्वारे आकारला जातो. स्थानिक इतिहास स्थानिक समाज आणि बाह्य शक्ती, जसे की वसाहतवाद यांच्यातील शक्ती संबंधांवर प्रभाव पाडतो. स्थानिक इतिहास म्हणजे स्थानिक आणि जागतिक यांच्यातील परस्परसंवाद आहे. स्थानिक समाजाने वसाहतवादी शक्तींना कसा प्रतिसाद दिला आणि त्याचा कसा प्रतिकार केला याचे महत्व कथन करतो. स्थानिक इतिहासाची त्यांची व्याख्या ऐतिहासिक अनुभवांना आकार

देण्यासाठी स्थानिक संदर्भ आणि शक्तीची गतिशीलता (power dynamics) समजून घेण्याच्या महत्त्वावर जोर देते.

**डी. एन. झा:**

डी. एन. झा यांनी त्यांच्या 'Society and Ideology in India' या ग्रंथात स्थानिक इतिहासाची व्याख्या अशी केली आहे, ''स्थानिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या किंवा परिसराच्या भूतकाळाचा अभ्यास करणे, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रक्रियांवर लक्ष केंद्रित करणे ज्याने तेथील लोकांच्या जीवनाला आकार दिला आहे आणि स्थानिक समाज आणि संस्कृतींनी ज्या मार्गांनी संवाद साधला आहे ते शोधणे, आणि व्यापक प्रादेशिक आणि जागतिक शक्तींचा प्रभाव पाहणे.'' झा यांची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या खालील प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकते; स्थानिक इतिहास स्थानिक समाज आणि संस्कृतींच्या अनुभवांना आणि दृष्टीकोनांना प्राधान्य देतो. स्थानिक इतिहासामध्ये स्थानिक समाजांनी व्यापक प्रादेशिक आणि जागतिक शक्तींशी कसा संवाद साधला आणि त्यांचा प्रभाव कसा पडला याचा विचार केला जातो. स्थानिक इतिहास, स्थानिक समाज आणि संस्कृतींच्या गुंतागुंतीची आणि गतिशील स्वरूपाची सूक्ष्म समज प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. झा यांचा ग्रंथ दक्षिण भारताच्या सामाजिक इतिहासाचे संशोधन करते, स्थानिक समाज, संस्कृती, व्यापक प्रादेशिक आणि जागतिक शक्ती यांच्यातील अतिशय गुंतागुंतीच्या परस्परसंवादांचे परीक्षण करते. स्थानिक इतिहासाची त्यांची व्याख्या ऐतिहासिक घटनांना आकार देण्यासाठी स्थानिक संदर्भ आणि अनुभव समजून घेण्याच्या महत्त्वावर जोर देते.

**दीपेश चक्रवर्ती:**

दीपेश चक्रवर्ती यांनी त्यांच्या 'Rethinking Working-Class History' (reexamining working-class history in India) या ग्रंथामध्ये स्थानिक इतिहासाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे; ''स्थानिक इतिहास हा उपेक्षित, गौण आणि वंचितांचा इतिहास आहे, जो मुख्य प्रवाहातील ऐतिहासिक घटनांच्या परिघावर सोडला गेलेला आहे. हा एक इतिहास आहे जो प्रबळ ऐतिहासिक चर्चेमुळे मूक, दुर्लक्षित किंवा दडपलेल्या लोकांचे आवाज, अनुभव आणि दृष्टीकोन पुनर्प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.'' चक्रवर्ती यांची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या खालील प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकते: स्थानिक इतिहास उपेक्षित, गौण आणि वंचित गटांच्या अनुभवांना आणि दृष्टीकोनांना प्राधान्य देतो. स्थानिक इतिहास प्रबळ ऐतिहासिक वर्णन अथवा लिखाणाला आव्हान देण्याचा आणि ते नष्ट करण्याचा प्रयत्न करतो, ज्यांनी उपेक्षित आवाजांना शांत केले आहे किंवा दुर्लक्ष केले आहे. स्थानिक इतिहासाचा उद्देश ज्यांना दाबले गेले किंवा दुर्लक्ष केले गेलेले त्यांचे आवाज आणि अनुभव पुनर्प्राप्त करणे आणि वाढवणे हा आहे. स्थानिक इतिहास हा विशिष्ट स्थानिक संदर्भ आणि शक्तीच्या गतिशीलतेचा विचार करतो ज्याने उपेक्षित गटांच्या जीवनाला आकार दिला आहे. स्थानिक इतिहास स्थानिक समाज आणि संस्कृतींचे गुंतागुंतीचे आणि सूक्ष्म स्वरूप समजून घेण्यासाठी एक गंभीर दृष्टीकोन स्वीकारतो. चक्रवर्ती यांचा ग्रंथ भारतातील कामगार वर्गाच्या इतिहासाचे पुनर्परीक्षण करतो, उपेक्षित गटांच्या अनुभवांवर आणि दृष्टीकोनांवर लक्ष केंद्रित करतो आणि

प्रबळ ऐतिहासिक घटनांना आव्हान देतो. स्थानिक इतिहासाची त्यांची व्याख्या वंचितांचा आवाज आणि अनुभव पुनर्प्राप्त (recovering and amplifying subaltern voices) करण्याच्या आणि वाढवण्याच्या महत्त्वावर जोर देते.

**डी. डी. कोसंबी:**

डी. डी. कोसंबी यांनी त्यांच्या 'Myth and Reality' ग्रंथामध्ये स्थानिक इतिहासाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते म्हणतात की, ''स्थानिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या किंवा परिसराच्या विकासाचा अभ्यास, भौगोलिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांच्या जटिल परस्परसंवादाचा विचार करून, ज्याने तेथील लोकांच्या जीवनाला आकार दिला आहे, आणि स्थानिक परंपरांचे मार्ग शोधणे, पौराणिक कथा आणि दंतकथा ऐतिहासिक प्रक्रियांना प्रतिबिंबित करतात आणि प्रभावित करतात.'' कोसंबी यांची व्याख्या स्थानिक इतिहासाच्या खालील प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकते; स्थानिक इतिहास भौगोलिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन विचार करतो. स्थानिक इतिहास स्थानिक परंपरा, पौराणिक कथा आणि दंतकथा यांच्या अभ्यासाला प्राधान्य देतो. स्थानिक इतिहास हे समजून घेण्याचा प्रयत्न करतो की स्थानिक घटकांनी ऐतिहासिक प्रक्रियांवर कसा प्रभाव टाकला आहे. स्थानिक इतिहास मूलभूत ऐतिहासिक वास्तविकता उघड करण्यासाठी स्थानिक मिथक आणि दंतकथांचे गंभीरपणे परीक्षण करतो. कोसंबी यांचा ग्रंथ भारतीय पौराणिक कथा आणि इतिहासाचा शोध घेतो, स्थानिक परंपरा, मिथक आणि ऐतिहासिक प्रक्रिया यांच्यातील गुणतागुंतीच्या संबंधांचे परीक्षण करतो. स्थानिक इतिहासाची त्यांची व्याख्या स्थानिक संदर्भ समजून घेण्याच्या महत्त्वावर आणि ऐतिहासिक घटनांना आकार देण्यासाठी विविध घटकांच्या परस्पर संवादावर भर देते.

**डॉ. राजा दिक्षित:**

डॉ. दिक्षित यांनी प्रादेक्षिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे हे म्हणतात की, ''इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो, त्यातील अनेकदा दुर्लक्ष्क्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय.''

**३) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना:**

इतिहासलेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले दिसतात. यामध्ये अलिकडील काळात विशेष प्रसिध्दीत आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे 'स्थानिक इतिहास' अथवा 'स्थानीय इतिहास' हा होय. स्थान म्हणजे ठिकाण किंवा स्थानिक म्हणजे मूळचा म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास. डॉ. अरुण टिकेकर यांनी 'स्थानिक इतिहास' (Local History) ऐवजी 'स्थानीय इतिहास' (Localised History) असा मराठी शब्दप्रयोग केलेला आहे. वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. युरोपात उदयाला आलेल्या या शाखेने इतिहासात मोलाची भर घातली आहे.

इतिहासाची भौगोलिक निकषांवर केली गेलेली विभागणी किंवा भूगोलाधारित इतिहास म्हणजे स्थानिक इतिहासलेखन. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. स्थानिक इतिहासात गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. भारतातील प्रत्येक गावाला स्वत:चा असा एक इतिहास, स्वत:ची अशी एक संस्कृती आहे. भारतामध्ये ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहीलेला आहे. प्राचीन काळी आपल्याकडे जी 'स्थलमहात्म्य' होती त्याचाच हा आधुनिक व शास्त्रीय अवतार आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणाऱ्या व्यक्तीला स्थानिक अथवा गावकरी म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ठ नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना, ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय असे बहुविध पैलू स्थानिक इतिहात लक्षात घेतले जातात. या प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे विचार केला गेला असला तरीही हे सारे घटक आतून एकमेकांशी जोडलेले असतात. यासंबंधी डॉ. अरूण टिकेकर म्हणतात की, ''हा एका अर्थाने भूतकाळात रमू पाहणार्याचा छंद. आपल्या गावाचा वा शहराच्या तसंच त्या शहरातील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणं ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक, तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतीबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पडकण्यावर स्थानीय इतिहासकाराचे यश अवलंबून असते'' एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील केवळ घटनांची जंत्री नसून ती एक चिकित्सक, अन्वयार्थी, सैद्धान्तिक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देणारी स्वतंत्र शाखा आहे. डॉ. अरुण टिकेकर लिहितात, 'हा ग्रंथ साकार करण्यासाठी इतिहास शाखांतील तुलनेनं सर्वांत नव्या म्हणता येईल, अशा 'स्थानीय इतिहास' या संकल्पनेचा वापर केला आहे. ही संकल्पना नवीन असली, तरी जुन्या काळातील अनेक लेखकांनी शहरांविषयी म्हणजे सांस्कृतिक केंद्राविषयी लिहिताना अनुभवली आहे. आपल्या गावाविषयी आणि गावकऱ्यांविषयी प्रेम वाटणं, जिव्हाळा वाटणं ही स्वाभाविक भावना असल्यामुळे तो प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो. 'स्थानीय इतिहासकार' त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी जोडलेल्या व्यक्ती यांच्या आधारे शब्दबद्ध करतो. कधी स्वत:च्याच स्मरणातून, तर कधी इतरांना बोलकं करून त्यांच्याकडून वदवून घेतलेल्या 'मौखिक' इतिहासाच्या रूपात. 'स्थानीय इतिहास' ही देखील ग्रामचीच्याच औधत्यपूर्ण आव्हानातून उमललेली आणि इतिहास लेखनाच्या पुनर्विचारातून प्रकटलेली संकल्पना असल्याचं मानता येतं. सांस्कृतिक केंद्र असलेल्या नगराचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वैचारिक असे आलेख काढले गेले आणि अशा अनेक सांस्कृतिक केंद्रांच्या व्यापक व सर्वांगीण इतिहासाच्या साह्यानं सर्व देशाचा इतिहास लिहिला गेला, तर तो निश्चितच समृद्ध व सर्व समाजघटकांना न्याय देणारा असणार, ही कल्पना पुढे आली आणि त्यातूनच स्थानीय इतिहासाची संकल्पना दृढ झाली. एखाद्या शहराचा स्थानीय इतिहास म्हणजे त्या शहराचा व्यापक अर्थाने लिहिलेला सामाजिक व सांस्कृतिक इतिहास. इतिहासरूपी अस्थींच्या सांगाड्याला ऐतिहासिक उदाहरणांच्या

साह्यानं रक्त-मांस चढवून तो सजीव करण्याचा प्रयत्न स्थानीय इतिहास लेखनात असतो. सर्वांगीण इतिहास म्हणजे बहुशाखीय इतिहास हे स्थानीय इतिहासाचं लक्ष्य असल्यामुळे पारंपरिक ऐतिहासिक साधनांबरोबर चित्रं-छायाचित्रं; अशा अपारंपरिक साधनांचा उपयोगही स्थानीय इतिहासात केला जातो. म्हणून स्थानीय इतिहास लेखक, पुरातत्त्व संशोधक, भूगोलतज्ज्ञ, भूगर्भतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलेइतिहासतज्ज्ञ, वाङ्मयेतिहासतज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका करत असतो. स्थानीय इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नाही. अगदी पेहेरावातील फॅशन्सपासून आहारातील रूचीवैचित्र्यापर्यंत सर्व विषयांचा यथायोग्य वापर स्थानीय इतिहासासाठी होऊ शकतो.' थोडक्यात एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रीत राहून त्या स्थानाचे इतिहास लेखनकरणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

### ४) स्थानिक इतिहासलेखन संकल्पनेचा उदय व विकास:-

'स्थानिक इतिहास' ही आधुनिक संकल्पना आहे. पारंपरिक इतिहासलेखन करणारे इतिहासकार प्रारंभी या इतिहास प्रकाराला मान्यता देत नसत. स्थानिक इतिहास लेखनाचा उदय आणि विकास पाश्चिमात्य देशांमध्ये १८ व्या शतकात सापडतो. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स आदि देशामध्ये स्थानिक उच्चभ्रू लोक स्थानिक परंपरांच लिखाण करत असत. १९ व्या शतकापर्यंत स्थानिक इतिहासलेखनाच्या प्रक्रियेमध्ये अनेक स्थानिक संस्था उदयाला आल्या. युरोपमध्ये घडून आलेल्या औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर आणि शहरीकरणाला प्रोत्साहित केले. विविध सामाजिक घटकांना त्यांच्या हरवलेल्या ओळखीबद्दल पुनर्विचार करण्यास आणि ते जतन करण्याचे मार्ग शोधण्यास प्रवृत्त केले. परिणामस्वरूप स्थानिक सुशिक्षित लोकांच्यामध्ये स्थानिक अथवा प्रादेशिक इतिहास नोंदवून ठेवण्याची वृती वाढीस लागली.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात असे स्थानिक इतिहास-लेखकांचे अनेक गट उदयास आलेले होते, त्यांनी त्यांच्या स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला सक्रियपणे प्रोत्साहन दिले. विशेषत: प्रारंभीच्या काळात स्थानिक इतिहास लेखनात स्थानिक चर्च आणि चर्च समुदायाच्या इतिहासाचा समावेश होता. विशेषत: अज्ञात पुरातत्व स्थळांवरील कलाकृतींच्या शोधाबद्दलाच्या अहवालांचा समावेश होता. स्थानिक उच्चवर्गाने त्यांची सार्वजनिक प्रतिमा आणि अधिकार वाढविण्यासाठी स्थानिक इतिहासलेखन करणाऱ्या समुदायला संरक्षण दिले, ज्यांनी विशिष्ट प्रदेशांची स्थापना, सुरुवातीच्या राजकारण्यांची यादी आणि स्थानिक उच्चभ्रूंचा जीवन-इतिहास नोंदवला. लंडन शहराचा सूक्ष्म पध्दतीने सर्वेक्षणकरून त्यावर आधारीत इ. स. १८९४ मध्ये ४४ खंड प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणार हे पहीले शहर. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातून पुढे लंडन विद्यापीठात 'Institute of Historical Research' स्थापन झाले. त्यामुळेच लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. याच काळात फ्रांन्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादीचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी १८४० च्या दशकात आपपाल्या क्षेत्रातील उदयोग व्यवसायाचा इतिहास लिहीण्यास सुरूवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील

उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयांच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

सन १९४७ मध्ये ब्रिटनमधील लीसेस्टर विद्यापीठ (University of Leicester) येथे स्थानिक इतिहास विभागाची स्थापना करण्यात आली. परिणामस्वरूप स्थानिक इतिहासलेखनाच्या या वाढत्या व्यावसायिक उत्साहाला लवकरच एक शैक्षणिक मान्यता मिळाली. लीसेस्टर स्कूलने स्थानिक इतिहासलेखनाचा एक दृष्टीकोन अथवा पद्धती विकसित केली, की जी प्रारंभी १९५२ मध्ये मिशन स्टेटमेंटमध्ये तयार करण्यात आलेली होती. डब्ल्यू. जी. हॉस्किन्स आणि एच. पी. आर. फिनबर्ग हे लीसेस्टर स्कूलशी संबंधित दोन महत्त्वाचे इतिहासकार होते. स्थानिक इतिहास लिहिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक पद्धतीवर ते टीका करत होते. प्रामुख्याने, त्यांनी पारंपारिक स्थानिक इतिहासाचा आधार बनलेल्या अभिजात पुराणमतवादी दृष्टिकोनाचा विरोध केला. उच्चभ्रू लोकांच्या कथा आणि वर्णन सामान्य माणसाकडे दुर्लक्ष करून अभिजन वर्गाचा ते गौरव करत होते. स्थानिक इतिहासकार तथ्ये गोळा करण्यासाठी जी पारंपरिक जुनी संशोधन पद्धती वापरत होते त्याच्यावरही टीका करत होते, त्यांच्यामते हे पारंपरिक इतिहासकार कागदपत्रावरील साधनावर अति अवलंबित्व आहेत. तात्विक आघाडीवर त्यांनी 'केंद्रीय एकत्रित थीम' (central unifying theme) नसल्याबद्दल टीका केली ज्यामुळे स्थानिक इतिहासाच्या परंपरेला शैक्षणिक शिस्तीचे वैशिष्ट्य मिळू शकले. फिनबर्ग यांनी सुचवले की स्थानिक इतिहासकाराचे काम स्वतःच्या मनात पुन्हा निर्माण करणे आणि त्याच्या वाचकांसाठी स्थानिक समाजाची उत्पत्ती, वाढ, घट आणि पतन हे चित्रित करणे हे असावे.

### ५) स्थानिक इतिहासाचा विकास: (आशिया आणि आफ्रिका)

आशिया आणि आफ्रिकेतील स्थानिक इतिहासाचा इतिहास युरोपपेक्षा वेगळा आहे. मौखिक परंपरांच्या विस्तृत साधनांची उपलब्धता लक्षात घेता, आशियाई आणि आफ्रिकन समाजाचे पारंपारिक स्थानिक ऐतिहासिक नोंदी विपुल प्रमाणात केलेल्या आहेत. या परंपरांचे काही भाग लिखित स्वरूपातही अस्तित्वात होते. यामध्ये प्रामुख्याने राजघराण्याच्या वंशावळी व त्यांचे युद्ध संघर्ष आणि विजय हे या परंपरेचे मूळ घटक होते. आफ्रिकन इतिहासकार एक्सेल हार्निट-सिव्हर्स (Axel Harneit- Sievers) यांच्या मते, अनेक आफ्रिकन आणि दक्षिण आशियाई समाजांमध्ये विशिष्ट व्यक्ती किंवा गटांना ऐतिहासिक ज्ञानाच्या प्रसारासाठी पारंपारिक तज्ञ म्हणून ओळखले जात होते. यामध्ये गावातील एखादी जाणकार व्यक्ती की जो स्थानिक इतिहासाचा जाणकार म्हणून त्यांच्या समाजात प्रसिद्ध होता. काही देशांच्यामध्ये प्रशिक्षित लोक देखील असत. उदा. मालीदेशामध्ये ग्रिओट्स (griots) सारखे लोक व्यावसायिक इतिहासकार म्हणून काम करत. नायजेरियातील बेनिनच्या दरबारातील ओबा येथे इसेखुर्हे (Isekhurhe) आणि इहोग्बे (Ihogbe) सारखे लोक पदवीधारकांसारखे इतिहास आणि राजघराण्याच्या वंशावळी सांगणारे अधिकृत लोक होते.

वसाहतवादी वर्चस्व आणि पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा परिचय आशिया आणि आफ्रिकेत नवीन अभिजात वर्ग उदयास येऊ घातला होता. त्यांच्या जागतिक दृष्टिकोनावर पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव होता.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आणि आफ्रिकेत १९४० च्या दशकात विद्यापीठ प्रणालीच्या स्थापनेमुळे ऐतिहासिक ज्ञान अधिक औपचारिक शैक्षणिक कार्यक्षेत्रात आले. तथापि, विद्यापीठांबाहेरील अनेक लोक अजूनही इतिहासाबद्दल, विशेषतः स्थानिक इतिहासाबद्दल लिहित होते. हौशी इतिहासकारांमध्ये स्थानिक इतिहास लोकप्रिय होता ज्यांना त्यांच्या समजाच्या भूतकाळात रस होता. यापैकी बहुतेक इतिहासकार हे त्यांनी लिहिलेल्या परिसरात राहत होते. मुळात ते व्यावसायिक इतिहासकार नव्हते आणि ते औपचारिक शिक्षणाच्या बाहेर लिखाण करत होते. अपवादात्मक काही स्थानिक इतिहास विद्यापीठाच्या संशोधकांनी लिहिला होता, परंतु बहुतेक विद्यापीठाबाहेरील लोकांनी लिहिलेला होता. या स्थानिक इतिहासकारांना त्यांच्या समाजाच्या कथा सांगण्याची आणि त्यांचा इतिहास जतन करण्याची आवड होती.

आफ्रिकन इतिहासकार हार्निट-सिव्हर्स या लेखकांना व लेखनासाठी 'नवीन स्थानिक इतिहास' (new local histories) हा शब्द वापरलेला आहे. जुन्या स्थानिक इतिहासाच्या विपरीत, जे बहुतेक कथांद्वारे सांगितले गेलेले होते, नवीन स्थानिक इतिहास लिहिणे आणि प्रकाशित करणे हे आहे. नवीन स्थानिक इतिहास उद्दिष्ट पुढील प्रमाणे आहे;

१) भूतकाळाकडे पाहून स्थानिक ओळख पुन्हा तयार करा.

२) स्थानिक गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिक ऐतिहासिक पद्धतीचा वापर.

३) परिसराबद्दलचे ज्ञान सामायिक करणे.

४) स्थानिक स्व-जागरूकता वाढविणे.

५) परिसराला अभिमानास्पद आणि सुप्रसिद्ध बनविणे.

नवीन स्थानिक इतिहास पारंपारिक इतिहासांपेक्षा पूर्णपणे भिन्न नाहीत, कारण;

१) स्थानिक कथा आणि प्राथमिक साधने वापरतात.

२) परंपरा जिवंत ठेवण्यासाठी स्थानिक समजासोबत काम करतात.

३) जुन्या इतिहासाचा आणि समाजाचा आदर करतात.

हार्निट-सिव्हर्स यांच्या मते नवीन स्थानिक इतिहासकारांना खालील मुद्दे महत्वाचे वाटतात आणि त्यांना त्यावर काम करावयाचे आहे:

१) शहरीकरण, शिक्षण, युद्ध किंवा विस्थापनामुळे जुना इतिहास विसरण्यापासून वाचवणे.

२) स्थानिक इतिहास जतन करण्याचे ध्येय म्हणून पहा, ते बदलू नका

थोडक्यात; नवीन स्थानिक इतिहास लिहिले आणि प्रकाशित केले जातात ज्याचा उद्देश स्थानिक ओळख पुनर्बांधणी करणे, ज्ञान सामायिक करणे आणि स्थानिक समाजाला अभिमान वाटणे हे आहे. ते पारंपारिक इतिहासाचा आदर करतात आणि परंपरा जिवंत ठेवण्यासाठी स्थानिक समाजासोबत काम करतात.

इतिहास जगभरातील लोकांना कल्पना करण्यास आणि समाजाची भावना निर्माण करण्यास मदत करतो. आशिया आणि आफ्रिकेतील नवीन स्थानिक इतिहास त्यांच्या सामायिक भूतकाळाकडे पाहून स्थानिक

समाजासाठी ओळखीची भावना पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जसजसे जग बदलते तस-तसे स्थानिक समाज 'आधुनिक परिसर' 'modern localities' बनतात. लोक नवीन ठिकाणी जातात, दूर इतरांशी संवाद साधतात आणि तरीही ते एका स्थानाशी जोडलेले नसतात. नवीन स्थानिक इतिहास हे नवीन वातावरण समजून घेण्याचा प्रयत्न करतात. स्थानिक समाज आणि व्यापक जग यांच्यात तणाव आहे. हा तणाव जवळजवळ प्रत्येक नवीन स्थानिक इतिहासात उपस्थित आहे.

थोडक्यात; नवीन स्थानिक इतिहास जोडलेल्या आणि बदलत्या जगाच्या वास्तविकतेसह मजबूत स्थानिक ओळखीची गरज संतुलित करण्याचा प्रयत्न करतो. नवीन स्थानिक इतिहास या बदललेल्या वातावरणाचा विचार करण्याचा प्रयत्न करतात. या संबंधी एक्सेल हार्निट- सिव्हर्स नमूद करतात की, 'New local histories may do so by trying to reduce the complexity of a community's external interaction and embeddedness, presenting the image of a "traditional", self-contained and homogeneous locality.... They may also stress historicity and change, and the importance of being part of larger contexts, as a matter of local pride and indicator of modernity. Many of them oscillate between these extremes and combine both perspectives. The tension between "the local" and the wider world is present- in more or less explicit forms - in virtually every new local history.'

समान वंश, समान संस्कृती, प्राचीन राजेशाही, नातेसंबंध आणि धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय यशांचा संदर्भ देऊन आफ्रिका आणि आशियातील नवीन स्थानिक इतिहास अनेक मार्गांनी स्थानिक परिसराची 'रचना' करतात. समाजाचे महत्त्व दर्शविण्यासाठी आफ्रिका आणि आशियातील नवीन स्थानिक इतिहास लिहिला जात आहे. असे केल्याने, समाज मूल्यांचा एक समान संच सार्वजनिक करतो हे दर्शविणे त्यांचे ध्येय आहे. हा इतिहास स्थानिक परंपरांना आधुनिक संशोधन पद्धतींसोबत जोडतात. त्यांचा या इतिहास संशोधनावर पाश्चात्य संशोधन पद्धतींचा प्रभाव पडलेला आहे. कारण ते कालक्रम स्वीकारतात आणि अनेक साधने वापरतात. हे जरी खरे असले तरी यांच्या इतिहासाची साधने गंभीर मूल्यांकनाशिवाय प्रामुख्याने पारंपारिक साधनांच्याकडून येतात. पाश्चात्य-शैलीचा कालक्रम जरी वापरत असले तरीही त्यामध्ये मूळ कथा, मिथक आणि पौराणिक नायकांचा समावेश होतो. थोडक्यात, आफ्रिका आणि आशियातील नवीन स्थानिक इतिहासांचे पाश्चात्य-शैलीचे स्वरूप आहे, परंतु त्यांची साधने आणि कथा सांगण्याचे मूळ स्थानिक परंपरांमध्ये आहे. समाजाची सामायिक मूल्ये आणि महत्त्व दर्शविणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

जे लोक हे स्थानिक इतिहास वाचतात ते केवळ स्थानिक भागातीलच नाहीत तर संपूर्ण देशाचे किंवा अगदी जगाचेही आहेत. स्थानिक इतिहास आधुनिक शैक्षणिक पद्धती वापरून लिहिल्यामुळे आणि तो प्रकाशित केल्यामुळे, अनेक लोक वाचू शकतात. जरी ते बऱ्याच लोकांनी वाचले असले तरी, हा इतिहास अजूनही स्थानिक क्षेत्र आणि तेथील परंपरांवर लक्ष केंद्रित करतो. नवीन स्थानिक इतिहास हा काही कंटाळवाणे शैक्षणिक पुस्तके नाहीत. तर ते स्थानिक समाजामध्ये अभिमान निर्माण करण्यास आणि तेथील लोकांना आपलेपणाची आणि ओळखीची भावना देण्यास मदत करतात.

आफ्रिका आणि आशियातील नवीन स्थानिक इतिहास दोन स्तरांवर कार्य करतात: स्थानिक आणि व्यापक. नवीन स्थानिक इतिहासाचे संशोधक आधुनिक शिक्षण घेतलेले आहेत आणि आधुनिक ऐतिहासिक कल्पना आणि पद्धतीचा ते वापर करतात, जे स्थानिक समाजासाठी नवीन असू शकते. मात्र त्याच वेळी त्यांचे कार्य स्थानिक परंपरांमधून येते आणि स्थानिक संभाषणांचा भाग आहे. हा इतिहास भूतकाळ सांगण्याच्या पारंपारिक पद्धतींना आव्हान देतात, परंतु ते स्थानिक परंपरांवर देखील कामआणि कार्य करतात. ते अपरिहार्यपणे जुन्या विचार पद्धती बदलतात, परंतु त्याऐवजी नवीन दृष्टीकोन जोडतात.

**६) स्थानिक इतिहासाच आणि भारत:**

भारतामध्ये पूर्वी 'स्थलमाहात्म्य' सांगणाऱ्या पोथ्या होत्या. त्यांनाही आपण स्थानिक इतिहास म्हणून संबोधू शकतो. भारतातील विविध राजघराण्यातील सत्ताधिशांनी प्राचीन काळापासून अनेक विद्ववानांना व साहित्यिकांना राजाश्रय दिलेला दिसतो. या विद्वानांनी संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, कन्नड, तेलगु, तामिळ अशा अनेक भाषामध्ये विविध प्रकारची काव्ये, कथा, नाटके, कादंबऱ्या इत्यादी लेखन केले. या वाङःमयीन अभिव्यक्तीच्या मांडणीवर अथवा वर्णनावर तत्कालीन समाजाचा प्रभाव पडलेला दिसतो. उदा. विशाखा दत्ताचे 'मुद्राराक्षस' व 'देवीचंद्रगुप्तम' भासाचे 'स्वप्नवासवदस्त', कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र', श्रीहर्षाचे 'रत्नावली' व 'प्रियदर्शिका' ही नाटके स्थानिक इतिहासाचे साधन म्हणून महत्त्वाचे आहे. दक्षिण भारताच्या स्थानिक इतिहासाला उपयुक्त ठरणारे तमिळ साहित्य की जे 'संगम साहित्य' म्हणून ओळखले जाते. पांड्य, चोल, चेर इत्यादी राजवटीच्या कालखंडातील आदान गुरु, कुरदोगे, परिपाडल, रेगुत्तर, भट्टीरण, पदीदुयन्तु, कलितोगे व पुरूनारुल इत्यादी आठ संग्रहाचा समावेश आहे. याशिवाय 'इंलोगो' या कवीने लिहिलेले 'शिलपादीकारम' हे महाकाव्य, याशिवाय संगम साहित्यामधील 'मणिमेखला' हे महाकाव्य, व 'जीवकचिंतामणी' इत्यादी संगम साहित्यातील शेवटी दिलेल्या टिपणीवरून त्या काळातील राजांच्या वंशावळीवर प्रकाश टाकता येतो. या साहित्याच्या मदतीने दक्षिण भारतातील स्थानिक प्रशासन व्यवस्थेवर प्रकाश टाकता येतो. या काळातील युध्दपध्दती, करपध्दती, अन्नधान्य, शेती, व्यापार, उद्योग चलन व्यवस्था इत्यादी संबंधी माहिती मिळते.

मध्ययुगीन कालखंडातीलही ललित साहित्य उपलब्ध आहे. अकबरांच्या दरबारातील महेश ठाकूर यांचे 'अर्वदेशवृत्तांत', पद्मसुंदरचे 'अकबरशाही शृंगार', 'दर्पण', देविमल यांचे 'हिरा सौभाग्य', जगन्नाथ पंडिताचे 'जगदाधारण', 'भामिनी विलास', 'राजागंगाधर' इत्यादी काव्ये. याशिवाय मुघल काळातील हिंदी, बंगाली, ओरिसा, गुजराती या भाषेतील अनेक प्रकारचे वाडःमय उपलब्ध आहे. या साहित्यामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

मराठाकालखंडातील बखर हे तत्कालीन महत्वाच्या घटनाचे वृत्तांतकथन आहे. बखरीतील तपशील पुराव्याने सिद्ध करण्यासारखा असतो. बखरकार हे फडावर, दफ्तरात काम करणारी अशी सामान्य कारकुनी पेशातील माणसे, आपल्या आश्रयदात्याच्या स्वकीयांच्या पराक्रमाचा वृत्तांत लिहून ठेवणे हा त्यांच्या लेखनाचा प्रमुख हेतू होता. पूर्वजांच्या कर्तृत्वाचे पुढिल पिढीस स्मरण व्हावे म्हणून राजाने किंवा

आश्रयदात्याने पदरी असलेल्या आश्रित कारकुन यांना आज्ञा करून बखरी लिहून घेतल्याचे जाणवते. प्रत्येक गोष्टीत कुतुहल असते. त्यामुळे इतिहास जाणून घेण्यासाठी 'बखरी' लिहिल्या गेल्या असाव्यात. बखर लेखन स्वयंप्रेरित नसून ते परप्रेरीत असे आहे. बखर हा स्वतंत्र्य गद्य प्रकार आहे. इतिहासासंबंधी ने घडते त्याच्याशी निगडीत बखर हा प्रकार लिहिला जातो. बखर हा वाङ्मय प्रकार साहित्यसृष्ठी आणि इतिहासाची सृष्ठी या दोहोंच्या सीमारेषेवर उभा आहे. या वाङ्मय प्रकाराने गद्य वाङ्मयान इतिहास व ललीत यांचा सुंदर समन्वय साधला आहे. त्या दृष्टिकोनातून भाषिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन इत्यादी अंगाने अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. बखरीचे लेखन कुणाच्या ना कुणाच्या तरी आज्ञेवरून झालेले आहे. असे दिसते म्हणजे हे लेखन परप्रेरीत असे आहे.

मराठी बखर वाङ्मयाचे महाराष्ट्राच्या इतिहासाशी आणि विशेषतः मराठयांच्या इतिहासाशी जवळचा ऋणानुबंध आहे. मराठ्यांच्या कर्तृत्वाचे, त्यांच्या पराक्रमाचे ऐतिहासिक संदर्भ बखर वाङ्मयात सापडतात. राजांच्या कर्तृत्वाचे पोवाडे, पराक्रमाच्या नोंदी असे ऐतिहासिक संदर्भ बखर वाङ्मयात सापडतात. वस्तूनिष्ठ सत्य रूपात राजकीय स्वरूपाच्या ऐतिहासिक लेखनाचा आढावा या बखरीतून प्रकट झाला आहे. राजकीय घडामोडींना त्या त्या राजवटीतील सुसंगत घटकांना जसे महत्त्व आहे तसे वाङ्मयदृष्ट्या इतिहास कथानिवेदनास महत्व आहे. बखर हा स्वतंत्र्य व संपन्न वाङ्मय प्रकार आहे. बखरकार भुतकाळातील व्यक्तींना, घटनांना शब्द सामर्थ्याव्दारे जीवंत करून विषयांशी एकरूप होवून सहजतेने पुनः प्रत्यय घडवितात. त्याच बरोबर बखरीत शैलीदार भाषा, दृष्ठांत, म्हणी, सुभाषिते, दोहे, वाक्यप्रचार यांचा सहज सुंदर वापर करतात. घडलेल्या घटनांची माहिती यात आहे. बखर वाड्मय लिहित असताना लेखकासमोर पुराणाचा आदर्श असतो. पौराणिक, अद्भुत कथेत अतिशयोव्यक्तीचा प्रभाव पडल्यामुळे बखरीची परंपरा पौराणिक आहे असे श्री. र. कुलकणी यांचे मत आहे.

भारतात ऐतिहासिक घराण्यांचा वंशवृक्ष तयार करण्यांची प्रथा मध्ययुगीन काळात अस्तित्वात असलेली दिसते. प्रसिद्ध घराण्यांच्या वंशावळीना अगदी ब्रह्मापासून सुरुवात केलेल्या आढळतात. यामधील पहिला क्रम हा पुराणावरुन घेतलेला असतो. वंशवेलीतून प्रत्येक व्यक्तीची किंवा त्यातील मुख्य व कतृत्वान व्यक्तीचा जन्म किंवा मृत्यूच्या तारखा देण्यात येत असत. अनेक उदाहरणामध्ये वंशावळी अपूर्ण असलेल्या दिसतात. वंशवेलीचा अभ्यास करुन एखादया घराण्याचा विस्तार कुठपर्यंत झालेला होता किंवा त्या घराण्यातील व्यक्ती कोणत्या व्यक्तीस अथवा राजास समकालीन होती. यावर प्रकाश टाकता येतो. वंशवेलीवरून समकालीन व्यक्तीचा अभ्यास करून तत्कालीन स्थानिक राजकीय, सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो.

शकावल्यामध्ये एखाद्या महत्वाच्या घराण्या संदर्भात घडलेल्या घडामोडीची तिथी, वार, शके यानुसार नोंद केलेली असते. यालाच जंत्री किंवा शकावली असे म्हणतात. एखाद्या घराण्यासंदर्भात किंवा व्यक्ती चरित्रा संदर्भात महत्त्वाची माहिती यामधून मिळते. शकावल्यांच्यामध्ये दररोजच्या खर्चापासून ते राज्यव्यवस्थेपर्यत अनेक गोष्टीचा उल्लेख असतो. मराठाकालीन अनेक शकावल्या आज उपलब्ध आहेत.

कुळकटी म्हणजे कुलांचा किंवा घराण्यांचा इतिहास होय. मध्ययुगीन कालखंडात कुळांचा इतिहास लिहिण्याची प्रथा होती. अनेक कुळांचा इतिहास त्या काळात लिहिला गेलेला आहे. या कुळकटीचा उपयोग इतिहास लेखनासाठी होतो. कुळकटीच्या माध्यमातून कुळाचा विस्तार कसा झाला. नाते संबंध कोणाशी आले, त्या कुळाची घसरण कोणत्या कारणामुळे झाली इत्यादी माहिती यामधून प्राप्त होते कुळकटीच्या माध्यामातून तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषयावर देखील प्रकाश टाकण्यास मदत होते. म्हणून बखरीपेक्षा कुळकटी अधिक प्रमाणात ग्राह्य मानली जाते. उदा. आठवले, गोखले, घोरपडे, पटवर्धन, गुणे, हिंगणे, पेठे, चंद्रचूड, रास्ते व पुरंदरे इत्यादी घराण्याच्या कुळकटी प्रकाशित झालेल्या आहेत. मात्र या कुळकटी इतिहास प्रसिध्द घराण्यांपुरत्याच मर्यादीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य घराण्यावरं यातून काहीही प्रकाश पडत नाही.

एखाद्या कुटूंबाशी हस्तलिखित स्वरुपात लिहून ठेवलेली माहिती म्हणजे बाड होय. मध्यकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने महत्वाच्या कागदपत्रांच्या नक्कला करुन त्या सांभाळून ठेवल्या जात. अशा कागदपत्रांना बाड अथवा बाडे असे म्हणतात. बाडाच्या माध्यमातून देवादिक, राजे, बादशाहा यांच्या कारकींदीची कालगणती, निवडक ऐतिहासिक प्रसंग तिथी, शके संबंधी माहिती मिळते. दुय्यम स्वरुपातील या साधनाचा वापर करुन ऐतिहासिक घराण्यावर, त्या घराण्यातील पराक्रमी व्यक्तीच्या चरित्रावर व समकालीन सत्ताधिशांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**७) भारतातील ब्रिटिश काळात स्थानिक इतिहासलेखनाचा विकास:**

१८ व्या शतकाच्यामध्यापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या भारतातील ब्रिटिश कालखंडात स्थानिक इतिहासलेखनात महत्त्वपूर्ण घडामोडी घडलेल्या दिसतात. प्रारंभी, स्थानिक इतिहासलेखन वसाहतिक राज्यकर्त्यांना भारताचा भौगोलिक प्रदेश, संस्कृती आणि इतिहास याविषयीच्या ज्ञानाच्या गरजेनुसार आकारास येत गेला. ब्रिटिश अधिकारी जेम्स टॉड, अलेक्झांडर कनिंगहॅम आणि एच. टी. कोलब्रुक इत्यादिनी स्थानिक इतिहासांची तपशीलवार माहिती घेण्यास सुरवात केली. प्रामुख्याने यामध्ये राजवंश, राज्ये आणि स्मारके, वास्तुकला यावरच लक्ष केंद्रित होते. मात्र हे काम महत्त्वाचे असत नाही अनेकदा वसाहतवादी पूर्वाग्रह आणि दृष्टीकोनांनी रंगलेले दिसते. जसजसे ब्रिटीश राजवट मजबूत होत गेली, तसतसे पद्धतशीर दस्तऐवजीकरण आणि रेकॉर्ड-कीपिंगची गरज वाढली. भारतीय महसूल सेवा आणि जिल्हा प्रशासन स्थानिक इतिहास, गॅझेटियर आणि सेटलमेंट रिपोर्ट्स संकलित करू लागले. या कामांनी स्थानिक प्रथा, परंपरा आणि इतिहासांबद्दल महत्त्वाची माहिती जमा केली मात्र ही उपयोगितावादी आणि प्रशासकीय दृष्टीकोनातून लिहिलेली होती.

स्थानिक इतिहासलेखनाच्या विकासात भारतीय संशोधकांनी या काळात योगदान दिलेले दिसते. राजेंद्रलाल मित्रा, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय आणि के. पी. जयस्वाल यासारख्या भारतीय विद्वानांनी स्थानिक इतिहास लिहिला, अनेकदा वसाहतवादी इतिहासाला त्यांनी आव्हान दिले. प्रादेशिक ओळखीवर जोर दिला. स्थानिक भाषा आणि मुद्रित माध्यमांच्या उदयामुळे स्थानिक इतिहासाचा प्रसार सुलभ झाला, ज्यामुळे

व्यापक स्वरूप येण्याचा मार्ग सुखर झाला आणि प्रतिबद्धता वाढली. या कालावधीतील उल्लेखनीय घडामोडीं झालेल्या आपणास दिसतात. विशेषत: सन १७८४ मध्ये बंगालच्या एशियाटिक सोसायटीची स्थापना आणि रॉयल एशियाटिक सोसायटीची बॉम्बे शाखा (१८५६), ज्याने स्थानिक इतिहासाच्या संशोधन आणि प्रकाशनाला प्रोत्साहन दिले. ब्रिटिश सरकारने जिल्हा गॅझेटियर्स, सेटलमेंट रिपोर्ट्स आणि प्रांतीय इतिहासांची निर्मिती झाल्याने स्थानिक ऐतिहासिक ज्ञाना कक्षा रुंदावण्यास मदत झाली. यातून भारतीय विद्वान आणि इतिहासकारांचा उदय झाला, ज्यांनी वसाहतवादी लेखनाला आव्हान दिले आणि प्रादेशिक दृष्टीकोनांवर जोर दिला. भारतातील ब्रिटीश काळात स्थानिक इतिहासलेखनाला अनेक मर्यादांचा सामना करावा लागला, यामध्ये वसाहतवादी पूर्वग्रह आणि दृष्टीकोन, जे अनेकदा स्थानिक इतिहास विकृत किंवा दुर्लक्षित करत होते. उपयोगितावाद आणि प्रशासकीय भर, मर्यादित दृष्टीकोण आणि प्रतिबद्धता आणि प्रारंभीक टप्यात स्थानिक इतिहास हा उच्चभ्रू लोकांपुरते मर्यादित होते.

**८) स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थानिक इतिहासलेखनाचा विकास**

सन १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याने देशाच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण वळण मिळाले, भारताच्या भूतकाळाचे पुनर्मूल्यांकन सुरू झाले आणि यातूनपुढे स्थानिक इतिहासलेखनावर नवीन लक्ष केंद्रित केले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात, भारतातील ऐतिहासिक संशोधन प्रामुख्याने राष्ट्रीय स्तरावर केंद्रित होते, ज्यामध्ये स्वातंत्र्य लढा आणि एकसंध राष्ट्रीय इतिहास तयार करण्यावर भर देण्यात आलेला होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या मोठ्या घटनेत परिधीय म्हणून पाहिल्या गेलेल्या स्थानिक इतिहासांकडे अनेकदा दुर्लक्ष केले गेले. तथापि, जस-जशी दशके उलटली, तस-तसे विद्वानांनी भारताच्या भूतकाळातील गुंतागुंत समजून घेण्यासाठी स्थानिक इतिहासाचे महत्त्व ओळखण्यास सुरुवात केली. १९७०-८० च्या दशकात स्थानिक इतिहासलेखन एक वेगळे क्षेत्र म्हणून उदयास आले, ज्याचा पुढाकार डी. डी. कोसंबी सारख्या विद्वानांनी केला. कोसंबी आणि आर. एस. शर्मा यांचे कार्य विशिष्ट प्रदेशांच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासावर केंद्रित होते, स्थानिक अनुभवांची विविधता आणि समृद्धता अधोरेखित करते. १९९० ते २००० च्या दशकात उपेक्षित समाज आणि मौखिक इतिहासावर अधिक लक्ष केंद्रित केले गेले यातून स्थानिक इतिहासलेखनाचा आणखी विस्तार झाला आणि त्यामध्ये वैविध्यता निर्माण झाली. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि इतर क्षेत्रांमधील अंतर्दृष्टी समाविष्ट करणारे अंत:विषय दृष्टिकोन अधिक सामान्य झाले. स्थानिक इतिहासलेखनाचे अधिक लोकशाहीकरण झाले. अलिकडच्या काही वर्षांत, डिजिटलायझेशन आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मने स्थानिक इतिहासलेखनाचे भूचित्र बदलले आहे, ज्यामुळे अधिक सुलभता आणि सहयोग सक्षम झाला आहे. सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारसा यांना चालना देण्यासाठी स्थानिक इतिहासाचे मूल्य ओळखून सार्वजनिक इतिहास उपक्रम आणि सामाजिक सहभाग वाढत्या प्रमाणात महत्त्वाचा बनला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थानिक इतिहासलेखनाला अनेक महत्त्वाच्या घटकांनी आकार दिला आहे. ऐतिहासिक अभ्यासाचे विकेंद्रीकरण आणि प्रादेशिकीकरणामुळे भारताच्या गुंतागुंतीच्या इतिहासाचे अधिक सूक्ष्म आकलन होऊ शकले आहे. राष्ट्रीय कथा समजून घेण्यासाठी स्थानिक इतिहासाची

अत्यावश्यक ओळख देखील या क्षेत्रात वाढ झाली आहे. याव्यतिरिक्त, तांत्रिक प्रगती आणि डिजिटल प्लॅटफॉर्मने सहयोग आणि सुलभता सुलभ केली आहे.

थोडक्यात: स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थानिक इतिहासलेखनाचा विकास देशाच्या भूतकाळातील अधिक सर्वसमावेशक आणि सूक्ष्म आकलनाकडे एक महत्त्वपूर्ण बदल दर्शवतो. सुरुवातीच्या काळातील दुर्लक्षापासून ते सध्याच्या जीवंतपणापर्यंत, स्थानिक इतिहासलेखनाने भारताच्या गुंतागुंतीच्या इतिहासाची आणि सांस्कृतिक वारशाबद्दलची आपली समज तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**९) स्थानिक इतिहास आणि महाराष्ट्र:**

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या दृष्टीकाणातून विचार केल्या इ.स. १८३६ मध्ये प्रसिध्द झालेले गोविद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', इ.स. १९६८ मध्ये प्रसिध्द झालेले ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन', आर. व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर' या ग्रंथाद्वारे १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला. विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृध्दींगत झाली. डी. बी. पारसणीस यांनी स्थानिक इतिहासलेखनाशी संबंधित महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले, यामध्ये दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ, नोट्स ऑन सातारा, महाबळेश्वर, सांगली स्टेट, पन्हाळा; पूना इन बायगॉन डेज हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. कॅप्टन सेसिल फॉवले यांचा Tales of Ahmednagar (१९१९), मेजर बि. डी. वासू यांचा Story of Satara (१९२२), The Story of Ichalkaranji (१९२९), ह. ग. पारखे यांचा 'आमचा नगर जिल्हा' (१९३१), ना. गो. चापेकरांचे 'बदलापूर', (१९३३) पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', (१९३५) असे अनेक स्थानिक इतिहासलेखनाचे प्रयत्न ब्रिटिशकाळापासून इंग्रजी व इतर भाषांमध्ये झाले.

प्रादेशिक अस्मिता, सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक घटनांचे मूळ जाणून घेण्याची नव्याने रुची निर्माण झाल्याने स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक इतिहासलेखनात वाढ झाली. प्रारंभीच्या कालखंडात हे इतिहास लेखन राष्ट्रवादी विचार आणि स्वातंत्र्य चळवळीच्या घटनावर केंद्रित होते. पुढे स्थानिक इतिहास व्यापक राष्ट्रीय चौकटीमध्ये बसविण्याचा प्रयत्न झाला. सन १९७०-८० च्या दशकात स्थानिक इतिहासलेखनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. याचे कारण प्रादेशिक आणि स्थानिक इतिहासामध्ये वाढती स्वारस्यता हे होते. यामुळे विशिष्ट प्रदेशांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहासावर लक्ष केंद्रित केले गेले. सन १९९० च्या दशकात स्थानिक इतिहासाचा विस्तार झाला आणि त्यामध्ये विविधता आली. उपेक्षित समाज, मौखिक इतिहास आणि लोककथांच्यावर वाढलेला भर, आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनांचा विकास स्थानिक इतिहासलेखनाला अधिक लोकशाहीकृत आणि सर्वसमावेशक करत गेला.

थोडक्यात; सध्या स्थानिक इतिहासासाठी डिजिटलायझेशन आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध झालेला आहे. सार्वजनिक इतिहास, सामुदायिक सहभाग आणि वारसा संवर्धन यावर वाढता भर आहे, आणि आंतरविभागीयता आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्थानिक इतिहासलेखनाला आकार देत आहे.

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील स्थानिक इतिहासलेखनाचा विकास प्रादेशिक अस्मिता, सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक मुळांमध्ये वाढती स्वारस्य दर्शवतो. उदा. दे. गो. लांडगे यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', (१९५४) राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', (१९५६) अरूण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादीत केलेले 'शहर पुणे: एका सास्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) डॉ. अवनिश सोवणी यांचे 'हरवलेले पुणे', म. श्री. दिक्षित यांचे 'खेड राजगुरूनगर' (२००३), डॉ. राजा दिक्षित यांचा 'पुणे ज्ञानसागरू बखर' (२००७), यासारख्या अनेक ग्रंथाचा उल्लेख होतो. महाराष्ट्रामध्ये स्थानिक इतिहास लेखनाची अनेक उदाहरणे देता येतील.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) ............. प्रथा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाकीय मांडणी अधिक बळकट झाली.

अ) ॲनाल्स ब) मार्क्सवादी क) वसाहतवादी ड) यापैकी नाही

२) स्थानिक इतिहास लेखन हे ............ परंपरेचे फलित आहे.

अ) ॲनाल्स ब) मार्क्सवादी क) वसाहतवादी ड) वंचित इतिहास

३) स्थानीय इतिहास हा मराठी शब्दप्रयोग कोणी वापरला आहे.

अ) डॉ. अरुण टीकेकर ब) राजा दिक्षित

क) डी. एन. झा ड) यापैकी नाही

४) १८ व्या शतकात ......... मध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला.

अ) इंग्लंड ब) अमेरिका क) फ्रांस ड) भारत

५) नवीन स्थानिक इतिहास ही संकल्पना कोणी मांडली आहे.

अ) हार्निट-सिव्हर्स ब) दीपेश चक्रवर्ती क) जे. सी. प्राइस ड) शेरॉन स्लेटर

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) रॉबर्ट स्टिफलर यांच्या ग्रंथाचे नाव सांगा.

२) Society and Ideology in India हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

३) डी. डी. कोसंबी यांनी कोणता ग्रंथ लिहिला आहे.

४) ब्रिटनमधील लीसेस्टर विद्यापीठ येथे स्थानिक इतिहास विभागाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली.

५) जागृत सातारा हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

### १.२.२ स्वरूप (Nature)

स्थानिक इतिहास म्हणजे एखादी वसाहत, गाव, शहर, प्रदेश यासारख्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामधील इतिहास. ज्यामध्ये भूतकाळातील घटना, तेथे राहणाऱ्या लोकांचे अनोखे अनुभव, परंपरा, लोक संस्कृतीचा अभ्यास समाविष्ट आहे. स्थानिक इतिहास हा आपल्या सामाजिक आणि सामुदायिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो मानवी अनुभवाच्या गुंतागुंत आणि स्थानिक संस्कृतींच्या विविधतेबद्दल नविनज्ञान मिळते. स्थानिक इतिहासामध्ये स्थानिक सामाजिक आणि आर्थिक घडामोडी, सांस्कृतिक आणि धार्मिक प्रथा, राजकीय आणि सैन्य कार्यक्रम, पर्यावरणीय आणि भौगोलिक बदल आणि स्थानिक लोकांचे दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांचे अनुभव यांचा स्थानिक इतिहासाच्या स्वरुपमध्ये समावेश करता येईल. स्थानिक इतिहासाचे परीक्षण करून, आपण स्थानिक ओळख आणि समाजाची गुंतागुंत, स्थानिक समाजांवरील व्यापक ऐतिहासिक सत्तेचा प्रभाव, ज्या मार्गांनी स्थानिक संस्कृतींनी व्यापक प्रादेशिक आणि जागतिक सत्तांना प्रभावित केले आहे या गोष्टी आपण समजून घेवू शकतो. स्थानिक इतिहास हा केवळ भूतकाळ जपण्याचा नसून वर्तमान समजून घेऊन भविष्याची माहिती देणारा असतो. स्थानिक इतिहासामध्ये स्थानिक समाजामध्ये जबाबदारी आणि अभिमान वाढवणे, स्थानिक निर्णय आणि धोरणाची माहिती, प्रादेशिक आणि राष्ट्रीय इतिहासाचे आकलन वाढवणे आणि मानवी अनुभवाचे सूक्ष्म आणि बहुआयामी चित्र निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे:

थोडक्यात; स्थानिक इतिहास हे अभ्यासाचे एक समृद्ध आणि आकर्षक क्षेत्र आहे, जे मानवी अनुभवाची गुंतागुंत आणि स्थानिक संस्कृतींच्या विविधतेबद्दल नविनज्ञान देते. स्थानिक इतिहासाचे संशोधन करून, आपण स्वतःचे, आपल्या समाजाचे जगातील आपले स्थान याविषयी सखोल माहिती समजून घेऊ शकतो. स्थानिक इतिहासाचे स्वरूप निर्धारित करत असताना आपणास खालील बाबींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे.

२) स्थानिक दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांवर भर देणे.

३) स्थानिक संस्कृती, परंपरा आणि चालीरीतींचा शोध घेणे.

४) स्थानिक घटना, प्रवाह आणि हालचालींचे परीक्षण करणे.

५) स्थानिक साधनांचा वापर, जसे की संग्रहण, मौखिक इतिहास आणि कलाकृती.

६) आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन, इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि इतर क्षेत्रांतील पद्धतींचा समावेश

७) स्थानिक ओळख जपण्यासाठी आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणे.

**१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे:**

स्थानिक विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे हा स्थानिक इतिहासाचा एक मूलभूत पैलू आहे. स्थानिक इतिहासाच्या या दृष्टिकोनातून संशोधक खालील घटनांचा शोध घेवू शकतो.

१) विशिष्ट ठिकाणाच्या अद्वितीय वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

२) स्थानिक लोक, पर्यावरण आणि घटना यांच्यातील आंतरसंबंधांचे परीक्षण करणे.

३) स्थानिक समाजावर व्यापक ऐतिहासिक घटनांच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.

४) स्थानिक व्यक्ती आणि विविध गटांचे योगदान आणि अनुभव अधोरेखित करणे.

५) स्थानिक ज्ञान आणि परंपरा जतन करणे.

६) स्थानिक निर्णय घेण्याच्या आणि संरक्षणाच्या प्रयत्नांची माहिती देणे.

स्थानिक विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आपण काही उदाहरणे पाहू शकतो, जसे की नगरे अथवा शहरामधील शहरीकरण कसे झाले, नगरपालिका प्रशासनाचा विकास कसा झाला, ग्रामीण भागातील शेती, प्रकार, जमीनीचा वापर, पीक पद्धती कशी आहे. प्रादेशिक सांस्कृतिची ओळख करून देणे. आर्थिक विकास कसा आहे. स्थानिक समाजाची परिवर्तनशिलता, सामाजिक बदल कसा आहे. सांस्कृतिक देवाणघेवाण आणि संघर्ष. नैसर्गिक वैशिष्ट्ये काय आहेत जसे की, नद्या, पर्वत, किनारपट्टी आणि स्थानिक पातळीवरील ऐतिहासिक ठिकाणे वास्तुकला यांना संरक्षण आदि बाबींचा समावेश करता येतो.

थोडक्यात; विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून, स्थानिक इतिहासकार एखाद्या ठिकाणाची आणि तिथल्या लोकांची वेगळी ओळख असण्याऱ्या अनोख्या कथा आणि अनुभवांचा उलगडा करू शकतात.

**२) दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांवर भर देणे:**

स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून स्थानिक समाजाचे दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांवर भर देणे शक्य आहे.

१) स्थानिक इतिहासाचा उद्देश अतिउच्च अथवा उच्चभ्रू लोकांऐवजी शेतकरी, कष्टकरी, कारागीर, मजूर यांच्यासारख्या सामान्य लोकांच्या अनुभवांवर लक्ष केंद्रित करणे हा आहे.

२) स्थानिक सण, उत्सव, परंपरा, रीतिरिवाज यांच्यासारख्या सामान्य लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पद्धतींचे परीक्षण करणे.

३) सामाजिक परिवर्तनासाठी काम करणाऱ्या स्थानिक व्यक्ति अथवा नेते/नायक, समाजसुधारक आणि कार्यकर्त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकणे.

४) स्थानिक समाजाच्या दैनंदिन जीवनावर ऐतिहासिक घटनांचा प्रभाव शोधणे, जसे की वसाहतवाद, दुष्काळ किंवा सामाजिक सुधारणांचे परिणाम.

५) दलित, आदिवासी आणि महिला यांच्यासारख्या उपेक्षित समुदायांच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणे.

६) स्थानिक सामाजिक जीवनाला आकार देणाऱ्या जसे की, मंदिरे, मशिदी आणि शाळा यासारख्या स्थानिक संस्थांच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.

७) स्थानिक लोकसंगीत, नृत्य आणि कला यासारख्या सामान्य लोकांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तींचा अभ्यास करणे.

८) दैनंदिन जीवन आणि व्यापक ऐतिहासिक प्रक्रिया, जसे की शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण यांच्यातील संबंधांची तपासणी करणे.

भारतीय स्थानिक इतिहासातील दैनंदिन जीवनातील आणि सामान्य लोकांची काही उदाहरणे खालीलप्रमाणे देता येतील अथवा त्याचा अभ्यास करणे शक्य आहे; उदा.

१) विशिष्ट प्रदेशातील कारागीर आणि कारागीरी यांचा इतिहास.

२) स्थानिक सामाजिक सुधारणा चळवळींमध्ये महिलांची भूमिका.

३) ग्रामीण उपजीविकेवर वसाहतवादाचा प्रभाव.

४) विशिष्ट जाती किंवा समुदायाच्या सांस्कृतिक पद्धती.

५) स्थानिक बाजार आणि व्यापारी जाळे यांचा इतिहास.

६) विशिष्ट भागातील अथवा शहरातील स्थलांतरित कामगारांचे अनुभव.

७) सामाजिक बदलामध्ये स्थानिक शाळा आणि शिक्षणाची भूमिका.

८) स्थानिक पर्यावरणीय पद्धती आणि परंपरांचा इतिहास.

थोडक्यात; स्थानिक दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांवर भर देऊन, स्थानिक इतिहासकार भारताच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण इतिहासाची अधिक सूक्ष्म आणि सर्वसमावेशक समज निर्माण करू शकतात.

**३) स्थानिक संस्कृती, परंपरा आणि चालीरीतींचा शोध घेणे:**

स्थानिक संस्कृती, परंपरा आणि चालीरीतींचा शोध घेणे हा भारतीय स्थानिक इतिहासाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. या अनुषंगाने आपण येथे काही उदाहरणे पाहू शकतो.

**अ) सण उत्सव परंपरा:**

सण उत्सव परंपरा म्हणजे एखाद्या प्रदेशाच्या अथवा एखाद्या समाजाच्या सण, उत्सव आणि इतर सामाजिक कार्यक्रमांच्या परंपरा. ह्या परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या असतात आणि त्यात स्थानिक चालीरीती, विधी, संगीत, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश असतो. स्थानिक सण-उत्सव परंपरेचे काही महत्वाचे पैलूवर आपण प्रकाश टाकू शकतो.

१) सण-उत्सव परंपरा हा एखाद्या प्रदेशाच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग असतो.

२) सण-उत्सव परंपरा सामाजिक ऐक्याला प्रोत्साहन देते.

३) सण-उत्सव परंपरेला धार्मिक महत्त्व आहे, कारण हे सण-उत्सव अनेकदा धार्मिक प्रसंगांशी संबंधित असतात.

४) सण-उत्सवाच्या निमित्ताने विविध प्रकारचे संगीत, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश असतो, जे मनोरंजनाचे एक महत्त्वाचे साधन आहे.

वरील या कारणांमुळे सण- उत्सव परंपरेचे जतन आणि प्रसार करणे महत्त्वाचे आहे जे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून शक्य आहे.

**ब) पाककला परंपरा:**

पाककला परंपरा एखाद्या प्रदेश किंवा समाजाच्या विशिष्ट स्वयंपाकाच्या शैली आणि परंपरांचा संदर्भ मिळतो. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आली आहे आणि त्यात स्थानिक साहित्य, पाककृती आणि स्वयंपाकाची तंत्रे समाविष्ट असतात. की जी बहुतांशपाने कागदावर आलेली नसतात. स्थानिक इतिहासाच्या दृष्टीकोणातून पाककला परंपरा महत्वाची आहे करण;

१) पाककृती परंपरा हा विशिष्ट प्रादेशिक सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

२) स्वयंपाकाच्या परंपरेत स्थानिक घटकांचा वापर केला जातो, ज्यामुळे प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

३) पाककृती परंपरांमध्ये विविध प्रकारचे पाककृती आणि स्वयंपाकाच्या तंत्रांचा समावेश होतो, ज्यामुळे अन्नाची विविधता वाढते.

४) पाककला परंपरा सामाजिक ऐक्याला प्रोत्साहन देतात, कारण लोक एकत्र येऊन अन्न शिजवतात आणि सामायिक करतात.

५) पाककलेच्या परंपरांमध्ये आरोग्यास प्रोत्साहन देणारे निरोगी स्वयंपाक तंत्र समाविष्ट असते. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून आपण स्थानिक पाककला परंपरांचे जतन आणि प्रसार करू शकतो. उदा. Salma Husain लिखित 'Flavours of Avadh: Journey from the Royal Banquet to the Corner Kitchen' अनुराधा तेंडुलकर लिखित 'कोल्हापूरची खाद्य संस्कृती' इत्यादि.

**क) कारागीर परंपरा:**

कारागीर परंपरा म्हणजे एखाद्या प्रदेशाच्या किंवा समाजाच्या कारागिरांनी विकसित केलेल्या हस्तकला, कला आणि हस्तकलेच्या परंपरा. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेली असते. आणि त्यात स्थानिक साहित्य, तंत्रे आणि रचनांचा समावेश केलेला असतो. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून आपण पुढील गोष्टी साध्य करू शकतो.

१) कारागीर परंपरा हा एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे त्याचे जतन करू शकतो अथवा ती उजेडात आणू शकतो.

२) कारागीर परंपरा स्थानिक अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देते, कारण कारागीर स्थानिक साहित्य वापरतात.

३) कारागीर परंपरा रोजगाराच्या संधी प्रदान करते, कारण कारागीर त्यांच्या हस्तकला आणि कला विकून उत्पन्न मिळवतात.

४) कारागीर परंपरा स्थानिक ओळख टिकवून ठेवण्यास मदत करते, कारण कारागीर त्यांच्या कामात स्थानिक संस्कृती आणि परंपरा समाविष्ट करतात.

५) कारागीर परंपरा सौंदर्य आणि कलेला प्रोत्साहन देते, कारण कारागीर त्यांच्या हस्तकला आणि कलांमध्ये सौंदर्य आणि कलात्मकता समाविष्ट करतात. उदा. श्री सतीश पवार लिखित वडार समाज आणि संस्कृती, शरत सुंदर राजीव लिखित The King's 'Craftsmen- History of the Ivory Carvers of Thiruvananthapuram', पायल मोहनका लिखित 'The Shadows : Unknown Craftsmen of Bengal' ही उदाहरणे देता येतील.

**ड) सामाजिक चालीरीती अथवा वर्तन:**

स्थानिक सामाजिक चालीरीती अथवा वर्तन म्हणजे समाज किंवा समुदायाच्या लोकांनी स्वीकारलेल्या परंपरा, मूल्ये आणि वर्तनांचा संग्रह होय. ह्या चालीरीतीते पिढ्यानपिढ्या पालन केले जाते आणि त्यात सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये आणि वैयक्तिक वर्तन यांचा समावेश होतो. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून आपण त्याचे आकलन करू शकतो.

१) भारतीय समाजात कुटुंबाचे महत्त्व खूप जास्त आहे त्याच आकलन करून घेणे.

२) ज्येष्ठांचा आदर आणि सन्मान करणे हा भारतीय समाजातील एक महत्त्वाचा गुण आहे.

३) विविध जाती आणि धर्माच्या लोकांमध्ये सामाजिक सलोखा राखणे हे भारतीय समाजातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

४) विविध सण आणि उत्सव साजरे करणे हा भारतीय समाजातील एक महत्त्वाचा विधी आहे.

५) भारतीय समाजात सामाजिक जबाबदारीची भावना खूप प्रबळ आहे. उदा. ए. एम. शहा लिखित 'Lineage Structure and Change in a Gujarat Family in "Family, Kinship and Marriages in India'

**इ) स्थानिक देवता आणि पूजा:**

स्थानिक देव-देवता आणि उपासना हे देव आणि देवींच्या सभोवतालच्या आदर आणि विधींचा संदर्भ देतात जे विशिष्ट प्रदेश, गाव किंवा समुदायासाठी विशिष्ट असल्याचे मानले जाते. या देवता अनेकदा

नैसर्गिक घटना, पूर्वज किंवा स्थानिक दंतकथांशी संबंधित असतात आणि त्यांची पूजा विधी आणि प्रसादाद्वारे केली जाते.

१) स्थानिक देवता एखाद्या समाजाच्या सांस्कृतिक वारसा आणि परंपरांचे प्रतिनिधित्व करतात.

२) स्थानिक देवतांची उपासना लोकांना एकत्र आणते, समुदाय आणि सामाजिक बंधनाची भावना वाढवते.

३) स्थानिक देवता जमीन, पूर्वज आणि नैसर्गिक परिसराशी आध्यात्मिक संबंध दृढ करतात.

४) स्थानिक देवता समुदायाला संरक्षण, आशीर्वाद आणि समृद्धी देतात असे मानले जाते.

५) स्थानिक देवतांच्या पूजेमुळे पारंपारिक प्रथा, विधी आणि कथा जपण्यास मदत होते.

**४) स्थानिक चळवळीच्या नोंदी:**

स्थानिक इतिहासलेखानाच्या माध्यमातून संशोधक स्थानिक चळवळींच्या नोंदी घेवू शकतो ज्या मध्ये सामाजिक, राजकीय किंवा पर्यावरणीय चळवळींचा समावेश असतो. ज्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रांवर, जसे की शहरे, नगरे किंवा प्रदेशांवर लक्ष केंद्रित करतात. या चळवळी अनेकदा स्थानिक समस्या, चिंता आणि गरजा संबोधित करतात आणि समुदाय सदस्य, संस्था किंवा कार्यकर्त्यांद्वारे चालविल्या जातात. स्थानिक चळवळीमुळे सकारात्मक बदल, सामाजिक सहभाग आणि सशक्तीकरण होऊ शकते आणि व्यापक प्रादेशिक किंवा राष्ट्रीय चळवळींनाही प्रेरणा मिळू शकते.

**१) स्थानिक कार्यक्रम:**

स्थानिक कार्यक्रम म्हणजे शहर, नगर अथवा गाव यासारख्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामध्ये होणारे विविध कार्यक्रमांच्या नोंदी जसे की सण-उत्सव, संमेलने, सामाजिक परस्परसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या नोंदी स्थानिक इतिहासात येतात. उदा. सण, शेतकऱ्यांचे बाजार किंवा हस्तकला प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा, स्थानिक विषयांवर कार्यशाळा किंवा परिषदा, स्थानिक कलाकारांच्या मैफिली, खाद्य उत्सव इत्यादि.

**२) स्थानिक विविध प्रवाह:**

स्थानिक प्रवाह लोकप्रिय सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक घटक अथवा शैलींचा संदर्भ देतात जे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामधील असतात. हे प्रवाह सहसा स्थानिक समाजाची वैभवशाली वैशिष्ट्ये, प्राधान्ये आणि मूल्ये प्रतिबिंबित करतात. उदा. शहर किंवा विशिष्ट प्रदेशातील फॅशन ट्रेंड, स्थानिक संगीत दृश्ये किंवा शैली, लोकप्रिय स्थानिक पदार्थ किंवा पाककृती, वैभवशाली वास्तुशैली, स्थानिक कला किंवा हस्तकला, लोकप्रिय मैदानी कार्यक्रम अथवा खेळ, स्थानिक बोलीभाषा इत्यादिचा समावेश होतो.

**३) स्थानिक सामाजिक सुधारणा:**

स्थानिक सामाजिक सुधारणा ह्या सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामध्ये, जसे की गाव, शहर किंवा प्रदेशातील व्यक्ती आणि समाजाचे कल्याण करण्याच्या उद्देशाने केलेला प्रयत्न असतो. या सुधारणा अनेकदा स्थानिक चिंता, गरजा आणि प्राधान्यक्रम यावर लक्ष केंद्रित करतात.

### ५) स्थानिक कला व कलाकृती:

कलाकृती आणि स्थानिक ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वस्तू, दस्तऐवज आणि इतर साहित्याचा संदर्भ देतात आणि गाव, शहर अथवा प्रदेश यासारख्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्राचा इतिहास सांगतात. या कलाकृती भूतकाळातील मौल्यवान नविन आयाम देऊ शकतात, स्थानिक समाजाला आकार देणारे लोक, घटना आणि संस्कृतींबद्दल माहिती प्रकट करतात. याची नोंद आपण स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून घेवू शकतो. उदा. ऐतिहासिक वास्तू, इमारती, स्मारके, स्थानिक कलाकृती आणि प्रदर्शने दर्शवणारी संग्रहालये अथवा संग्रह, छायाचित्रे, दस्तऐवज किंवा स्थानिक कार्यक्रम आणि लोकांची कागदपत्रे, मौखिक इतिहास अथवा कथा, स्थानिक कलाकृती, हस्तकला किंवा पारंपारिक पद्धती, पुरातत्व शोध किंवा ऐतिहासिक स्थळे, विंटेज कपडे, फर्निचर किंवा घरगुती वस्तू, स्थानिक वर्तमानपत्रे, नियतकालिके किंवा प्रकाशने, ऐतिहासिक नकाशे किंवा सर्वेक्षण, वैयक्तिक संग्रह किंवा कौटुंबिक वारसाहक्क इत्यादि. स्थानिक कलाकृती आणि स्थानिक इतिहासाचे अतिशयजवळचे नाते आहे. स्थानिक कलाकृतींच्या अभ्यासातून संशोधक सांस्कृतिक वारसा जतन करू शकतो, भूतकाळ आणि वर्तमानावर त्याचा प्रभाव समजून घेण्यास मदत करते, इतिहास, संस्कृती आणि समाजाबद्दल ज्ञान वाढवते, स्थानिक इतिहास आणि वारसा यामध्ये स्वारस्य असलेल्या पर्यटकांना आकर्षित करते, ऐतिहासिक स्थळे आणि कलाकृतींचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्नांना चालना देते, स्थानिक लोकांना त्यांच्या समाजाचा वारसा आणि परंपरांशी जोडते, कला, साहित्य आणि नवकल्पना प्रभावित करते, इतिहासकार, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी इतिहासाची साधने उपलब्ध करून देतात, स्थानिक लोकांच्या, घटनांच्या आणि अनुभवांच्या आठवणी जिवंत ठेवतात. कलाकृती आणि स्थानिक इतिहास हे समाजाच्या ओळखीचे आवश्यक घटक आहेत, जे त्याच्या भूतकाळाशी एक ठोस स्वरूपाचा संबंध निर्माण करतात.

### ६) मौखिक स्थानिक इतिहास

स्थानिक माहिती, घटना, तपशील पहाण्यासाठी प्राथमिक, दुय्यम साधनांबरोबरच मौखिक साधनांचाही वापर स्थानिक इतिहासामध्ये केला जातो. जसे की दंतकथा, आख्यायिका, स्मृती, आठवणी जतन केल्या तरी समकालीन घटनेशी संबंधित वृद्ध व प्रौढ व्यक्तीच्या मुलाखतींद्वारे स्थानिक इतिहासाची जडणघडण करता येणे शक्य आहे. स्थानिक इतिहासामध्ये मानवी जीवनाशी निगडित असलेल्या समग्र घटकांचा विचार केला जातो. अरुण टिकेकर म्हणतात की, ऐतिहासिक घटनांच्या सनावळीवरून वा ऐतिहासिक संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या आयुष्यक्रमावरून महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास न लिहिता तो सांस्कृतिक केंद्र झालेल्या महाराष्ट्रातील शहरांच्या इतिहासाच्या साहाय्याने लिहिला तर तो बराच वेगळा होईल. अधिक वाचनीय व आकर्षक होईलच, पण कदाचित ऐतिहासिक वास्तवांच्या अधिक जवळ जाणाराही होईल.

### ७) आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन:

स्थानिक इतिहास संशोधनामध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन आवश्यक आहे. स्थानिक इतिहास संशोधनासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनामध्ये भूतकाळाची अधिक व्यापक समज मिळविण्यासाठी अनेक क्षेत्रांमधील संशोधन पद्धती आणि दृष्टीकोन एकत्र केल्या जातात. उदा.

१) इतिहास: प्राथमिक साधनांचे विश्लेषण, संदर्भीकरण आणि वर्णनात्मक रचना

२) पुरातत्व: साहित्य संस्कृती विश्लेषण, उत्खनन आणि भौगोलिक अथवा अवकाशीय विश्लेषण

३) मानववंशशास्त्र: एथनोग्राफिक संशोधन, सांस्कृतिक विश्लेषण आणि सामाजिक प्रतिबद्धता

४) समाजशास्त्र: सामाजिक संरचना विश्लेषण, लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास आणि सामाजिक परिवर्तनशिलता

५) भूगोल: भौगोलिक विश्लेषण, मॅपिंग आणि पर्यावरणीय अभ्यास

६) साहित्य: भाषा व मजकूर विश्लेषण, साहित्यिक टीका आणि वर्णनात्मक माहिती

७) कला इतिहास: व्हिज्युअल विश्लेषण, प्रतिमाशास्त्र आणि भौतिक संस्कृती अभ्यास

८) मौखिक इतिहास: मुलाखत, प्रतिलेखन आणि वर्णनात्मक विश्लेषण

९) डिजिटल मानवता: डिजिटल संग्रहण, डेटा विश्लेषण आणि डिजिटल कथा सांगणे

स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी संशोधकाने आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारल्यास त्यास खालील फायदे होण्याची शक्यता असते.

१) समग्र समज: भूतकाळाचे अधिक संपूर्ण चित्र तयार करण्यासाठी अनेक दृष्टीकोन एकत्र करते

२) संशोधन विविधता: डेटा गोळा करण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी विविध पद्धती वापरतात

३) सामाजिक प्रतिबद्धता: संशोधन प्रक्रियेत स्थानिक समुदायांचा समावेश होतो

४) नाविन्यपूर्ण अंतर्दृष्टी: विषयांमधील सर्जनशील संबंध वाढवते

५) वर्धित विश्वासार्हता: अंतःविषय सहकार्याद्वारे कठोरता आणि खोली दर्शवते

आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारून, स्थानिक इतिहास संशोधन अधिक सूक्ष्म, अचूक आणि आकर्षक बनू शकते, शेवटी भूतकाळाबद्दलची आपली समज आणि वर्तमानाशी त्याची प्रासंगिकता समृद्ध करते. जसे की;

१) इतिहास: कालक्रमानुसार विश्लेषण, अभिलेखीय संशोधन आणि ऐतिहासिक संदर्भ.

२) समाजशास्त्र: सामाजिक रचना, संस्था आणि संबंध.

३) मानववंशशास्त्र: सांस्कृतिक पद्धती, परंपरा आणि सामाजिक परिवर्तनशिलता.

४) अर्थशास्त्र: स्थानिक अर्थव्यवस्था, व्यापार आणि संसाधन व्यवस्थापन.

५) भूगोल: भौगोलिक विश्लेषण, पर्यावरणीय घटक आणि प्रादेशिक वैशिष्ट्ये.

६) राज्यशास्त्र: शासन, सत्ता परिवर्तन, आणि धोरण प्रभाव.

७) एथनोग्राफी: सहभागी निरीक्षण, मुलाखती आणि सामाजिक प्रतिबद्धता.

८) पुरातत्व: भौतिक संस्कृती, कलाकृती आणि ऐतिहासिक स्थळे.

स्थानिक इतिहासातील आंतरविद्याशाखीय संशोधनामधून संशोधक खालील घटकावर प्रकाश टाकू शकतो जसे की;

१) स्थानिक समाजावर वसाहतवादाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा अभ्यास करणे.

२) स्थानिक सण-उत्सव आणि परंपरा यांचे सांस्कृतिक महत्त्व व विश्लेषण.

३) पर्यावरणीय घटक आणि कृषी पद्धती यांच्यातील संबंधांचे परीक्षण करणे.

४) सामाजिक गतिशीलता तयार करण्यात स्थानिक संस्थांची भूमिका तपासणे.

५) स्थानिक हस्तकला यांचा इतिहास आणि सांस्कृतिक महत्त्व यांचे दस्तऐवजीकरण.

स्थानिक इतिहास लेखांनाचा उपयोग खालील कारणांच्यासाठी देखील केला जाऊ शकतो; जे स्थानिक इतिहासाच्या स्वरूपामध्ये समाविष्ट आहे.

**१) स्थानिक ओळख जतन करणे;**

- स्थानिक प्रथा, परंपरा आणि सांस्कृतिक पद्धतींचे दस्तऐवजीकरण करणे.
- मौखिक इतिहास आणि वैयक्तिक कथा नोंद करणे.
- ऐतिहासिक स्थळे, स्मारके आणि कलाकृतींचे जतन करणे.

**२) सामाजिक प्रतिबद्धता वाढवणे:**

- स्थानिक इतिहास, उत्सव, कार्यक्रम आणि प्रदर्शनांचे आयोजन करणे.
- समाजाच्या नेतृत्वाखालील ऐतिहासिक संशोधन आणि दस्तऐवजीकरणांना प्रोत्साहन देणे.
- स्थानिक इतिहासावर आधारित शैक्षणिक कार्यक्रम विकसित करणे.
- स्थानिक समाज, इतिहासकार आणि सांस्कृतिक संस्थांमधील सहकार्य वाढवणे.

**३) स्थानिक समुदायांना सक्षम करणे:**

- उपेक्षितांना आवाज आणि त्यांचा कथांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
- स्थानिक अभिमान आणि इतिहासाच्या मालकीचा प्रचार करणे.
- समुदायाच्या नेतृत्वाखालील वारसा संवर्धनाच्या प्रयत्नांना समर्थन देणे.

**४) सांस्कृतिक देवाणघेवाण समजून घेणे:**

- व्यापक प्रेक्षकांना स्थानिक इतिहास आणि संस्कृतीचे प्रदर्शन.
- आंतर-समुदाय संवाद आणि देवाणघेवाण प्रोत्साहित करणे.
- सामायिक ऐतिहासिक अनुभवांद्वारे सहानुभूती आणि समज वाढवणे.

स्थानिक इतिहास व्यापक ऐतिहासिक प्रवाह आणि विषयांना अंतर्दृष्टी प्रदान करू शकतो, जसे की:

१) वसाहतवाद आणि स्थानिक समाजांवर त्याचा प्रभाव

२) राष्ट्रवादी चळवळी आणि स्थानिक प्रतिकार

३) सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक बदल

४) आर्थिक विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम

५) जात, वर्ग आणि लिंग यांची परिवर्तनशिलता

६) पर्यावरण इतिहास आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन

७) शहरीकरण आणि त्याचा स्थानिक समाजावर होणारा परिणाम

**८) धार्मिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण**

**प्रादेशिक इतिहासातून स्थानिक इतिहासाकडे :–**

इतिहासाची व्याप्ती स्थल व काल सापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी याची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते किंवा स्थलाच्या निकषावर केली जाणारी विभागणी जशी की जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वि. का. राजवाडे यांनी देशिक प्रकार नमूद केलेला आहे. यामध्ये त्यांना विशिष्ट भूप्रदेशाचा म्हणजेच प्रादेशिक इतिहास अभिप्रेत होता, तर प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून स्थानिक इतिहासाची ओळख आहे. प्रादेशिक इतिहासाच्या मांडनीतून राष्ट्रीय इतिहास आकारास येतो. मात्र राष्ट्राच परिपूर्ण व सुसंगत इतिहास साकारण्यासाठी प्रादेशिक व स्थानिक इतिहास महत्व पूर्ण ठरतो. यासंदर्भात डॉ. राजा दिक्षित यांनी प्रादेक्षिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे हे म्हणतात की, ''इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो, त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय.'' दिक्षित पुढे असे म्हणतात की, प्रादेशिक इतिहासात भौगोलिकतेला महत्व असले, तरी मानसिकता व संस्कृती अधिक महत्वाची असते. मात्र प्रादेशिक इतिहास हा संकुचित प्रादेशिकतावादी असता कामा नये हे पथ्य पाळणे महत्वाचे आहे असे ते आवर्जून नमूद करतात

२० व्या शतकात प्रादेशिक इतिहास ही संकल्पना उदयास येवून इतिहास संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग बनली. प्रादेशिक इतिहासाचे सूक्ष्म अध्ययन करण्यासाठी त्याची लहान–लहान भागात विभागणी केली गेली. ज्यातून स्थानिक इतिहास या संकल्पनेचा उदय झाला. आज संशोधकाचे आवडीचे क्षेत्र म्हणून स्थानिक इतिहासाकडे पाहीले जाते. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर, स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहीला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) कोल्हापूरची खाद्य संस्कृती हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) अनुराधा तेंडुलकर ब) सलमा हसन

क) पु. पा. गोखले ड) यापैकी नाही

२) लिखित वडार समाज आणि संस्कृती, आणि संस्कृती हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) अनुराधा तेंडुलकर ब) सलमा हसन

क) पु. पा. गोखले ड) सतीश पवार

३) Lineage Structure and Change in a Gujarat Family in "Family, Kinship and Marriages in India'' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) अनुराधा तेंडुलकर ब) सलमा हसन

क) ए. एम. शहा ड) सतीश पवार

४) The Shadows : Unknown Craftsmen of Bengal हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

अ) पायल मोहनका ब) सलमा हसन क) ए. एम. शहा ड) सतीश पवार

५) सामान्य लोकांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तींचा अभ्यास करण्यासाठी साधन कोणते.

अ) लोकसंगीत ब) नृत्य क) कला ड) वरील सर्व

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) स्थानिक इतिहासाचे मुख्य लक्ष्य केंद्र कोणते आहे.

२) सण–उत्सव परंपरा कोणत्या ऐक्याला प्रोत्साहन देते.

३) The King's 'Craftsmen- History of the Ivory Carvers of Thiruvananthapuram हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

४) एखाद्या प्रदेशाच्या सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग कोणता असतो.

५) एखाद्या समजाच्या सांस्कृतिक वारसा आणि परंपरांचे प्रतिनिधित्व कोण करते असे मानले जाते.

### १.२.३ उद्देश आणि महत्व (Purpose and Importance):

स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश विशिष्ट प्रदेश, समाज, गाव अथवा शहराच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणे, जतन करणे आणि त्याचा अर्थ लावणे हा आहे. स्थानिक इतिहास एका विशिष्ट क्षेत्रातील अद्वितीय अनुभव, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यावर लक्ष केंद्रित करतो. विविध क्षेत्रातील स्थानिक व्यक्ती, विविध कार्यक्रम आणि संस्थां यांच्या कार्य आणि योगदानांवर प्रकाश टाकणे हा याचा

प्रमुख उद्देश आहे. स्थानिक इतिहासाचे विविध कारणांनी महत्त्व वाढते आहे; स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून स्थानिक सांस्कृतिक वारसा आणि समाजाची ओळख जपता येते. राष्ट्रीय आणि जागतिक घटना समजून घेण्यासाठी स्थानिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न करता येतो. स्थानिक समाजाचा अभिमान आणि विशिष्ट क्षेत्रातील त्यांची मालकी वाढविण्यास मदत होते. गाव, शहर यांचे नियोजन, विकास आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जमा करण्यास देखील मदत होते. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून स्थानिक सांस्कृतिक विविधता आणि सर्वसमावेशकतेला यामुळे प्रोत्साहन देण्यास हातभार मिळतो. स्थानिक इतिहासाच्याद्वारे समाजामध्ये जबाबदारी वाढीस लावण्यास आणि त्यांच्या सहभागास प्रोत्साहन देण्यास मदत होते. सर्वात महत्वाचे म्हणजे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी चिरस्थायी वारसा जतन होण्यास मदत होते. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करून, आपण आपल्या सभोवतालची सखोल माहिती मिळवू शकतो, आपल्या सांस्कृतिक वारशाच्या प्रशंसा करू शकतो आणि आपल्या समाजाच्या भविष्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय देखील घेऊ शकतो.

**अ) स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश :–**

इतिहास संधोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. आपण त्या गावात लहानाचे मोठे झालो त्या गावाबद्दलची देखील माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्ती समूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तानी राज्य केलेले आहे, त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खानाखुना अनेक गावागावात विखुरलेल्या आहेत. बऱ्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैशिष्ट्यामुळे प्रसिध्दीस आलेले असते त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे.

**१) स्थानिक समाजाचा वारसा जतन करणे:**

स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून संशोधक एखाद्या समजामध्ये प्रचलित असलेल्या कथा, त्यांच्या परंपरा आणि सांस्कृतिक ओळख जतन करण्यास मदत करू शकतो. भारतीच्या विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात, स्थानिक इतिहासाद्वारे सामाजिक वारसा जतन करणे अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण आहे;

**१) वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा:** भारत हा विविध संस्कृती, धर्म आणि भाषा अशा बहूअंगी संकृतीचा एक मेल्टिंग पॉट आहे. स्थानिक इतिहास प्रत्येक समाजाच्या वैभवशाली परंपरा व रीतिरिवाजांचे जतन करण्यास मदत करतो.

**२) मौखिक परंपरा:** अनेक भारतीय समजामध्ये समृद्ध मौखिक परंपरा आणि वारसा आहे जो पिढ्यानपिढ्याने जतन केलेला आहे. स्थानिक इतिहास या सर्व घटकांचे दस्तऐवजीकरण करण्यात मदत करतो, त्यांचे अस्तित्व सुनिश्चित करततो.

**३) सांस्कृतिक ओळख:** स्थानिक इतिहास स्थानिक समाजाला त्यांची विशिष्ट सांस्कृतिक ओळख पटवून देण्यास मदत करतो, जो प्रचलित अथवा प्रस्थापित कथनांपेक्षा वेगळा आहे.

**४) स्वदेशी ज्ञानाचे संरक्षण:** स्थानिक इतिहासलेखन हे स्थानिक पारंपारिक ज्ञान, पद्धती आणि कौशल्ये जतन करण्यास व प्रोत्साहित करण्यास मदत करतो; जसे की स्थानिक औषधे, हस्तकला आणि शेती पद्धती इत्यादि.

**५) सामाजिक प्रतिबद्धता:** स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण करण्यामध्ये स्थानिक समाजातील लोकांचा सहभाग महत्वाचा असतो, त्यांच्या वारसाबद्दल, मालकी बाबत आणि अभिमानाची भावना वाढवणे आणि त्यांच्यामध्ये सामाजिक प्रतिबद्धता निर्माण होण्यास मदत होते.

**६) एकजिनसीपणाचा प्रतिकार करणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक विविधतेला आणि सर्वसमावेशकतेला चालना देण्यास मदत करतो आणि संस्कृतींच्या एकजिनसीपणाला विरोध देखील करू शकतो.

**७) सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची माहिती देणे:** स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यामातून ढासळत चाललेल्या सांस्कृतिक प्रथा आणि परंपरांचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नांची माहिती देण्यास हातभार लावतो.

**८) उपेक्षित समाजाचे सक्षमीकरण:** स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यामातून स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण हे उपेक्षित समाजांना सक्षम बनवू शकते, त्यांच्या अनुभवांना आणि संघर्षांना आवाज देण्याचे काम यामधून होवू शकते.

**९) पर्यटन आणि विकासाला चालना देणे:** स्थानिक इतिहास पर्यटनाला चालना देऊ शकतो, स्थानिक अर्थव्यवस्था आणि विकासाला पाठिंबा देऊ शकतो. स्थानिक यश आणि योगदानाचे प्रदर्शन पर्यटकांना आकर्षित करते, स्थानिक अर्थव्यवस्थांना आधार देते.

**१०) भावी पिढ्यांना शिक्षित करणे:** स्थानिक इतिहास तरुण पिढ्यांना त्यांच्या समाजाच्या भूतकाळाबद्दल जागरूक करतो, सांस्कृतिक सातत्य सुनिश्चित करतो.

थोडक्यात, भारतामधील विविधतेतील एकता राखण्यासाठी, सांस्कृतिक समज वाढवण्यासाठी आणि स्थानिक समाजाला अधिक सशक्त करण्यासाठी स्थानिक इतिहासाद्वारे सामुदायिक वारसा जतन करणे हे स्थानिक इतिहासाचा प्रमुख उद्देश आहे.

२) **स्थानिक अभिमानाला चालना देणे:**

स्थानिक इतिहासलेखन स्थानिक पातळीवरील विविध क्षेत्रात काम केलेल्या आणि करणाऱ्या व्यक्ती अथवा घटनांच्या उपलब्धी आणि योगदानावर प्रकाश टाकून, स्थानिक इतिहास समाजाचा अभिमान वाढविण्यास मदत करतो. स्थानिक इतिहासाद्वारे स्थानिक अभिमानाचा प्रचार करणे जा देखील महत्त्वपूर्ण उद्देश आहे:

**१) स्थानिक नेते अथवा नायक प्रकाशात आणणे:** स्थानिक पातळीवरील स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नेते अथवा नायक यांच्यासारख्या स्थानिक व्यक्तींच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकून स्थानिक समाजाचा अभिमान वाढवते.

**२) सांस्कृतिक उपलब्धी प्रदर्शित करणे:** कला, साहित्य, संगीत आणि नृत्यातील स्थानिक योगदानांचे दस्तऐवजीकरण करणे आणि त्याच्यामाध्यायांतून स्थानिक सांस्कृतिक वारशाचा अभिमान वाढवणे.

**३) स्थानिक घटनांचे स्मरण करणे:** महत्त्वाच्या स्थानिक घटना, जसे की लढाया, हालचाली किंवा सण- उत्सवाची वैशिष्ठ्ये अधोरेखित करणे, त्या-त्या समाजाची ओळख मजबूत करणे.

**४) उपेक्षित समाजाचे सक्षमीकरण:** स्थानिक पातळीवरील दलित, आदिवासी अथवा स्त्रिया यांच्यासारख्या उपेक्षित समाजाच्या कामगिरीवर प्रकाश टाकणे, याच्या माध्यामातून त्यांचा अभिमान आणि स्वाभिमान वाढवते.

**५) प्रादेशिक ओळख वाढवणे:** स्थानिक इतिहास राष्ट्रीय किंवा जागतिक संलग्नतेपेक्षा वेगळी प्रादेशिक ओळख मजबूत करण्यास मदत कतो.

**६) सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणे:** स्थानिक इतिहास समाजाच्या लोकांना त्यांचा वारसा जतन, संवर्धन आणि साजरा करण्यासाठी व सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतो.

**७) भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा:** स्थानिक इतिहास लेखन स्थानिक तरुणांना त्यांच्या पूर्वसुरींच्या कामगिरीचे अनुकरण करण्यास प्रेरित करतो.

**८) प्रबळ घटना अथवा कथांचा विरोध करणे:** स्थानिक इतिहासलेखन प्रबळ राष्ट्रीय किंवा जागतिक घटना अथवा कथांना आव्हान देण्याचे काम करून स्थानिक दृष्टीकोनांना आवाज देतो.

**९) सामाजिक बंध मजबूत करणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक अभिमान जागृत करण्याचे काम करू शकतो, असे केल्याने सामाजिक बंध मजबूत होतात, सामाजिक एकता आणि दृढता वाढीस लागण्यास हातभार लागतो. भारतात, स्थानिक इतिहासाद्वारे स्थानिक अभिमानाचा प्रचार करणे आवश्यक आहे:

थोडक्यात, स्थानिक इतिहास भारताच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतीचा धागा बळकट करून स्थानिक समाजाचा अभिमान वाढवतो.

**३) भावी पिढ्यांना शिक्षित करणे:**

स्थानिक इतिहासलेखन स्थानिक तरुण पिढ्यांना त्यांच्या समाजाच्या भूतकाळाबद्दल माहिती देतो, त्यांना त्यांची पाळेमुळे समजून घेण्यास मदत करतो.

**१) सांस्कृतिक पाळेमुळे समजून घेणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक तरुणांना त्यांचा सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि मूल्यांशी जोडण्यास मदत करतो.

**२) कौटुंबिक वारसा जतन करणे:** स्थानिक इतिहासाच्या माध्यामातून कौटुंबिक इतिहास आणि वंशावळीचे दस्तऐवजीकरण करून तो आपला वैयक्तिक वारसा आणि सांस्कृतिक ओळख जतन करू शकतो.

**३) भूतकाळातून शिकणे:** स्थानिक इतिहासाचा अभ्यास केल्याने सामाजिक संघर्ष, यश आणि लवचिकता याबद्दल मौल्यवान धडे मिळण्यास मदत होते.

**४) सामाजिक सहभाग वाढवणे:** स्थानिक इतिहासाच्या जतनामध्ये तरुण पिढीचा समावेश केल्याने स्थानिक समाजाचा सहभाग वाढविणे आणि त्यांना प्रोत्साहन देण्यास मदत करतो.

**५) सांस्कृतिक संवेदनशीलतेला चालना देणे:** स्थानिक इतिहास स्थानिक परंपरा समजून घेणे, सांस्कृतिक संवेदनशीलता, सहिष्णुता आणि प्रशंसा यांना प्रोत्साहन देतो.

**६) समकालीन समस्यांची माहिती देणे:** स्थानिक इतिहास वर्तमान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांसाठी संदर्भ प्राप्त करून देतो. यातून माहितीपूर्ण निर्णय घेण्यास स्थानिकांना सक्षम करतो.

**७) वारसा संवर्धनाला प्रोत्साहन देणे:** तरुण पिढीला स्थानिक इतिहास आणि वारसा याविषयी शिक्षित करणे संवर्धन आणि जतन करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देततो.

**८) शैक्षणिक संशोधनाला सहाय्यक:** स्थानिक इतिहासलेखन शैक्षणिक संशोधनासाठी मौल्यवान प्राथमिक संदर्भ तयार करतो ज्यातून पुढे भारतीय इतिहासलेखन समृद्ध होवू शकते.

थोडक्यात; स्थानिक इतिहासलेखन अथवा स्थानिक इतिहासाचे अध्यापन करून स्थानिक तरुण त्यांचा सांस्कृतिक वारसा आणि समाजिक वारशाशी जोडलेले आहेत की नाहीत याची खात्री करू शकतात.

**४) सामाजिक सहभाग:**

स्थानिक इतिहासलेखन करण्यासाठी स्थानिक समाजातील लोकांच्याकडून कथा, आठवणी गोळा करण्यासाठी सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणे समाविष्ट आहे. यामुळे खालील गोष्टी साध्य करता येतील;

**१) मौखिक परंपरांचे जतन:** स्थानिक समाजातील विविध विषयाशी निगडीत विविध कथा, दंत कथा आणि आठवणी एकत्रित केल्याने भारताच्या समृद्ध मौखिक परंपरा जतन करण्यात मदत होईल.

**२) सामुदायिक मालकीची भावना:** स्थानिक इतिहासाच्या जतनामध्ये विविध सामाजातील सदस्यांचा समावेश केल्याने सामुदायिक मालकी आणि जबाबदारीची भावना वाढीस लागण्यास मदत होईल.

**३) वैविध्यपूर्ण दृष्टीकोन:** विविध सामाजातील सदस्यांकडून कथा एकत्रित केल्याने विविध दृष्टिकोन आणि अनुभवांचे प्रतिनिधित्व केले जाईल याची खात्री होते.

**४) आंतर–जनरेशन कनेक्शन:** स्थानिक इतिहास वृद्ध आणि तरुण पिढ्यांना एकत्र आणतात, यातून सामाजिक बंध मजबूत होतात.

**५) सांस्कृतिक पुनरुज्जीवन:** स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरणाच्या माध्यमातून समाजातील लुप्त होत चाललेल्या सांस्कृतिक प्रथा आणि परंपरांचे पुनरुज्जीवन करणे.

**६) सामाजिक सामंजस्य**: स्थानिक इतिहासाद्वारे सामाजिक बांधिलकी, सामाजिक एकता, ऐक्य आणि सहकार्य वाढवते.

**७) उपेक्षितांचे आवाज** : स्थानिक इतिहास लेखांच्या माध्यमातून उपेक्षितांच्या आवाजाची नोंद होवू शकते ज्यामुळे सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाला प्रोत्साहन मिळणे शक्य होईल.

**८) सामाजिक उपक्रमांना चालना:** स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यायांतून विविध समाजातील उपक्रमांना प्रेरणा मिळू शकते, या गोष्टी सकारात्मक बदल आणि विकासाला चालना देतात.

थोडक्यात; स्थानिक इतिहासाच्या जतनामध्ये विविध समाजातील सदस्यांचा समावेश करून, त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करणे शक्य होईल, यातून सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत होईल.

**५) समकलीन समस्यांसाठीचे संदर्भ:**

स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून समकालीन समस्याचे संदर्भ आणि आव्हानांच्या विकासासाठी अंतर्दृष्टी निर्माण होण्यास मदत होते.

भारतीय संदर्भात, स्थानिक इतिहास वर्तमान समस्या आणि आव्हानांना अनेक प्रकारे संदर्भ प्रदान करतो:

**१) जातीची परिवर्तनशिलता समजून घेणे** (Understanding caste dynamics): स्थानिक इतिहास जातिव्यवस्थेची उत्क्रांती, त्यांचा समाजावर होणारा परिणाम आणि वर्तमान सामाजिक उतरंड समजून घेण्यास मदत करतो.

**२) वसाहतवादी वारसा:** स्थानिक इतिहास भारतीय समाज, अर्थव्यवस्था आणि राजकारणावर वसाहतवादाचे परिणाम विशद करतो, आणि समकालीन प्रेरक सत्ताशक्तीच्या चर्चेची माहिती देण्यास मदत करतो.

**३) पर्यावरणविषयक चिंता:** स्थानिक इतिहासलेखन पारंपारिक शाश्वत पद्धतींवर प्रकाश टाकतो, ज्यामुळे संवर्धन, प्रदूषण आणि हवामान बदल यासारख्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यात मदत होते.

**४) प्रादेशिक ओळख आणि राजकारण:** स्थानिक इतिहास प्रादेशिक अस्मिता, राजकीय तणाव आणि फुटीरतावादी चळवळी समजून घेण्याची माहिती देण्यास मदत कारतो.

**५) सामाजिक आणि आर्थिक विकास:** स्थानिक इतिहास विकास उपक्रमांच्या प्रभावाची अंतर्दृष्टी देण्याचे काम करतो, सर्वसमावेशक वाढीसाठी धोरणे सुधारण्यास मदत करतो.

**६) जमीन आणि साधनांचे हक्क:** स्थानिक इतिहासलेखन आपणास स्थानिक जमिनीची मालकी, साधंनांचे व्यवस्थापन आणि स्थानिक समजाच्या हक्कांवरील चर्चेची माहिती देतो.

**७) स्थलांतर आणि शहरीकरण:** स्थानिक इतिहास स्थलांतराचे स्वरूप, शहरीकरण आणि त्यांचे सामाजिक व आर्थिक परिणाम समजून घेण्यासाठी संदर्भ प्रदान करतो.

**८) धोरण तयार करणे:** स्थानिक इतिहास स्थानिक संदर्भ, गरजा आणि आव्हाने यांची सूक्ष्म माहिती घेवून धोरणात्मक निर्णयांची माहिती देतो.

थोडक्यात; स्थानिक इतिहासाचा अभ्यास करून समकालीन स्थानिक समस्यांची गुंतागुंत अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात आणि त्यांच्या संदर्भांमध्ये प्रभावी उपाय योजना निर्माण करण्यास मार्गदर्शन करू शकतात.

**६) ऐतिहासिक संशोधनाला सहाय्यक:**

स्थानिक इतिहास व्यापकदृष्टीकोणातून ऐतिहासिक संशोधनात योगदान देतो, अनन्यसाधारण दृष्टीकोन आणि प्राथमिक साधने यातून उपलब्ध करू शकतो;

**१) प्रादेशिक दृष्टीकोन:** स्थानिक इतिहास राष्ट्रीय स्तरीय ऐतिहासिक घटनांना पूरक असा प्रादेशिक इतिहासाची दृष्टी निर्माण करतो.

**२) प्राथमिक साधने :** स्थानिक इतिहास विविध हस्तलिखिते, दस्तऐवज आणि मौखिक परंपरा यांसारखे प्राथमिक साधने तयार करतो, ज्यामुळे ऐतिहासिक संशोधन समृद्ध होण्यास मदत होते.

**३) सूक्ष्म-इतिहास:** स्थानिक इतिहास सूक्ष्म-इतिहासांवर लक्ष केंद्रित करतो, विशिष्ट घटना, समाज अथवा पद्धतींची तपशीलवार ज्ञान देण्याचे ते एक महत्वाचे साधन आहे.

**४) ऐतिहासिक पोकळी अथवा अंतर भरून काढणे** (Filling historical gaps): स्थानिक इतिहास भारतीय इतिहासलेखनामधील जे छोटी-छोटी पोकळी आहे की जी संदर्भ साधनाच्या अभावाने भरता येत नाही ती ऐतिहासिक पोकळी अथवा अंतर भरून काढण्याचे काम स्थानिक इतिहास करतो. विशेषत: उपेक्षित समाज आणि प्रादेशिक इतिहासाबाबत.

थोडक्यात; स्थानिक इतिहासाचे अभ्यास करून, इतिहासकार अथवा स्थानिक संशोधक देशाच्या गुंतागुंतीच्या भूतकाळाची अधिक व्यापक समज प्राप्त करू शकतात, सूक्ष्म आणि सर्वसमावेशक ऐतिहासिक घटनांना प्रोत्साहन देऊ शकतात.

७) **आपुलकीची भावना निर्माण करणे:**

स्थानिक इतिहास लेखांच्या माध्यमातून विविध समाजातील लोकांना त्यांच्या मूळ स्थानाशी आणि वारशाशी जोडलेले आहोत यासाठी मदत करतो; यासाठी खालील गोष्टी मदत करतात.

**१) स्व ओळख** (Rooting identity): स्थानिक इतिहास व्यक्तींना त्यांची सांस्कृतिक मुळे, परंपरा आणि रीतिरिवाज समजून घेण्यास मदत करतो, स्थानिक ओळखीची तीव्र भावना वाढवतो.

**२) पूर्वजांशी जोडणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक समाजातील लोकांना आपल्या पूर्वजांशी जोडतो आणि सामायिक वारशाची भावना निर्माण करतो.

**३) स्थानिक संस्कृती समजून घेणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक समाजातील लोकांना त्यांच्या स्थानिक संस्कृती, परंपरा आणि पद्धतींचे कौतुक करून सांस्कृतिक अभिमान वाढवण्यास मदत करतो.

**४) सांस्कृतिक मालकीची भावना:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक समाजातील लोकांना त्यांच्या वारसा आणि सांस्कृतिक मालमत्तेबद्दल मालकी आणि जबाबदारीची भावना देतो.

**५) स्थानिक परंपरांचे जतन करणे:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक पारंपारिक प्रथा, चालीरीती आणि विधी यांचे जतन करण्यास मदत करतो, त्यांची निरंतरता सुनिश्चित करतो.

थोडक्यात; स्थानिक इतिहासाचे संशोधन करून, त्यांचे स्थान, वारसा आणि समाजाशी सखोल संबंध विकसित करू शकतात, आपलेपणा आणि सांस्कृतिक ओळखीची भावना वाढवू शकतात.

८) **सांस्कृतिक विविधता जतन करणे:**

स्थानिक इतिहासलेखांच्या माध्यमातून स्थानिक समाजातील लोकांना विविधतेतील एकता जतन करण्यास प्रोत्साहित करतो, आंतर-सांस्कृतिक समज वाढविण्यास मदत करतो.

**१) प्रादेशिक परंपरांचे दस्तऐवजीकरण:** स्थानिक इतिहासलेखन स्थानिक सांस्कृतिक विविधता जतन करून, विविध प्रदेशांच्या उज्ज्वल परंपरा, चालीरीती आणि प्रथांची नोंद करण्यास मदत करतो.

**२) स्थानिक संस्कृती जतन करणे:** स्थानिक इतिहास स्थानिक समुदायांच्या संस्कृतींचे जतन करण्यास, त्यांचा वारसा आणि ओळख यांचे संरक्षण करण्यास मदत करतो.

**३) भाषिक विविधतेचे जतन:** स्थानिक इतिहासलेखन विविध भाषिक विविधतेचे जतन आणि दस्तऐवज तयार करण्यास आणि विविध प्रादेशिक भाषा आणि बोलींचे जतन व प्रोत्साहन देण्यास मदत करतो.

**४) सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन:** स्थानिक इतिहास विविध समाजातील सांस्कृतिक देवाणघेवाण, सांस्कृतिक पद्धती आणि परंपरा समृद्ध करण्यास प्रोत्साहन देतो.

**५) पारंपारिक कलांचे जतन करणे:** स्थानिक इतिहासलेखन पारंपारिक कला, हस्तकला आणि संगीत यांचे जतन करण्यास मदत करतो, त्यांची निरंतरता सुनिश्चित होण्यास मदत होते.

थोडक्यात; स्थानिक इतिहास जतन करून, भारतीय त्यांच्या समृद्ध सांस्कृतिक विविधता जतन आणि संरक्षित करू शकतात, वैविध्यपूर्ण आंतर-सांस्कृतिक समज आणि एकात्म राष्ट्रीय ओळख निर्माण करुण्यास मदत होते.

**९) ग्राम, शहरी नियोजन आणि विकास:**

स्थानिक इतिहासलेखनाच्या ग्राम, शहर, नगर यांचे नियोजन, विकास आणि समाजाचा विस्तार याच्या संदर्भात माहिती देण्यास मदत करतो.

स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून ग्राम, शहरी, नगर नियोजन आणि विकासाची माहिती जमा करण्यासाठी पुढील घटकांचा अभ्यास होणे आवश्यक आहे;

**१) वारसा संवर्धन:** स्थानिक इतिहास सांस्कृतिक वारसा स्थळे, स्मारके आणि वास्तुकला ओळखण्यात आणि संरक्षित करण्यात मदत करतो, शहरी विकासादरम्यान त्यांचे संरक्षण सुनिश्चित करतो.

**२) प्रासंगिग रचना:** स्थानिक इतिहासलेखन ग्रामीण आणि शहरी रचनेची माहिती देतो, नवीन घडामोडी स्थानिक संस्कृती, वास्तुकला आणि परंपरा यांच्या प्रती आदर करण्यास प्रोत्साहित करून त्यांना प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करतो.

**३) सामाजिक सहभाग:** स्थानिक इतिहासामध्ये समुदाय सदस्यांचा शहरी नियोजनात समावेश होतो, त्यांच्या गरजा, चिंता आणि आकांक्षा पूर्ण केल्या जातात का याची खात्री करतो.

**४) शाश्वत विकास:** स्थानिक इतिहास पाणी साठवण आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या पारंपारिक पद्धतींवर प्रकाश टाकून शाश्वत विकासाला प्रोत्साहन देतो.

**५) पायाभूत सुविधांचे नियोजन:** स्थानिक इतिहास पायाभूत सुविधांच्या नियोजनाची माहिती देतो, नवीन प्रकल्प ऐतिहासिक जलमार्ग, वाहतूक मार्ग याची विस्तृत मांडणी करण्याचा प्रयत्न करतो.

**६) सार्वजनिक जागांचे पुनरुज्जीवन करणे:** स्थानिक इतिहास सार्वजनिक जागा, जसे की उद्याने, उद्याने आणि बाजारपेठांचे पुनरुज्जीवन करण्यास मदत करतो, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि सामाजिक महत्त्व पुनर्संचयित करतो.

**७) पारंपारिक उद्योग जतन करणे:** स्थानिक इतिहास पारंपारिक उद्योग जतन उदा. हस्तकला, विणकाम, कापड व्यवसाय, सांस्कृतिक सातत्य आणि आर्थिक विविधतेला प्रोत्साहन देणे.

थोडक्यात; शहरी नियोजनामध्ये स्थानिक इतिहासाचा समावेश करून, नगरे, शहरे त्यांची वैभवशाली सांस्कृतिक ओळख, समजाच्या गरजा आणि पर्यावरणीय संदर्भाचा आदर करतील अशा प्रकारे विकसित होऊ शकतात.

**ब) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्व:**

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता त्याचे विविध दृष्टीकाणातून महत्त्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्यविषय आहेत. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोणातून लिहीलेला असतो. यामध्ये मुख्य वर्ण विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप उदर निर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ठ असतो.

स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषत: स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रीत करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. 'स्थल' इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे. कारण स्थानिक संदर्भ व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोणातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. थोडक्यात, आपण स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून आपण;

१) एखाद्या गावाची, घटनेची, स्थानाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो.

२) स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवधनाचा प्रयत्न करू शकतो.

३) समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो.

४) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो.

५) दुर्लक्षित घटक, प्रथा, रूढी, परंपरा, आचार, विचार, आहार, अलंकार, पोशाख, खाद्य, कथा, पुराणकथा, दंतकथा, म्हणी, वाक्य प्रचार याचा नव्याने विचार करू शकतो.

स्थानिक इतिहासलेखन करताना खालील पैलूचा अथवा घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो ते प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे :-

| भौगोलिक पार्श्वभूमी | ऐतिहासिक पार्श्वभूमी | सामाजिक जीवन | सांस्कृतिक जीवन | आर्थिक जीवन |
|---|---|---|---|---|
| जमीन, जमिनीचे प्रकार | प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक | लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण | सांस्कृतिक संस्था | शेती, शेतीचे प्रकार, औजारे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भौगोलिक सीमा | ऐतिहासिक स्थळे | धर्म/ पंथ | जत्रा, यात्रा, उरूस | पीके, पीक पद्धती |
| नद्या, नाले ओढे, तलाव, विहिरी (पाण्याचे स्त्रोत) | ऐतिहासिक स्मारके | कुटुंब संस्था, सामाजिक स्थित्यंतरे | मनोरंजन, संगीत, गायन, वादन, लोकगीते, गाणी, ओव्या | जलसिंचन, जलसिंचनाचे प्रकार |
| पर्जन्य | घटना विशेष | प्रथा, परंपरा, रूढी, विवाह पद्धती | खेळ, क्रीडा प्रकार (लहान मुलांचे, स्त्रीयांचे व पुरषांचे) | व्यापार, व्यापरी जमाती, व्यापारी माल |
| हवामान | व्यक्ति विशेष | जाती पोतजाती | म्हणी, वाक्य प्रकार | पतपेढी (बँका) |
| जंगल संपदा, पशु पक्षी, वृक्ष संपदा | ऐतिहासिक दंथ कथा | आचार, विचार, निष्ठा, आहार, पोशाख, आभूषणे | भाषा, भाषा प्रकार, बोली, खाद्य संस्कृति | दळणवळण, दळणवळनाची साधने |

### १) ऐततिहासिक घटकः–

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची व्युत्पत्ती गांवाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोकसमजूती इत्यादी महत्त्वाच्या असतात. बर्याचवेळी गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. कोल्हापूर या नावाचा व्युत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर आपणास त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, या इतिहास काळात त्या–त्या गावांचा विकास व जडण–घडण झालेली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्या कारणाने शेकडो, हजारो गावांचा इतिहास शब्दबध्द झालेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या–त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे आहे, यामध्ये नव संशोधकांना अधिक वाव आहे.

### २) भौगोलिक घटकः–

जगातील प्रत्येक देशाला, त्या देशातील राज्यांना, प्रांताना, जिल्ह्यांना, तालुक्यांना काही विशेष प्रसंगी गावांनाही विविध भौगोलिक परिसस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदलही होत जातो, त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगलसंपदा, पशु–पक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्रोत इत्यादीचा अभ्यास केला जावू शकतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करत आधारीत व्यवसाय आणि ज्या असतो, त्यामुळे या भौगोलिक घटकाचा त्या–त्या गावावर काय परीणाम होतो किंवा झालेला आहे याचाही आपण अभ्यास करू शकतो. उदा. नदी, तलाव, ओढे, असलेली गावे, तेथील शेती व शेतीवर गावात नदी, तला, ओढे नाहीत तेथील शेती, शेतीवर आधारीत

व्यवसाय असा तुलनात्मक अभ्यास. कोणात्याही ऐतिहासक घटनेचा अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे आवश्यक असते अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. उदा. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरून कसे निसटले हे त्यांच्या रणचातुर्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच तेथील भौगोलिक परीस्थितीही महत्त्वाची आहे. विशिष्ठ भौगोलिक परिस्थितीचा तेथील पशुपक्षी, शेती, व्यक्ती व व्यक्तीसमूहावर परीणाम होत असतो. त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

**३) सामाजिक घटक:–**

प्रत्येक गावाचा एक विशिष्ठ सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या–त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समावीष्ठ करू शकतो. गावातील लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंब संस्था, कुटुंब संख्येत झालेला बदल, विविध जाती, पोट जाती, पंथ, रूढी–परंपरा, आचार–विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा. काही गावात व जातीत लग्न, प्रथा, विशिष्ठ केल्या जातात. गावामध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकांवरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहीताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री–पुरुष समानता व प्रमाण, मुलींचे शिक्षण, हुंडाप्रथा, विवाह पध्दती इत्यादी संबंधी माहीती नव्याने मांडू शकतो.

**४) सांस्कृतिक घटक:–**

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा, महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, संकेत पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी–देवतांची मंदीरे, दर्गे मशिदी आहेत आणि त्या–त्या गावात विशिष्ठ पध्दतीने त्यांच्या जत्रा–यात्रा साजर्या केल्या जातात, त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ठ खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनांची माध्यमे व कला प्रकार आहेत, त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जावू शकतो. उदा. शिराळा येथील नागपंचमी, कवठेएकंद येथील शोभेची दारू उडवण्याची प्रथा, काही गावात दीपावली, बैल पोळा, पाडवा विविध पध्दतीने साजरा केला जातो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या गावातील सामाजिक–धार्मिक आर्थिक अनुबंध समजावून घेवू शकतो. साहित्तीक–सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो. काही गावातील यात्रा–जत्रा विशिष्ठ संकेताच्या आधारावर संपन्न होतात. याचाही या माध्यमातून अभ्यास होवू शकतो. सांस्कृतिक जीवन हे ज्या कृषी घटकावर आधारीत आहे, ते अनेक सण–समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो.

**५) आर्थिक घटक:–**

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती अर्थात कृषी जीवनावर आधारीत आहे. त्या–त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेती आधारीत जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, जाती आधारीत व्यवसाय, व्यापारी जाती–जमाती इत्यादीचा अभ्यास स्थानिक इतिहास

लेखनांच्या माध्यमातून गावपातळीवर केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्रफळ, लागवडी खालील शेती, हंगाम, पिक पध्दती, शेतीची पध्दती, शेती उत्पादन बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरी, कोळपणी अशा कीतीतरी अंगाने अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेवू शकतो. सांगोला, आटपाडी, मोडनिंब, पंढरपूर, अकलूज येथे पशु–पक्षांचा बाजार भरतो, कोटीच्या धर्तीवर आर्थिक उलाढाल होते. याचाही अभ्यास होवू शकतो. कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथे बिरदेव यात्रेत घोंगड्याचा बाजार भरतो असे आणि कीतीतरी उदाहरणे आपणास सहज पहावयास मिळतात.

**६) राजकीय व प्रशासकीय जीवन:–**

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये एखाद्या गावाचे देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातील योगदान, प्रशासनातील योगदान, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था यांचाही अभ्यास केला जावू शकतो.

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. ३**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) स्थानिक इतिहास लेखांच्या माध्यमातून ......... आवाजाची नोंद होवू शकते.

अ) उपेक्षित ब) कामगार क) कष्टकरी ड) वरील सर्व

२) स्थानिक समाजातील विविध विषयाशी निगडीत विविध ....... एकत्रित केल्याने भारताच्या समृद्ध मौखिक परंपरा जतन करण्यात मदत होईल.

अ) कथा ब) दंत कथा क) आठवणी ड) वरील सर्व

३) स्थानिक इतिहास विविध .......... यांसारखे प्राथमिक साधने तयार करतो

अ) हस्तलिखिते ब) दस्तऐवज क) मौखिक परंपरा ड) वरील सर्व

४) शिराळा येथील .............. प्रसिद्ध आहे.

अ) नागपंचमी ब) बैल पोळा क) शोभेची दारू ड) यापैकी नाही

५) .........हे स्थानिक इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे.

अ) स्थल ब) व्यक्ती क) पर्यावरण ड) यापैकी नाही

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) स्थानिक इतिहास समाजाचा काय वाढविण्यास मदत करतो.

२) स्थानिक इतिहास राष्ट्रीय किंवा जागतिक संलग्नतेपेक्षा कोणती वेगळी निर्माण करतो.

३) प्रत्येक गावाची एक विशिष्ठ एक संरचना असते त्याला काय म्हणतात.

४) कवठेएकंद येथील कोणती प्रथा प्रसिद्ध आहे

५) स्थानिक इतिहास पाणी साठवण आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या पारंपारिक पद्धतींवर प्रकाश टाकून कोणत्या घटकाला प्रोत्साहन देतो.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.
- अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)
- सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.
- मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.
- मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.
- सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.
- पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख
- पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र
- समग्रलक्ष्यी : इतिहासाचा घटनेचा विस्तृत अभ्यास करणे उदा. जागतिक, राष्ट्रीय किंवा प्रादेशिक घडामोडी
- अंशलक्ष्यी : एखाद्या घटनेचा अतिशय सूक्ष्म अभ्यास करणे
- शकावली : एखाद्या घराण्या संदर्भात घडलेल्या घडामोडीची तिथी, वार, शके यानुसार केलेली नोंद

## १.४ स्वयं – अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१) अ) ॲनाल्स २) अ) ॲनाल्स ३) अ) डॉ. अरुण टीकेकर

४) अ) इंग्लंड ५) अ) हार्निट-सिव्हर्स

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) Local History: A Guide to Research, Writing, and Publishing

२) डी. एन. झा

३) Myth and Reality

४) १९४७

५) पु. पा. गोखले

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१) अ) अनुराधा तेंडुलकर २) ड) सतीश पवार ३) क) ए. एम. शहा

४) अ) पायल मोहनका ५) ड) वरील सर्व

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्र २) सामाजिक

३) शरत सुंदर राजीव ४) सण-उत्सव ५) स्थानिक देवता

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागा भरा.

१) ड) वरील सर्व २) ड) वरील सर्व ३) ड) वरील सर्व ४) अ) नागपंचमी

५) अ) स्थल

ब) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) अभिमान २) प्रादेशिक ओळख ३) सामाजिक

४) शोभेची दारू उडवण्याची प्रथा ५) शाश्वत विकासाला

## १.५ सारांश

जगभरात प्रत्येक ग्राम, नगर, शहर, महानगरांचे एक स्वतंत्र अस्तित्व असते. शहराचे प्राचीनत्व सांगणाऱ्या दंतकथा, शहर स्थापनेचा इतिहास, जडणघडण, विकास, ऱ्हासासांबंधीची स्थिती, एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेली नगरांची स्थिती, त्यात कालानुरूप होत जाणारे बदल, स्थित्यंतरे, युद्धकालीन बदलले गेलेले स्थानिक प्रदेश, गावाच्या सीमा बदलत जातात. भौगोलिक परिस्थितीचा परिणाम सतत होतो. स्थानिक, प्रादेशिक स्तरांवरचे बदल हे वेगवेगळे असतात. राष्ट्रीय पातळीवर स्थानिक स्तरावरच्या सर्वच बदलांना इतिहासलेखनात स्थान देणे शक्य नसते. भारतासारख्या विभिन्न व खंडप्राय देशांमध्ये प्रत्येक राज्याची विविधता आहे. आधुनिक युगात प्रादेशिक व स्थानिक ऐतिहासिक घटनांचे समग्रपणे अध्ययन करणे, स्थानिक इतिहास या लेखन संकल्पनेमुळे शक्य झाले आहे. या सर्व पैलूंमुळे नवी ऐतिहासिक जाणीव व नवी दृष्टी विकसित झालेली आहे. अशाप्रकारे सांस्कृतिक इतिहास समृद्ध झाला आहे. सामान्य लोकांना शहरांच्या ऐतिहासिक वारशाची जिज्ञासा असते. शहराचे वाटणारे कौतुक, शहरांच्या देदीप्यमान इतिहासाची आठवण जागृत करणारे प्रसंग, शहरस्थापने मागील विचार, परंपरांचा समावेश होतो. विविध प्रयत्न, विविध कालखंडामधील त्या शहरांमध्ये, गावांमध्ये झालेला बदल, विकास, ऱ्हास, स्थित्यंतरे यांचा विज्ञानात्मक दृष्टीने घेतलेला ऐतिहासिक आढावा व मागोवा स्थानिक इतिहासामध्ये अंतर्भूत होतो. सामाजिक

चळवळींमधील ग्रामस्थांनी घेतलेला सहभाग, स्थानिक-धार्मिक तीर्थक्षेत्रे, दंतकथा, लोककथा, आख्यायिका, सण, उत्सव, परंपरा या सर्व पैलूंचा अभ्यास स्थानिक इतिहास या विद्याशाखेमध्ये केला जातो.

स्थानिक इतिहास म्हणजे एखादी वसाहत, गाव, शहर, प्रदेश यासारख्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामधील इतिहास. ज्यामध्ये भूतकाळातील घटना, तेथे राहणाऱ्या लोकांचे अनोखे अनुभव, परंपरा, लोक संस्कृतीचा अभ्यास समाविष्ट आहे. स्थानिक इतिहास हा आपल्या सामाजिक आणि सामुदायिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो मानवी अनुभवाच्या गुंतागुंत आणि स्थानिक संस्कृतींच्या विविधतेबद्दल अंतर्दृष्टी देतो. स्थानिक इतिहासामध्ये स्थानिक सामाजिक आणि आर्थिक घडामोडी, सांस्कृतिक आणि धार्मिक प्रथा, राजकीय आणि सैन्य कार्यक्रम, पर्यावरणीय आणि भौगोलिक बदल आणि स्थानिक लोकांचे दैनंदिन जीवन आणि सामान्य लोकांचे अनुभव यांचा स्थानिक इतिहासाच्या स्वरुपमध्ये समावेश करता येईल. स्थानिक इतिहासाचे परीक्षण करून, आपण स्थानिक ओळख आणि समाजाची गुंतागुंत, स्थानिक समाजांवरील व्यापक ऐतिहासिक शक्तींचा प्रभाव, ज्या मार्गांनी स्थानिक संस्कृतींनी व्यापक प्रादेशिक आणि जागतिक शक्तींनी प्रभावित केले आहे या गोष्टी आपण समजून घेवू शकतो. स्थानिक इतिहास हा केवळ भूतकाळ जपण्याचा नसून वर्तमान समजून घेऊन भविष्याची माहिती देणारा असतो. स्थानिक इतिहासामध्ये स्थानिक समाजामध्ये जबाबदारी आणि अभिमान वाढवणे, स्थानिक निर्णय आणि धोरणाची माहिती, प्रादेशिक आणि राष्ट्रीय इतिहासाचे आकलन वाढवणे आणि मानवी अनुभवाचे सूक्ष्म आणि बहुआयामी दृश्य प्रदान करण्याचे सामर्थ्य आहे:

स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश विशिष्ट प्रदेश, समाज, गाव अथवा शहराच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणे, जतन करणे आणि त्याचा अर्थ लावणे हा आहे. स्थानिक इतिहास एका विशिष्ट क्षेत्रातील अद्वितीय अनुभव, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यावर लक्ष केंद्रित करतो. विविध क्षेत्रातील स्थानिक व्यक्ती, विविध कार्यक्रम आणि संस्थां यांच्या कार्य आणि योगदानांवर प्रकाश टाकणे हा याचा प्रमुख उद्देश आहे. स्थानिक इतिहासाचे विविध कारणांनी महत्त्व वाढते आहे; स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून स्थानिक सांस्कृतिक वारसा आणि समाजाची ओळख जपता येते. राष्ट्रीय आणि जागतिक घटना समजून घेण्यासाठी स्थानिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न करता येतो. स्थानिक समाजाचा अभिमान आणि विशिष्ट क्षेत्रातील त्यांची मालकी वाढविण्यास मदत होते. गाव, शहर यांचे नियोजन, विकास आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जमा करण्यास देखील मदत होते. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून स्थानिक सांस्कृतिक विविधता आणि सर्वसमावेशकतेला यामुळे प्रोत्साहन देण्यास हातभार मिळतो. स्थानिक इतिहासाच्याद्वारे समाजामध्ये जबाबदारी वाढीस लावण्यास आणि त्यांच्या सहभागास प्रोत्साहन देण्यास मदत होते. सर्वात महत्वाचे म्हणजे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी चिरस्थायी वारसा जतन होण्यास मदत होते. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करून, आपण आपल्या सभोवतालची सखोल माहिती मिळवू शकतो, आपल्या सांस्कृतिक वारशाच्या प्रशंसा करू शकतो आणि आपल्या समाजाच्या भविष्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय देखील घेऊ शकतो.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा:

१) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना

२) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

३) मौखिक इतिहासाचे महत्व

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) स्थानिक इतिहासलेखनाची सविस्तर चर्चा करा.

२) स्थानिक इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) स्थानिक इतिहासाचे उदेश स्पष्ट करा.

४) स्थानिक इतिहासाचे महत्व सांगा.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


१) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५ पृ. क्र. २२

२) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, २०१४, प्रस्तावना, पृ. क्र. पाच-सहा, ३) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००,

४) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२

५) ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

६) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

७) पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

८) K. N. Ganesh, Socio-cultural Processes and Livelihood Patterns at Tirurangadi- A Micro Historical Study (<http://www.cds.ac.in/krpcds/report/Ganesh.pdf>)

९) Michael J. Eula, *Local History: A Brief Historical Overview and Issues Central to its Practice*

१०) Guha Ramachandra, *Environmentalism*: A *Global History*', Delhi: Penguin Books, India, 2014

११) D.N. Jha, (edited) Local History and Regional Identity, Routledge, 2013

१२) John Richardson, The Local Historian's Encyclopedia, Sutton Publishing, 2003

१३) Axel Harneit-Sievers (ed.), A Place in the World: New Local Historiographies from Africa and South Asia (Brill, Leiden, 2002).

१४) Georg G. Iggers, Historiography in the Twentieth Century: From Scientific Objectivity to the Postmodern Challenge (Hanover and London, Wesleyan University Press, 1997).

❑❑❑

# घटक २
# नवे विचारप्रवाह

**अनुक्रमणिका**


२.१ उद्दिष्ट

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

 २.३.१ सूक्ष्म इतिहास

 २.३.२ कुळाचा इतिहास

 २.३.३ गावाचा इतिहास, नागरी इतिहास

२.४ सारांश

२.५ परिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.६ स्वयंअध्ययन प्रश्न, उत्तरे

२.७ संदर्भ आणि अधिक वाचनासाठी ग्रंथ


## २.१ उद्दिष्ट

आपणास या घटकाच्या अभ्यासानंतर;

१. सूक्ष्म इतिहासाचा दृष्टिकोन स्पष्ट करता येईल.

२. सूक्ष्म इतिहास लेखनाचा उदय, विकास, फायदे व तोटे सांगता येतील.

३. कुळाचा म्हणजेच कुटुंबाचा इतिहास म्हणजे काय हे लक्षात येऊन कुटुंबाचा इतिहास लिहिण्याची पद्धत लक्षात येईल.

४. गावांचा इतिहास म्हणजे काय व त्याचे महत्त्व लक्षात येईल.

५. नागरी इतिहास म्हणजे काय व तो कसा लिहावा हे लक्षात येईल.

## २.२ प्रास्ताविक

इतिहास म्हणजे भूतकाळ घडलेल्या घटनांचा अभ्यास आणि मानवी मनावर खोल ठसा उमटणाऱ्या घटनांचा अभ्यास असे म्हटले जाते. पण केवळ भूतकाळात घडलेल्या घटना आणि मानवी मनावर ठसा उमटवणाऱ्या घटना एवढाच अर्थ मर्यादित राहिलेला नाही. इतिहास विषयक अनेक नवनवीन विचार प्रवाह उदयास येत आहेत. त्यामुळे मानवी जीवनाशी संबंधित अनेक घटकांचा अभ्यास यामध्ये केला जात आहे. इतिहासामध्ये विविध दृष्टीकोनाबरोबर इतर विषयांशी असणारी आंतरविद्याशाखीय मांडणीसुद्धा करण्यात येत

आहे. आधुनिक कालखंडात ज्ञानाचा विस्तार होत असल्यामुळे प्रचंड नविन ज्ञान अस्तित्वात येत आहे. या सगळ्या ज्ञानाचा एकाच व्यक्तीकडून किंवा एकाच विद्या शाखेत किंवा एकाच दृष्टिकोनातून अभ्यास करणे अशक्य आहे. यातून इतिहासाचे अनेक प्रकार उदयास आले आहेत. त्यातीलच एक म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहासामध्येच अनेक उपघटक सुद्धा उदयास आले आहेत. त्यामध्ये सूक्ष्म इतिहास, समकालीन इतिहास, गावांचा इतिहास, शहर अथवा नगरांचा इतिहास अशा पद्धतीने अभ्यास केला जातो.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१ सूक्ष्म इतिहास

भूतकाळात घडलेल्या घटनांचा शोध घेऊन मानवाने आधुनिक काळापर्यंत कशी प्रगती केलेली आहे याची मांडणी विसाव्या शतकापर्यंत इतिहासामध्ये केली जात होती. पुराभिलेखागारातील अस्सल कागदपत्रांच्या आधारे शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करून ही मांडणी करण्यात आली. पण या मांडणीमध्ये राजे राजवाड्यांच्या युद्धांचा, घटनांचा तसेच वरिष्ठ वर्गाचा इतिहास मोठ्या प्रमाणामध्ये लिहिला गेला आणि इतिहास म्हणजे हाच मुख्य गाभाभूत घटक आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र १९७० च्या दशकातील जगभरातील इतिहासकाराच्या विचार मंथनातून इतिहासातील अनेक लेखन प्रवाह उदयास आले. त्यामध्ये स्थानिक इतिहास, स्त्रीवादी इतिहास, समकालीन इतिहास, गावांचा इतिहास, नागरी इतिहास, सूक्ष्म इतिहास अशा अनेक शाखांचा उल्लेख करता येईल.

**सूक्ष्म इतिहास अर्थ –**

सूक्ष्म इतिहास याला इंग्रजीमध्ये 'मायक्रो हिस्टरी' असे म्हणतात. यालाच 'अंशलक्षी इतिहास' असेही म्हणतात. सूक्ष्म अथवा अंशलक्षी इतिहास म्हणजे एखाद्या सूक्ष्म किंवा लहान अभ्यास घटकाचे संशोधन करत असताना घटनेचे सूक्ष्म विश्लेषण. हा स्थानिक इतिहासाचा एक उपघटक मानला गेला तरी चुकीचे होणार नाही. हा नवा इतिहासविषयक विचार प्रवाह साधारण सन १९७० च्या दशकात उदयाला आला. इटालियन इतिहासकार जोओवानी लेव्ही यांच्या मतानुसार सूक्ष्म इतिहासाचा अर्थ लावत असताना इतिहास लेखनामधील निरीक्षणाचे प्रमाण कमी करून इतिहास लेखनात सूक्ष्म विश्लेषण व कागदपत्रांचा सखोल अभ्यास करण्यावर भर देणे अपेक्षित आहे.

**सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाहाचा उदय**

सूक्ष्म इतिहास ही एक ऐतिहासिक लेखन पद्धती आहे. व्यक्ती आणि लहान गटांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास यामध्ये केला जातो. आतापर्यंत पारंपारिक संशोधनातून मांडल्या गेलेल्या इतिहासातून ज्या गोष्टी दूर आणि भिन्न राहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ विविध कल्पना, प्रथा, परंपरा, रूढी, श्रद्धा, अशा विविध कृतींचा अभ्यास सूक्ष्म इतिहासामध्ये केला जातो. उपेक्षितांचा इतिहास किंवा वंचितांचा इतिहास या इतिहास लेखन प्रवाहाला जवळची अशा प्रकारची ही अभ्यास पद्धती आहे. ब्रिटिश इतिहासकार इ. पी. थॉमसन यांनी शोषित वर्गाचा अथवा शूद्र लोकांचा इतिहास म्हणजेच तळातून इतिहास लिहिण्याची संकल्पना मांडली.

थॉमसन यांच्या विचारांचा प्रभाव इटलीमधील काही इतिहासकारांच्यावर पडला. या इतिहासकारानी पुढे सूक्ष्म इतिहास ही संकल्पना मांडली. यामध्ये प्रामुख्याने कार्लो गीन्झबर्ग, इडोआर्डो ग्रेंडी, जिओवानी लेव्ही व कार्लो पोनी इत्यादींचा समावेश होतो. या अभ्यासकांनी सूक्ष्म इतिहासाची सैद्धांतिक मांडणी, विचार पद्धती, दृष्टिकोन या संदर्भात लेखन केले. इटालियन इतिहासकारांनी केलेली मांडणी पुढे फ्रान्स व उत्तर अमेरिकेतील संशोधकांनी उचलून धरली. त्याचे अनुकरण केले. भारताच्या संदर्भात १९८० च्या दशकात रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वंचितांचे इतिहास लेखन सुरू केले. आतापर्यंतच्या इतिहासात कुठल्याही प्रकारचे स्थान नसलेल्या जनसमुहांना, गटांना, घटनांना, घटकांना आवाज देण्याच्या हेतूने हे इतिहास लेखन केले गेले.

**सूक्ष्म अथवा अंशलक्षी इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये**

अंशलक्षी अथवा सूक्ष्म इतिहास हा वरवर पाहता स्थानिक इतिहास लेखनाचा एक उपघटक वाटत असला तरी त्याची संशोधन प्रक्रिया व मांडणी पारंपारिक स्थानिक इतिहास लेखनापेक्षा वेगळी आहे. अभ्यास घटकाची निवड, संशोधन पद्धती, घटनांचा अन्वयार्थ, सादरीकरण इत्यादी मध्ये वेगळेपण जाणवते. याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

**१. अभ्यास घटकाची निवड**

अंशलक्षी अथवा सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये संशोधन विषय अतिशय मर्यादित स्वरूपाचा असतो. प्रस्थापित इतिहासाच्या सहसंबंधाने एखादी घटना, व्यक्ती किंवा एकाद्या व्यक्तीच्या संदर्भातील एखादी सूक्ष्म घटना जी शुल्लक वाटत होती. अर्थशून्य वाटत होती किंवा दुर्लक्षित करण्याजोगी, कमी महत्त्वाची, विरोधाभास असणारी वाटत होती अशा घटनांची निवड या अभ्यास प्रकारांमध्ये केली जाते. क्षुल्लक वाटणाऱ्या घटना किंवा प्रसंग अथवा व्यक्तींचा गांभीर्याने अभ्यास करणे हेच या विचार प्रवाहाचे महत्त्वाचे विशेष आहे. अशा घटकांचा अभ्यास करून मोठ्या प्रस्थापित इतिहासामधील त्याचे स्थान निश्चित करणे हा मुख्य हेतू आहे.

**२. स्थळ काल व्यक्ती मर्यादित अभ्यास विषय**

पारंपरिक इतिहास लेखनामध्ये व्यापक प्रदेशाचा अथवा कालखंडाचा अभ्यास केला जातो पण सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये विशिष्ट ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या व्यक्तीसमूह, कुटुंब, विशिष्ट व्यक्ती किंवा त्यांच्या संदर्भात घडलेल्या सूक्ष्म घटना यांचा अभ्यास विषय म्हणून निवड केली जाते. अभ्यास विषय स्थळ, काळ, घटना या अनुषंगाने अतिशय मर्यादित असतो. मर्यादित सूक्ष्म घटकाचा विस्तृत व सखोल अभ्यास करून त्याची मांडणी केली जाते.

**३. दुर्लक्षित व कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांवर प्रकाश**

प्रस्थापित इतिहासातील दुर्लक्षित भाग जो सामान्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे असा सूक्ष्म म्हणजेच अतिशय छोटा घटक जो प्रस्थापित इतिहासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा

दुवा ठरण्याची शक्यता असते अशा घटकाचा अभ्यास यामध्ये केला जातो. अशा अभ्यासामुळे सामान्य इतिहासावर प्रकाश पडण्यास मोठ्या प्रमाणामध्ये मदत होते. एका अर्थाने विषम बाजूचा अभ्यास करून सम बाजू मांडण्याचा प्रयत्न केला जातो किंवा अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा अभ्यास करून अर्थ निर्माण करता येतो. विपरीतता अभ्यासून एकरूपता मांडता येते अशी भूमिका सूक्ष्मलक्षी इतिहासातून निदर्शनास येते.

**४. सामान्य इतिहासावर प्रकाश टाकणे**

सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाहातील इतिहासकार असे म्हणतात की, एखाद्या व्यक्तीला काळाच्या एका विशिष्ट क्षणाला आलेला अनुभव समजून घेणे हे इतिहास संशोधकांपुढील आव्हान आहे, मात्र एखाद्या छोट्या समूहाचा कुटुंबाचा किंवा व्यक्तीचा सूक्ष्म अभ्यास हे विषय खास आहेत म्हणून करत नसून त्यांचा प्रमुख हेतू हा सामान्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणे हा असतो. विशेष विषयाचा सूक्ष्म अभ्यास हा ऐतिहासिक विश्लेषणाच्या व्यापक प्रश्नांची चर्चा करण्याचा मार्ग मोकळा करेल अशी या गटातील इतिहासकारांची धारणा आहे.

**५. सूक्ष्म अभ्यास घटकातील क्लिष्टता**

सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये एखादी साधी वाटणारी दुर्लक्षित कमी महत्त्वाची घटना अभ्यासासाठी निवडलेली असते. त्या घटनेचे जसे संशोधन पुढे जाईल तसतसे त्या घटनेतील गुंतागुंत अथवा श्रेष्ठता संशोधकाच्या लक्षामध्ये येते. एखाद्या व्यक्तीने एखादी सांगितलेली कथा व त्याविरुद्धही अस्तित्वात असलेल्या कथा याकडे संशोधक लक्ष देतो व कथेचा अन्वयार्थ शोधतो. कथेचे विश्लेषण करतो. कथेमध्ये काय सांगितलेले आहे व काय सांगितलेले नाही याची चिकित्सा करतो. कथानकामध्ये कथेत काय सांगितले जाते यापेक्षा काय सांगितले जात नाही हे महत्त्वाचे असते. कथेमधील 'मौन' हा कथेचा महत्त्वाचा घटक असतो.

**अंशलक्षी अथवा सूक्ष्म इतिहास लेखनाची साधने**

सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये संदर्भ साधन म्हणून प्राथमिक व दुय्यम अशा स्थानिक संदर्भ साधनांना महत्त्व आहे. अभ्यास घटकाशी अथवा घटनेशी संबंधित व्यक्तीने अभ्यास घटकासंदर्भात किंवा स्वतःबद्दल दिलेली माहिती, सांगितलेली कथा अथवा केलेला वृत्तांत हे महत्त्वाचे संदर्भ साधन होऊ शकते. अभ्यास घटकातील सहभागी व्यक्तीची छोटीशी कृती किंवा त्या संदर्भातील निवेदन किंवा कोर्टातील साक्ष अशी अनेक प्रकारची संदर्भ साधने महत्त्वाची आहेत. या संदर्भ साधनांचा अभ्यासासाठी वापर करत असताना ही साधने कशी तयार झाली म्हणजेच व्यक्तीने सांगितलेली एखादी कथा कशी तयार केली अथवा त्या कथेचा अन्वयार्थ काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न सूक्ष्म इतिहासकार करत असतात.

सूक्ष्म इतिहास लेखन करणाऱ्या इतिहासकारांच्यावर क्लिफोड गर्टज या मानववंशशास्त्रज्ञाच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. गर्टज याने आपल्या 'Thick Dscription : Toward an Interpretive theory of Culture' लेखात इंडोनेशियामधील 'बाली' बेटावरील आदिवासी लोकांच्या अभ्यासात वापरलेली दाट

वर्णनाची पद्धत सूक्ष्म इतिहासकारांनी स्वीकारलेली आहे. गर्टज यांनी ती पद्धत वापरून या आदिवासी लोकांच्या 'कोंबड्यांची झुंज' या खेळाचे बारीक निरीक्षण करून दाट वर्णन केले. कोंबड्यांच्या झुंजीच्या खेळात वापरल्या जाणाऱ्या विधीतील चिन्ह संहितेची उकल केली. पुढे गर्टज यांच्या प्रिन्स्टन विद्यापीठातील विद्यार्थी रॉबर्ट डार्णटन यांने आपल्या 'द ग्रेट कॅट मॅसकर' या सूक्ष्म इतिहासात याचा प्रभावी वापर केला. इसवी सन १७३० च्या दशकात पॅरिसमधील एका छापखान्यातील कामगारांनी आपल्या मालकांच्या मांजरांची कत्तल का केली हा प्रश्न हाताळला. रॉबर्ट डार्णटन याने पुराव्यांचा खल करून कामगारांनी मांजराची कत्तल करताना केलेल्या विधीचे दाट वर्णन केले व त्याच्या मानसिकतेचा शोध घेतला. अर्थात एखाद्या वरपांगी व साध्या घटनेमागील श्रेष्ठता स्पष्ट करण्याचा प्रयत्न होता.

**सूक्ष्म इतिहास लेखनाच्या मर्यादा**

सूक्ष्म अथवा अंशलक्षी इतिहास लेखनाच्या काही मर्यादा आहेत.त्यांचा विचारही येथे करणे आवश्यक आहे –

१. सूक्ष्म इतिहास लेखनाचा मुख्य हेतू क्षुल्लक घटनांचा अभ्यास करून मोठ्या ऐतिहासिक घटनांमध्ये त्याचे स्थान निश्चित करणे हा असला तरी अनेक इतिहासकारांना मोठे ऐतिहासिक प्रश्न हाताळने सोयीस्कर वाटत नाही याचे कारण बहुतेक वेळेला त्यांचे विषय व्यक्ति किंवा प्रसंग केंद्रीत असतात. अशा व्यक्ती ज्यांनी बंडखोरी किंवा कुठलातरी गुन्हा केलेला असतो. ज्यांचे हे कृत्य दडपणासाठी सत्ताधीशानी त्यांची साक्ष नोंदवून ठेवलेली असते. वास्तविक पाहता हे काही सर्वसाधारण लोक ज्यांना इतिहासात कोणत्याही प्रकारचा आवाज नाही असे नसतात. त्यांच्याकडे प्रस्थापित अभिजन वर्गाच्या सांस्कृतिक धुरीनत्वाविरुद्ध आवाज उठवण्याचे धाडस असते. त्यांनी हे धाडस केले म्हणून त्यांची साक्ष अभिजन वर्गाने निर्माण केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये नोंदवलेली असते. अशावेळी इतिहासकाराला खऱ्याखुऱ्या सामान्य, वंचित, शोषित लोकांबद्दल तर्क वितर्क मांडता येतील काय?

२. सूक्ष्म इतिहास लेखनात इतिहासकार अल्पकालीन घटनांचा अथवा प्रसंगांचा अभ्यास करतो. अशावेळी काळाचे ओघात झालेले बदल अभ्यासणे व ते का? कसे घडून आले? या प्रक्रियेचे विश्लेषण करू शकत नाही. अभ्यासाचा कालखंड अल्प असल्यामुळे समाजात दीर्घकालीन झालेले बदल दर्शवू शकत नाही .

३. सूक्ष्म इतिहास लेखनात वापरलेली एखादी साक्ष अथवा जामीन ही त्याच्या स्वतःच्या शब्दात आहे की नाही हे ठरवणे अवघड आहे. कारण न्यायालयातील कारकून, साक्षीदाराने दिलेल्या साक्षीला शुद्ध करून प्रस्थापितांच्या शब्दात लिहून ठेवत असे. या प्रक्रियेमुळे साक्षीदाराने वापरलेले लोकसंस्कृतीमधील शब्द गाळले जातात किंवा त्यांच्या ऐवजी वेगळे अभिजनवादी शब्द वापरले जातात. याचा अर्थ असा की कोणत्याही न्यायालयीन अथवा पोलीस तपासणीत दिलेली साक्ष ही साक्षीदाराने वास्तवात वापरलेल्या शब्दांचे पूर्णपणे प्रतिरूप नसते.

४. एखाद्या घटनेतील साक्षीदार हा त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत असतो. त्यामुळे एका अर्थाने साक्ष देणारी व्यक्ती हा त्यांने अनुभवलेल्या प्रसंगाचे पूर्ण वर्णन नसून त्याला ह्या प्रसंगाबद्दल विचारलेल्या काही प्रश्नांची उत्तरे असतात. त्यामुळे त्यांनी दिलेली साक्ष घडलेल्या प्रसंगाचे पूर्णपणे प्रतिरूपण करते का हा प्रश्न निर्माण होतो.

**सूक्ष्म इतिहास लेखनाचे फायदे**

सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये काही अडचणी अथवा त्रुटी असण्याची शक्यता आहे तरी देखील त्याचे फायदे अथवा महत्त्व देखील लक्षात घेणे गरजेचे आहे –

१. सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाह वाचकांसमोर नवा मानवी चेहरा असलेला इतिहास सांगतो.

२. इतिहासातील खऱ्याखुऱ्या सामान्य लोकांच्या जीवनातील प्रसंगाबद्दल वाचकाला माहिती मिळते.

३. सूक्ष्म इतिहासामध्ये पुराव्याची शहानिशा केलेली असते. त्यामुळे वंचित घटकांचा इतिहास समजण्यास मदत होते.

४. वंचित, शोषित व सर्वसाधारण लोकांचा अगदी शुल्लक घटना प्रसंगाचा अभ्यास हे या अभ्यासाचे प्रमुख आकर्षण आहे.

५. ज्यांना प्रस्थापित इतिहासामध्ये कोणत्याही प्रकारचे स्थान नव्हते, महत्व नव्हते, दखल घेतली गेली नव्हती, त्यांचा अभ्यास या अभ्यास प्रकारांमध्ये केला जातो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

प्रश्न १.

अ. रिकाम्या जागा भरून वाक्य पूर्ण करा.

१. .........यांच्या मतानुसार सूक्ष्म इतिहासाचा म्हणजे इतिहास लेखनामधील निरीक्षणाचे प्रमाण कमी करून इतिहास लेखनात सूक्ष्म विश्लेषण व कागदपत्रांचा सखोल अभ्यास करणे होय.

अ) जोओवानी लेव्ही ब) कार्लो गीन्झबर्ग क) कार्लो पोनी ड) इडोआर्डो ग्रेंडी

२. ब्रिटिश इतिहासकार ......... यांनी शोषित वर्गाचा अथवा शूद्र लोकांचा इतिहास म्हणजेच तळातून इतिहास लिहिण्याची संकल्पना मांडली.

अ) जोओवानी लेव्ही ब) कार्लो गीन्झबर्ग क) कार्लो पोनी ड) इ. पी. थोम्पसन

३. सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाह ......... देशात उदयास आला.

अ) अमेरिका ब) भारत क) इटली ड) ब्रिटन

४. सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाह .........साली उदयास आला.

अ) सन १९९० ब) सन १९७० क) सन १९०० ड) सन २०१०

५. भारतात सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाह ......... साली उदयास आला.

अ) सन १९९० ब) सन १९७० क) सन १९८० ड) सन २०१०

## २.३.२ कुळाचा अथवा कुटुंबाचा इतिहास (Family History)

कुटुंबाचा इतिहास, म्हणजेच कुळाचा इतिहास किंवा कुटुंबाचा इतिहास. हा एक असा अभ्यास आहे ज्यामध्ये एखाद्या कुटुंबाच्या विविध पिढ्यांचा शोध घेतला जातो आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, अनुभव, आणि परंपरांचा अभ्यास केला जातो. कुटुंबाच्या विविध पिढ्यांमध्ये झालेल्या बदलांचा मागोवा घेत, त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आणि भौगोलिक स्थितीचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास केवळ एक व्यक्तिगत प्रवास नसून, तो एक सामाजिक आणि सांस्कृतिक दस्तावेज असतो ज्यामुळे विविध कालखंडातील समाजाची झलक पाहता येते.

**फॅमिली हिस्टरी अर्थ –**

''फॅमिली'' हा शब्द इंग्रजी "family" पासून आला आहे, जो मूळ लॅटिन भाषेतील "familia" या शब्दावरून तयार झाला आहे. "familia" हा शब्द घरातील गुलाम, सेवक, आणि मालक या सगळ्यांचा समूह दर्शवित असे. कालांतराने, या शब्दाचा अर्थ बदलत गेला आणि तो घरातील सर्व सदस्य, जे एकत्र राहत असतात, त्यांच्या समूहासाठी वापरला जाऊ लागला. मराठीत ''फॅमिली'' शब्दाचा अर्थ ''कुटुंब'' असा होतो, जो घरातील सदस्यांच्या गटासाठी वापरला जातो. फॅमिली हिस्टरी म्हणजे कुटुंबाच्या मुळांचा, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा, त्यांच्या संघर्षांचा, त्यांच्या कामगिरीचा, तसेच त्यांच्या योगदानांचा अभ्यास होय. हा दस्तऐवज कुटुंबाच्या विविध सदस्यांच्या संबंधांचा अभ्यास करतो, त्यांच्या आचार-विचारांची, परंपरांची माहिती देतो, आणि त्यांच्या जीवनशैलीचे वर्णन करतो. फॅमिली हिस्टरीचा अभ्यास केल्यामुळे कुटुंबाच्या सदस्यांच्या जीवनात कसे बदल झाले, कोणत्या प्रकारचे संघर्ष झाले, आणि कुटुंबाचे सामर्थ्य कसे वाढले हे समजून घेता येते. याशिवाय, कुटुंबाच्या मुळांचा मागोवा घेतल्याने विविध पिढ्यांमधील परंपरांची जपणूक आणि त्यातील बदलांचा अभ्यास करता येतो.

**संदर्भ आणि साधने :**

फॅमिली हिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी अनेक प्रकारची साधने वापरली जातात. या साधनांचा वापर करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेतला जातो, त्यांच्या जीवनातील घटनांची माहिती मिळवली जाते, आणि त्या घटनांचा अभ्यास केला जातो. काही प्रमुख साधने खालीलप्रमाणे आहेत:

१. **ऐतिहासिक दस्तऐवज आणि नोंदी** : यात जन्म, मृत्यू, लग्नाचे प्रमाणपत्र, जमीन दस्तऐवज, वसीयत, आणि सरकारी नोंदी यांचा समावेश होतो. या दस्तऐवजांच्या आधारे कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो.

२. **वंशावळी** : कुटुंबाच्या वंशावळींचा वापर करून पिढ्यांमधील संबंधांचा अभ्यास करता येतो. वंशावळीत प्रत्येक पिढीतील सदस्यांचे नाव, जन्म तारीख, मृत्यू तारीख, आणि त्यांचे नाते यांची नोंद असते.

३. **पुरातत्त्वीय साधने** : कुटुंबाच्या इतिहासाशी संबंधित स्थळांचे उत्खनन आणि त्यामधील वस्त्र, भांडी, दागिने, इत्यादींचा अभ्यास करून त्या काळातील जीवनशैलीचा अंदाज लावता येतो.

**४. चित्रे, नकाशे आणि पत्रे** : कुटुंबातील सदस्यांची चित्रे, पत्रे, दैनंदिनी, आणि इतर वैयक्तिक पत्रांचा अभ्यास करून कुटुंबाच्या सदस्यांच्या जीवनातील घटना आणि अनुभवांचे विश्लेषण करता येते.

**५. लोकसाहित्य आणि कथा** : कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींकडून मिळालेल्या कथा, परंपरा, आणि आठवणी यांचा अभ्यास करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो. घडलेल्या घटनांचा अभ्यास करता येतो.

**६. डिजिटल साधने** : आधुनिक काळात जनुकीय चाचण्या (DNA Testing) आणि डिजिटल वंशावळींचा वापर करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो. यामुळे पूर्वजांच्या स्थळांचा शोध घेता येतो.

**ऐतिहासिक महत्त्व :**

फॅमिली हिस्टरीचे ऐतिहासिक महत्त्व अनेक पातळ्यांवर आहे. यामुळे केवळ कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येत नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक इतिहासाचा सखोल अभ्यास करता येतो. महत्त्व पुढीलप्रमाणे -

**१. सांस्कृतिक जडणघडण** : फॅमिली हिस्टरीच्या अभ्यासामुळे कुटुंबाच्या परंपरा, संस्कार, आणि सामाजिक मूल्ये यांचा अभ्यास करता येतो. विविध पिढ्यांमधील बदल समजून घेता येतात, ज्यामुळे एकूण समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास करता येतो.

**२. सामाजिक संबंध** : फॅमिली हिस्टरीच्या माध्यमातून कुटुंबातील सामाजिक संबंधांचा अभ्यास करता येतो. विविध पिढ्यांमध्ये असलेल्या नातेसंबंधांचा मागोवा घेतल्यास समाजाच्या विकास प्रक्रियेचा अभ्यास करता येतो.

**३. आर्थिक स्थिती** : कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केल्यामुळे त्यांच्या आयुष्यावर आणि समाजावर कसे परिणाम झाले, हे समजून घेता येते. यामधून त्यांच्या उपजीविकेचे साधन, व्यवसाय, आणि आर्थिक संघर्षांची माहिती मिळते.

**४. पर्यावरणीय घटक** : कुटुंबाच्या मुळांचा शोध घेतल्यास त्या समाजाच्या पर्यावरणीय परिस्थितीचा अभ्यास करता येतो. त्यांच्या स्थलांतराचे कारण, त्यांचे जगण्याचे साधन, आणि पर्यावरणाशी असलेला संबंध समजून घेता येतो.

**५. वंशीय आणि जातीय इतिहास** : फॅमिली हिस्टरीचा अभ्यास केल्यामुळे विविध वंशीय आणि जातीय गटांचा इतिहास आणि त्यांचे समाजातील स्थान समजून घेता येते.

**फॅमिली हिस्टरीच्या अभ्यासाच्या पद्धती**

फॅमिली हिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी विविध पद्धतींचा वापर केला जातो. यामुळे कुटुंबाच्या मुळांचा शोध घेताना अधिक सखोल आणि विस्तृत माहिती मिळते. काही प्रमुख पद्धती खालीलप्रमाणे आहेत:

**१. वंशावळी तयार करणे** : वंशावळ तयार करण्याची पद्धत फॅमिली हिस्टरीच्या अभ्यासामध्ये सर्वाधिक वापरली जाते. यामध्ये कुटुंबाच्या विविध पिढ्यांचा मागोवा घेतला जातो, ज्यामध्ये प्रत्येक पिढीतील सदस्यांचे नाव, जन्म तारीख, मृत्यू तारीख, आणि त्यांचे नाते, त्यांचे कार्य यांची नोंद केली जाते.

**२. ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास** : ऐतिहासिक दस्तऐवज आणि नोंदींचा अभ्यास करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो. यात जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, लग्नाचे प्रमाणपत्र, जमीन दस्तऐवज, वतनपत्रे, दानपत्रे राजकीय महत्व असलेल्या कुटुंबातील पत्र व्यवहार, आणि मृत्यूपत्र, इत्यादीचा समावेश होतो.

**३. पुरातत्त्वीय उत्खनन** : कुटुंबाच्या इतिहासाशी संबंधित स्थळांचे उत्खनन आणि त्यामधील वस्त्र, भांडी, दागिने, इत्यादींचा अभ्यास करून त्या काळातील जीवनशैलीचा अंदाज लावता येतो.

**४. आठवणींचे संकलन** : कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या आठवणींचा अभ्यास करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो. त्यांच्या अनुभवांमधून कुटुंबाच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करता येतो.

**५. जनुकीय चाचण्या** (DNA Testing) : आधुनिक काळात जनुकीय चाचण्यांचा वापर करून कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येतो. यामुळे पूर्वजांच्या स्थळांचा शोध घेता येतो आणि आपली पारंपारिक ओळख समजून घेता येते.

**फॅमिली हिस्टरीचा उपयोग –**

फॅमिली हिस्टरीचा समाजासाठी अनेक प्रकारे उपयोग होतो. या अभ्यासामुळे केवळ कुटुंबाच्या मुळांचा शोध घेता येत नाही, तर त्यातून समाजाच्या विकास प्रक्रियेची दिशा समजून घेता येते. उपयोग खालीलप्रमाणे आहेत:

**१. ओळख आणि परंपरा जपणे :** फॅमिली हिस्टरीचा अभ्यास केल्यामुळे आपल्या पूर्वजांची ओळख आणि परंपरा जपण्यास मदत होते. यामुळे आपल्या मूळांची जाणीव राहते आणि आपली सांस्कृतिक ओळख टिकून राहते.

**२. सामाजिक परिस्थिती :** घराण्यांच्या अभ्यासामुळे तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक अशा अनेक बाबींवर प्रकाश पडतो. कुटुंबाच्या इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे विविध पिढ्यांमधील नाते टिकवण्यास मदत होते. यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये सामाजिक ऐक्य आणि आपुलकीची भावना निर्माण होते.

**३. शैक्षणिक आणि सांस्कृतिक ज्ञान :** फॅमिली हिस्टरीचा अभ्यास केल्यामुळे विविध समाजांचा सांस्कृतिक आणि शैक्षणिक वारसा समजून घेता येतो. यामुळे विविध समाजांच्या इतिहासाचा आणि परंपरांचा अभ्यास करता येतो.

**४. मूल्यांकन आणि सुधारणा :** कुटुंबाच्या इतिहासाच्या अभ्यासातून आपल्या मुळांचा शोध घेता येतो. यामुळे आपल्या आयुष्यातील काही मूल्यांची आणि परंपरांची पुनर्बांधणी करता येते.

**मराठ्यांच्या इतिहासामधील निवडक इतिहास ग्रंथ**

महाराष्ट्रामध्ये सतराव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी ‘स्वराज्य’ स्थापन केले. या स्वराज्य निर्मितीमध्ये महाराष्ट्रातील अनेक मराठा सरदार घराण्यांचे योगदान होते. उदा. सिंधखेडचे जाधव, फलटणचे

निंबाळकर, तळबीडचे मोहिते, कदम बांडे, घोरपडे, शिर्के, आंग्रे, नाईक अशी अनेक घराणी सांगता येतील. पेशवे काळात देखील पटवर्धन, रास्ते, मेहंदळे, शिंदे, होळकर, अशी अनेक घराणी सांगता येतील. मराठ्यांच्या इतिहासात ''फॅमिली हिस्ट्री'' किंवा कुटुंबाचा इतिहास एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. अनेक मराठा घराण्यांच्या इतिहासात त्यांची पारंपारिक वंशावळ, कुटुंबातील महत्वाच्या व्यक्ती, त्यांचे कार्य आणि त्यांच्या घराण्याची वाटचाल याचे तपशीलवार वर्णन आढळते. मराठ्यांच्या कुटुंब इतिहासाची काही निवडक उदाहरणे –

१. **शिवाजी व शिवकाल,** लेखक : जदुनाथ सरकार, सन १९३०

२. **श्री भोसले कुलाचा वंश वृक्ष,** लेखक : इंद्रजीत सावंत, सन २०१७

या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याची वंशावळ, त्यांचे पूर्वज, आणि त्यांच्या कुटुंबातील विविध व्यक्तींचे योगदान याचे विस्तृत वर्णन आढळते. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज, आई जिजाबाई आणि पुत्र संभाजी महाराज यांची भूमिका आणि त्यांच्या कुटुंबाचा इतिहास यावर प्रकाश टाकला आहे.

३. **पेशवे घराणे,** ग्रंथ : ''पेशवे घराण्याचा इतिहास''**,** लेखक : श्री. वा. सी. बेंद्रे

या ग्रंथात पेशवे घराण्याचा वंश, त्यांच्या घराण्याची उगम कथा, आणि त्यांच्या कुटुंबातील विविध पेशव्यांचे जीवन यांचे सविस्तर वर्णन आहे. बाजीराव पेशवे, माधवराव पेशवे, आणि नानासाहेब पेशवे यांच्या घराण्याचे इतिहास तसेच त्यांची राजकीय आणि सामाजिक भूमिका याचे तपशीलवार विवेचन आहे.

४. **होळकर घराणे:** ग्रंथ : ''अहिल्याबाई होळकर आणि होळकर घराण्याचा इतिहास''**,** लेखक : व्ही. एस. वैद्य

या ग्रंथात होळकर घराण्याची वंशावळ, अहिल्याबाई होळकर यांचे कार्य आणि त्यांच्या घराण्याचा इतिहास सविस्तर दिला आहे. या घराण्याच्या इतिहासात त्यांच्या प्रशासकीय कार्याची, धार्मिक कार्याची आणि समाजसेवेची माहिती आढळते.

५. **गायकवाड घराणे (बडोदा) :** ग्रंथ : ''गायकवाडांचा इतिहास''**,** लेखक : य. दि. फडके

या ग्रंथात बडोद्याच्या गायकवाड घराण्याची स्थापना, त्यांच्या घराण्याचा विस्तार, आणि त्यांचे योगदान याबद्दलची माहिती आहे. सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा विशेषतः उल्लेख आहे.

६. **शिंदे घराणे (ग्वाल्हेर) :** ग्रंथ : ''शिंदे घराण्याचा इतिहास''**,** लेखक : ग. ह. खरे

या ग्रंथात शिंदे घराण्याची वंशावळ, त्यांच्या घराण्याचा उदय, आणि महादजी शिंदे यांचे जीवनकार्य याचे विस्तृत वर्णन आहे.

हे ग्रंथ मराठा घराण्यांच्या फॅमिली हिस्ट्रीसाठी महत्वाचे स्रोत आहेत, ज्यामध्ये त्यांच्या कुटुंबीय परंपरा, वंश, आणि ऐतिहासिक योगदान याबद्दल माहिती मिळते.या या घराण्यांच्या इतिहासामधून केवळ त्या घराण्याचा इतिहास उपलब्ध होतो असे नाही तर त्या काळातील पूर्ण मराठेशाहीचा इतिहास उपलब्ध होतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

प्रश्न १.

अ. रिकाम्या जागा भरून वाक्य पूर्ण करा.

१. ''फॅमिली'' हा शब्द ……… "family" पासून आला आहे.

अ. जर्मन ब. इंग्रजी क. इटालियन ड. अमेरिकन

२. ……… भाषेतील "familia" या शब्दावरून "family" हा शब्द तयार झाला आहे.

अ. जर्मन ब. इंग्रजी क. इटालियन ड. लॅटिन

ब. योग्य जोडी जुळवा.

| 'अ' गट (ग्रंथाचे नाव) | 'ब' गट (लेखकाचे नाव) |
|---|---|
| १. शिवाजी व शिवकाल | १. श्री. ग. ह. खरे |
| २. पेशवे घराण्याचा इतिहास | २. श्री. य. दि. फडके |
| ३. गायकवाडांचा इतिहास | ३. श्री. वि. स. बेंद्रे |
| ४. शिंदे घराण्याचा इतिहास | ४. जदुनाथ सरकार, |

## २.३.३ गावांचा इतिहास, शहरी अथवा नगरांचा इतिहास

### २.३.३.१ गावांचा इतिहास –

''ग्रामीण'' आणि ''ग्राम'' हे दोन्ही शब्द एका अर्थाने वापरले जातात. ''ग्रामीण'' हा शब्द मुख्यत्वे ''ग्राम'' किंवा खेड्यातील गोष्टींचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो, जसे की ग्रामीण जीवन, ग्रामीण अर्थव्यवस्था इत्यादी. याचा अर्थ लहान गावं किंवा खेड्यांशी संबंधित असा आहे. ''ग्राम'' म्हणजेच गाव किंवा खेडे, हा शब्द संस्कृतमधून आला आहे. प्राचीन काळापासून भारतात असलेल्या समाज व्यवस्थेत खेड्यांना एक विशेष महत्त्व आहे. ''ग्राम'' हा शब्द एका विशिष्ट वस्तीचा निर्देश करतो, जिथे लोक एकत्र राहतात आणि आपल्या जीवनावश्यक गरजा भागवतात.

''ग्रामीण'' म्हणजे खेड्यातील किंवा गावाशी संबंधित, आणि ''ग्राम'' म्हणजे गाव किंवा खेडे.

गावांचा इतिहास म्हणजे ग्रामीण भागातील समाज, संस्कृती, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, पर्यावरण, आणि राजकारण यांचा अभ्यास होय. ग्रामीण भाग म्हणजे मुख्यत: कृषिप्रधान आणि निम्न लोकसंख्या असलेला प्रदेश, जिथे शेती, पशुपालन, हस्तकला, आणि इतर पारंपरिक उपजीविका उपक्रम महत्वाचे असतात. ग्रामीण इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे एका समाजाची सांस्कृतिक, आर्थिक, आणि सामाजिक स्थिती

समजून घेता येते. या इतिहासामध्ये भूतकाळातील ग्रामीण जीवनशैली, सामाजिक संरचना, अर्थव्यवस्था, तसेच पर्यावरणीय घटक यांचा समावेश होतो. गावांचा इतिहास हा सामाजिक इतिहासाचा एक भाग आहे, ज्यामध्ये ग्रामीण समाजांच्या दिनचर्येपासून ते त्यांच्या संघर्ष आणि विकासाच्या प्रक्रियेपर्यंत सर्वकाही समाविष्ट आहे. ग्रामीण समाज हा एका दृष्टीने सर्वात प्राचीन आणि महत्त्वाचा घटक आहे. कारण बहुतेक मानव समाजांची उगम भूमी ग्रामीण क्षेत्रातच आहे.

**गावांचा इतिहास आणि स्थानिक इतिहास यांचा संबंध –**

ग्रामीण इतिहास आणि स्थानिक इतिहास यांचा जवळचा संबंध आहे. गावांचा इतिहास हा ग्रामीण भागातील समाज, अर्थव्यवस्था, संस्कृती, जीवनशैली आणि शासन यांचा अभ्यास करतो. या अभ्यासात विशेषतः शेतकरी, कामगार, गावांच्या पारंपरिक व्यवस्थापन पद्धती, स्थानिक उद्योगधंदे आणि ग्रामीण जीवनातील बदल यांचा समावेश होतो. तर स्थानिक इतिहास हा विशिष्ट प्रदेश, गाव, शहर किंवा समुदायाचा इतिहास आहे. यात त्या प्रदेशाच्या भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. स्थानिक इतिहासात गावांच्या स्थापनेपासून ते आताच्या बदलांपर्यंतच्या घटना, व्यक्ती, आणि स्थानिक परंपरा यांचा अभ्यास केला जातो. गावांचा इतिहास स्थानिक इतिहासाचा एक भाग असू शकतो. म्हणजेच, ग्रामीण भागातील एखाद्या विशिष्ट गावाचा किंवा परिसराचा इतिहास हा स्थानिक इतिहास म्हणून पाहिला जाऊ शकतो. या दोन्ही इतिहासांमध्ये स्थानिक संस्कृती, परंपरा, आणि समाजाच्या बदलांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे, स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातून ग्रामीण इतिहासाला अधिक व्यापक आणि खोलवर समज मिळते.

गावांचा इतिहासाच्या अभ्यासात खेड्यातील जीवन, समाजरचना, आर्थिक व्यवस्था, व सांस्कृतिक पैलूंचा सखोल अभ्यास केला जातो. या अभ्यासाचे मुख्य घटक पुढीलप्रमाणे –

**१. गावांची उत्पत्ती आणि विकास** : गावांची उत्पत्ती कशी झाली, त्यांचा विकास कसा झाला यावर प्रकाश टाकला जातो. यात स्थलांतर, लोकसंख्या वाढ आणि गावांचा भौगोलिक विस्तार यांचा समावेश होतो.

**२. जमीन व्यवस्थापन आणि शेती पद्धती** : जमिनीची मालकी, शेतीचे तंत्र, आणि जमिनीच्या वापरातील बदलांचा अभ्यास केला जातो. यात भूमी सुधारणा, शेतीचे तंत्रज्ञान, आणि पिकांची विविधता यांचा समावेश होतो.

**३. सामाजिक रचना आणि जातिव्यवस्था** : ग्रामीण समाजातील सामाजिक गट, त्यांची भूमिका, आणि जातिव्यवस्था यांचे विश्लेषण केले जाते. तसेच, ग्रामीण भागातील स्त्री–पुरुष समानता, सण–उत्सव, आणि पारंपारिक रीतीरिवाजांचा अभ्यास केला जातो.

**४. आर्थिक आणि राजकीय व्यवस्था** : गावातील आर्थिक व्यवस्था, बाजारपेठांचे स्थान, तसेच स्थानिक सत्ता आणि पंचायतींच्या कार्यपद्धतीचा अभ्यास महत्त्वाचा घटक आहे.

**५. ग्रामीण विद्रोह आणि सुधारणा** : ग्रामीण भागातील संघर्ष, विद्रोह, आणि समाजसुधारणांच्या चळवळींचा इतिहास अभ्यासला जातो.

हे घटक गावांचा इतिहासाच्या समग्र आणि सखोल अभ्यासाला आकार देतात.

गावांच्या इतिहासाच्या अभ्यासाची संदर्भ आणि साधने –

गावांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी विविध प्रकारची साधने आणि संदर्भ वापरले जातात.

**प्रमुख साधने खालीलप्रमाणे आहेत:**

**१. ऐतिहासिक दस्तऐवज** : शासकीय नोंदी, भूमिहकाची पत्रके, खाजगी दानपत्रे, महसुली नोंदी, आणि कर संकलनासंबंधी नोंदी इत्यादी. या साधनांमुळे त्या काळातील आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अंदाज लावता येतो.

**२. पुरातत्त्वीय साधने** : विविध खेड्यांमधील स्थळांची उत्खनने, वस्त्र, दागिने, भांडी, आणि इतर पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास.

**३. लोकसाहित्य** : यामध्ये काव्य, लोककथा, गाणी, कहाण्या, लघुनाट्य, भजन, कीर्तन परंपरा विविध सण समारंभा वेळची लोकगाणी, ग्रामीण साहित्य म्हणजे कथा, कादंबरी, नाटके, इ. यांचे अध्ययन. ग्रामीण समाजातील वयोवृद्ध व्यक्तींच्या अनुभवाचे संकलन आणि त्यांच्या आठवणींचा अभ्यास.

**४. भूगोल आणि नकाशे** : प्राचीन नकाशे आणि त्या काळातील भूगोल यांचा अभ्यास.

**५. सांस्कृतिक साधने** : प्राचीन धार्मिक स्थळे, मंदिरांची संरचना, मूर्ती, चित्रकला इत्यादींचा अभ्यास.

**ऐतिहासिक महत्त्व :**

गावांचा इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे प्राचीन काळातील समाजाच्या जडणघडणीबद्दल माहिती मिळते. एकूणच, ग्रामीण जीवन हा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या मानवाच्या विकासाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. गावांच्या इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्व पुढील प्रकारे अधोरेखित करता येईल:

**१. सामाजिक महत्त्व** : गावांच्या इतिहासामुळे त्यांच्यातील विविध घटक, वर्ग, आणि त्यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास करता येतो. विविध जाती, धर्म, आणि समाजघटकांमधील सहजीवन, संघर्ष, आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेचे निरिक्षण करता येते.

**२. आर्थिक महत्त्व** : गावांच्या इतिहासामुळे प्राचीन काळातील अर्थव्यवस्थेची रचना, व्यापार, शेती, आणि इतर उद्योग यांचा अभ्यास करता येतो. विविध तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत कसा बदल झाला, याची माहिती मिळते.

**३. राजकीय महत्त्व** : ग्रामीण भागातील राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी इतिहास महत्त्वाचा ठरतो. विशेषत: विविध राजकीय सत्ताधाऱ्यांचे प्रशासन, कर प्रणाली, जमीनहक्क, आणि सामाजिक न्याय यांमध्ये कसा फरक पडला, याचा अभ्यास करता येतो.

४. **सांस्कृतिक महत्त्व** : गावांच्या इतिहासातून त्या समाजाच्या परंपरा, सण, उत्सव, आणि धार्मिक विश्वास यांचा अभ्यास करता येतो. ग्रामीण संस्कृतीच्या विकासाची प्रक्रिया, तिच्या परंपरांचा अभ्यास करता येतो.

५. **पर्यावरणीय महत्त्व** – ग्रामीण समाजाचा पर्यावरणाशी असलेला परस्पर संबंध समजून घेता येतो. पर्यावरणीय घटकांचा ग्रामीण अर्थव्यवस्था, जीवनशैली, आणि समाजावर कसा प्रभाव पडतो, याचा अभ्यास करता येतो.

गावांच्या इतिहासाचा अभ्यास हा एक व्यापक विषय आहे जो आपल्याला प्राचीन समाजांच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास करण्यास सक्षम करतो. गावांच्या इतिहासामुळे एकूणच समाजाच्या विकासाची प्रक्रिया, तंत्रज्ञानातील बदल, सामाजिक संघर्ष, आणि पर्यावरणीय घटक यांचा सखोल अभ्यास करता येतो. ग्रामीण समाजातील घटनांचे आणि घडामोडींचे महत्त्व समजून घेतल्याने समाजातील विविध समस्यांना प्रभावीपणे सामोरे जाता येते. यामुळे समाजाच्या भविष्याचा विचार करताना पारंपारिक ज्ञान, संस्कृती, आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करता येतो, तसेच ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन दिशा मिळते.

**२.३.३.२ नागरी इतिहास –**

''नगर'' शब्दाची उत्पत्ती संस्कृत भाषेतील ''नगर'' या शब्दातून झाली आहे. संस्कृतमध्ये ''नगर'' म्हणजे शहर किंवा नगरी. ''नगर'' हा शब्द ''नग'' या मूळ धातूपासून आला आहे, ज्याचा अर्थ पर्वत किंवा उच्च स्थळ असा होतो. ऐतिहासिकदृष्ट्या, अनेक नगरं ही सुरुवातीला संरक्षित ठिकाणी किंवा उंच ठिकाणी वसवली गेली, त्यामुळे ''नगर'' हा शब्द शहरी वस्ती किंवा शहरासाठी वापरला गेला. नगर म्हणजेच एक मोठी, संरचित वस्ती, जिथे व्यापार, प्रशासन, आणि सांस्कृतिक उपक्रमांची भरभराट होते. ''नगर'' शब्दाचा उपयोग आज विविध शहरी केंद्रांसाठी केला जातो, जसे की नगर, महानगर, शहर इत्यादी.

**नागरी इतिहास** : नगरांचा इतिहास म्हणजे एका विशिष्ट समाजाची, संस्कृतीची, आणि नागरी संस्थांची (civil institutions) उत्पत्ती, विकास, आणि प्रवास यांचा अभ्यास होय. नागरी इतिहासात शहरांचे किंवा गावांचे स्थायिकरण, नागरीकरण, तांत्रिक प्रगती, प्रशासनिक व्यवस्था, आर्थिक स्थिती, सांस्कृतिक जीवन, सामाजिक बदल आणि त्या समाजाच्या इतर व्यवहारांचा समावेश होतो. यामध्ये केवळ भौतिक विकासच नव्हे तर वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक विकासाचा समावेश केला जातो.

**नागरी इतिहास** (Urban History) **आणि स्थानिक इतिहास** (Local History)

नागरी इतिहास (Urban History) आणि स्थानिक इतिहास (Local History) यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे, कारण दोन्ही इतिहास प्रकार विशिष्ट भौगोलिक क्षेत्राशी संबंधित असतात, परंतु त्यांचा अभ्यासाचे क्षेत्र  वेगवेगळे असू शकतात.

नागरी इतिहास हा मुख्यत्वे शहरीकरणाच्या प्रक्रियेचा, शहरांच्या स्थापनेचा, विकासाचा, लोकसंख्येचा, सामाजिक आणि आर्थिक संरचनेचा, तसेच नागरी संस्कृतीचा अभ्यास करतो. यामध्ये शहरांचे स्थापत्य, प्रशासन, व्यापार-उदीम, सार्वजनिक सेवा, आणि शहरी जीवनातील इतर पैलू यांचा समावेश होतो. नागरी

इतिहासात शहरांमध्ये झालेल्या बदलांची, शहरीकरणाच्या प्रक्रियांची आणि त्यांच्याशी संबंधित सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. स्थानिक इतिहास हा विशिष्ट प्रदेश, गाव, शहर किंवा समुदायाचा इतिहास आहे. हा इतिहास विशेषतः त्या ठिकाणच्या स्थानिक परंपरा, प्रथा, सामाजिक संरचना, स्थानिक व्यक्ती आणि इतर घटनांचा अभ्यास करतो. यामध्ये त्या विशिष्ट ठिकाणच्या सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा सखोल अभ्यास केला जातो.

**नागरी इतिहास लेखनाची सुरुवात**

१८ व्या शतकाच्या शेवटी आणि १९व्या शतकाच्या सुरूवातीस औद्योगिक क्रांतीमुळे युरोप आणि अमेरिकेत मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले. शहरे मोठी झाली, नवीन शहरी केंद्रे निर्माण झाली, आणि शहरातील जीवन बदलले. या बदलांमुळे शहरीकरणाच्या इतिहासाचा अभ्यास आवश्यक ठरला. औद्योगिकरणामुळे शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली, स्थलांतरितांची संख्या वाढली, आणि समाजाच्या विविध घटकांमध्ये बदल झाले. या बदलांचा अभ्यास करण्यासाठी शहरी इतिहास लेखनाला चालना मिळाली.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला शहरीकरण, शहरी समाजशास्त्र, शहरी योजना आणि शहरी राजकारण यांवर संशोधन वाढले. यामुळे नागरी इतिहास लेखनाला अधिक शास्त्रशुद्ध दृष्टिकोन मिळाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकात मार्क्सवादी इतिहासलेखन, सामाजिक इतिहास आणि संस्कृतीवर आधारित इतिहास लेखनाचा प्रभाव वाढला. यामुळे शहरी समाजातील वर्ग संघर्ष, श्रमिक चळवळी, आणि शहरी विकासाचे पैलू यांवर लक्ष केंद्रित केले गेले.उदाहरणार्थ, इंग्लंडमधील औद्योगिक शहरे, पॅरिसची पुनर्रचना आणि अमेरिकेतील महानगरांचा विकास हे नागरी इतिहास लेखनातील काही महत्त्वाचे विषय बनले.

आधुनिक काळात नागरी इतिहास लेखनामध्ये शहरे आणि त्यांच्या विकासाचा अधिक व्यापक अभ्यास केला जातो. यामध्ये शहरीकरणाचे पर्यावरणीय परिणाम, स्थलांतर, जागतिकीकरण, आणि शहरी संस्कृती यांचा समावेश असतो. नागरी इतिहास आता फक्त पश्चिमी देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तो जगभरातील शहरांचा आणि त्यांच्या विशिष्ट समस्या, संस्कृती आणि विकासाचा अभ्यास करण्यासाठी विस्तारित झाला आहे. नागरी इतिहास लेखनाची सुरुवात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या परिणामांच्या अभ्यासातून झाली, आणि आता ते एक व्यापक आणि सखोल शास्त्रशुद्ध क्षेत्र बनले आहे.

**भारतातील शहरी अथवा शहरांचा इतिहास :**

भारतातील नागरी इतिहासाचे लेखन १८ व्या आणि १९ व्या शतकातील औपनिवेशिक काळात सुरू झाले, जेव्हा ब्रिटिश शासकांनी भारतीय शहरांमधील प्रशासन, व्यापार, आणि सामाजिक संरचनेचा अभ्यास करण्यासाठी इतिहासलेखन केले. तथापि, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतीय इतिहासकारांनी नागरी इतिहासाच्या अभ्यासाकडे अधिक व्यापक आणि विविध दृष्टिकोनातून पाहिले.

**ब्रिटीश काळ**

ब्रिटिश शासकांनी त्यांच्या प्रशासनाच्या सोयीसाठी मोठ्या भारतीय शहरांचा अभ्यास सुरू केला. मुंबई, कोलकाता, आणि मद्रास यांसारख्या बंदर शहरांच्या विकासाचे दस्तऐवजीकरण करण्यात आले. ब्रिटिशांनी मुख्यतः व्यापार, करप्रणाली, आणि शहरी नियोजनावर लक्ष केंद्रित केले. या काळात नागरी इतिहासाचे लेखन मुख्यतः ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून झाले, ज्यात स्थानिक लोकांच्या गरजा आणि संस्कृती यांना महत्व नव्हते .

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय इतिहासकारांनी स्वातंत्र्यलढ्याचा भाग म्हणून शहरी केंद्रांचे महत्त्व ओळखले. शहरांमध्ये झालेल्या राजकीय चळवळी, सामाजिक सुधारणा, आणि राष्ट्रवादी विचारसरणीच्या प्रसाराचा अभ्यास सुरू झाला.या काळात मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, पुणे, बनारस अशा शहरांमध्ये झालेल्या घडामोडींचा इतिहास लिहिला जाऊ लागला.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ**

स्वातंत्र्यानंतर नागरी इतिहास लेखनाचे स्वरूप बदलले. शहरांचे आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने अभ्यास सुरू झाला. विशेषतः औद्योगिकरणानंतर भारतीय शहरांच्या झालेल्या वाढीचा, स्थलांतरितांचे वाढलेले प्रमाण, आणि झोपडपट्ट्यांचे वाढलेले जाळे यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. शहरीकरण, नागरी विकास, नागरीकरणाचे पर्यावरणीय परिणाम, आणि शहरीकरणामुळे होणारे सामाजिक ताण यांचा अभ्यास वाढला.

**समकालीन नागरी इतिहास**

अलीकडील काळात नागरी इतिहास लेखन अधिक व्यापक आणि समग्र झाले आहे. यात विविध सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय घटकांचा समावेश केला जात आहे.उदाहरणार्थ, दिल्लीचा इतिहास, मुंबईच्या झोपडपट्ट्यांचा विकास, बेंगळुरूच्या माहिती तंत्रज्ञान केंद्राचा उदय, कोलकात्याचा सांस्कृतिक वारसा यांसारख्या विषयांचा अभ्यास केला जात आहे. नागरी इतिहास लेखनात आता लिंग, जात, वर्ग, आणि धर्म यांच्याशी संबंधित प्रश्नांचा समावेश केला जात आहे.

Sharada Dwivedi & Rahul Mehrotra - "Bombay: The Cities Within"- ", नारायण आचार्य यांचे जयपूर शहराच्या इतिहासावर आधारित "The History of Jaipur", माधुरी शर्मा यांचे कोलकाता शहराच्या सांस्कृतिक इतिहासावर "Calcutta: A Cultural and Literary History" यांचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास सन १८३६ मध्ये प्रसिद्ध झालेले गोविंद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', सन १९६८ मध्ये प्रसिद्ध झालेले श्री. ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन', श्री. आर. व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. ही परंपरा आणखी वृद्धिंगत झाल्याचे दिसते त्यामध्ये श्री. ना. गो. चाफेकर यांचे 'बदलापूर', श्री. दे.गो. लांडगे यांचे 'नागपूरच्या सांस्कृतिक

इतिहास', राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', श्री. पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', अरुण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादित केलेले 'शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा', 'हिरक महोत्सवी सांगली' संपादन व संकल्पना शेखर जोशी, डॉ. सुवर्णा पाटील यांचे 'मिरज शहराचा इतिहास' या ग्रंथांचा जाणीवपूर्वक उल्लेख करावा लागेल.

**नागरी इतिहासाच्या संदर्भासाठी विविध साधने**

नागरी इतिहासाच्या अभ्यासासाठी विविध प्रकारचे स्रोत वापरले जातात, ऐतिहासिक दस्तऐवज, पुरातत्त्वीय पुरावे, वास्तूशिल्प, चित्रकला, मूर्तिकला, लोककथा, तसेच साहित्य. या स्रोतांच्या आधारे नागरी इतिहासाचा अभ्यास केला जातो.

१. विशिष्ट शहराच्या इतिहासावर आधारित ग्रंथ आणि लेख, उदाहरणार्थ: "Bombay: The Cities Within" (मुंबई), "Pune: Its History and Its Monuments" (पुणे), शासकीय अभिलेख (Government Archives):

२. शासकीय कार्यालये, संग्रहालये, राष्ट्रीय अभिलेखागार (National Archives of India) आणि राज्य अभिलेखागार, इतिहास, समाजशास्त्र, आणि पुरातत्त्वशास्त्राच्या क्षेत्रातील शैक्षणिक नियतकालिके.

३. पुरातत्त्वीय उत्खनन - शहरांच्या ऐतिहासिक वास्तूंची आणि अवशेषांची शोध प्रक्रिया, जी शहरांच्या प्राचीन काळच्या इतिहासाचा मागोवा घेण्यात मदत करते. उदा. कोल्हापुरातील ब्रह्मपुरीतील उत्खनन.

४. ऐतिहासिक नकाशे, प्राचीन नकाशे आणि ऐतिहासिक स्थलाकृतिक माहिती, जी शहराच्या विकासाचा मागोवा घेण्यात उपयोगी ठरते.

स्थानिक लोकांची स्मृती आणि अनुभव, ज्यांचा लेखी आणि मौखिक रूपात संग्रह केला जातो. या संदर्भ साधनांचा वापर करून तुमचं नागरी इतिहासाचे संशोधन अधिक व्यापक आणि सुसंगत होऊ शकतं.

**नागरी इतिहासाच्या अभ्यासाचे प्रमुख घटक -**

१. भोगोलिक घटक (Geographical Factors) : शहराचे स्थान, नद्या, पर्वत, आणि भूगोलाचा इतिहासावर प्रभाव.पाणीपुरवठा, नैसर्गिक संसाधने, आणि हवामान.

२. राजकीय इतिहास (Political History) : शहराचे प्रशासन, शासन व्यवस्था, राजकीय घटनाक्रम, आणि महत्वपूर्ण व्यक्तिमत्वे.विविध राजवंशांचे आणि शासकांचे कालखंड.

३. आर्थिक इतिहास (Economic History) : व्यापार, उद्योग, आणि आर्थिक विकास.स्थानिक व्यवसाय, बाजारपेठा, आणि आंतरराष्ट्रीय व्यापार.

४. सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन (Cultural and Social Life) : स्थानिक समाजाची रचना, जीवनशैली, धर्म, भाषा, आणि परंपरा.सांस्कृतिक उत्सव, कलेच्या प्रकारांची माहिती, आणि लोकसाहित्य.

५. शहरी नियोजन आणि वास्तुकला (Urban Planning and Architecture) : शहराच्या संरचनेचा विकास, सार्वजनिक इमारती, आणि वास्तुकलेतील बदल.महत्त्वपूर्ण स्मारके, किल्ले, आणि ऐतिहासिक इमारती.

६. पुरातत्त्वशास्त्र (Archaeology) : उत्खनन आणि ऐतिहासिक वस्तूंचे विश्लेषण.

प्राचीन वस्तू, किल्ले, आणि इतर अवशेष.ऐतिहासिक अभिलेख, शासकीय दस्तऐवज, न्यायालयीन अभिलेख, सार्वजनिक नोंदी, जणतेची नावे, आणि वंशावळी.

७. वृत्तपत्रे आणि पत्रकारिता (Newspapers and Journalism) : ऐतिहासिक वृत्तपत्रे आणि मासिके, जी शहरातील घटनांचा आढावा घेतात. पत्रकारांचे लेख आणि सार्वजनिक संवाद.

८. सामाजिक बदल (Social Changes) : लोकसंख्येतील बदल, स्थलांतर, आणि सामाजिक समस्या.

शैक्षणिक आणि आरोग्य सेवांतील बदल. स्थानिक लोकांची कहाणी, अनुभव, आणि स्मृती.

पारंपरिक माहिती आणि ऐतिहासिक माहितीची माहिती.

९. आंतरराष्ट्रीय संबंध (International Relations) : शहराचे इतर देशांशी आणि शहरांशी संबंध.

सामरिक, व्यापारिक, आणि सांस्कृतिक आदानप्रदान.

या घटकांचा सुसंगतपणे अभ्यास करून, एका शहराच्या ऐतिहासिक विकासाचे संपूर्ण चित्र समजून घेता येते

**नागरी इतिहासाचे महत्त्व:**

नागरी इतिहासाचा अभ्यास केल्याने शहरी समाजाच्या प्रगतीचा मागोवा घेता येतो. यामध्ये विविध समाजातील नागरिकांच्या जीवनशैलीतील बदल, त्यांच्या नवनिर्मितीच्या क्षमतेत वाढ, आणि समाजातील बदल यांचा समावेश होतो. नागरी इतिहासामुळे लोकांच्या भूतकाळातील अनुभवांचे दस्तऐवजीकरण होते, ज्यामुळे त्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी नवीन उपाय योजना करता येतात.ऐतिहासिक महत्व:

१. नागरी इतिहासाचे ऐतिहासिक महत्त्व अनेक पातळ्यांवर आहे. सर्वप्रथम, नागरी इतिहासामुळे समाजाच्या बदलांचा मागोवा घेता येतो. तसेच, या इतिहासाच्या अभ्यासाने आपल्याला त्या समाजाच्या संघर्षांचे, विजयांचे, आणि बदलांच्या प्रक्रियेचे सखोल आकलन होते.

२. सांस्कृतिक विकास : नागरी इतिहासाच्या अभ्यासाने आपल्याला विविध संस्कृतींच्या विकासाचे ज्ञान होते. विविध समाजांमध्ये कला, साहित्य, संगीत, आणि धर्म यांच्या विकासाची माहिती मिळते.

३. राजकीय आणि सामाजिक बदल : नागरी इतिहासाच्या माध्यमातून विविध राजकीय घडामोडी आणि सामाजिक बदलांची माहिती मिळते. या इतिहासाच्या माध्यमातून प्राचीन समाजांमध्ये राजकीय व्यवस्थांमधील बदलांचे स्वरूप आणि कारणे समजता येतात.

४. आर्थिक घडामोडी : नागरी इतिहासात आर्थिक स्थितीचा महत्त्वाचा भाग आहे. एकूण आर्थिक व्यवहारांचा विकास, व्यापाराच्या विकासाची प्रक्रिया, त्याचे प्रभाव, आणि त्या काळातील लोकांची जीवनशैली यांचे अध्ययन केले जाते.

५. पुरातत्त्वीय महत्त्व : नागरी इतिहासाच्या अभ्यासाने विविध पुरातत्त्वीय ठेवे उलगडले जातात. यामुळे त्या काळातील नागरीकरणाची माहिती मिळते.

नागरी इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे केवळ भूतकाळातील घटनांचा मागोवा मिळत नाही, तर सध्याच्या आणि भावी समाजाच्या विकासासाठी दिशा मिळते. नागरी इतिहासाच्या अध्ययनामुळे मानव समाजाच्या प्रगतीतून शिकता येते आणि त्यातून नवीन समाजव्यवस्थांचे निर्माण होते. नागरी इतिहासाच्या महत्त्वामुळेच समाजाची आणि संस्कृतीची जडणघडण, विकास प्रक्रिया, आणि विविध घडामोडींचे सखोल अध्ययन करता येते. यामुळे मानव जातीच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन मिळते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

प्रश्न १. दोन वाक्यातील योग्य पर्याय लिहा.

१. अ) ग्रामीण इतिहास म्हणजे ग्रामीण भागातील समाज, संस्कृती, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, पर्यावरण, आणि राजकारण यांचा अभ्यास होय.

ब) ग्रामीण इतिहास हा सामाजिक इतिहासाचा एक भाग आहे,

अ) 'अ' बरोबर असून 'ब' चूक आहे.

ब) 'अ' चूक असून 'ब' बरोबर आहे.

क) 'अ' आणि 'ब' चूक आहे

ड) 'अ' आणि 'ब' बरोबर आहे.

२. अ) ब्रिटिश शासकांनी त्यांच्या प्रशासनाच्या सोयीसाठी मोठ्या भारतीय शहरांचा अभ्यास केला.

ब) या अभ्यासात स्थानिक लोकांच्या गरजा आणि संस्कृती यांना महत्व होते.

अ) 'अ' बरोबर असून 'ब' चूक आहे.

ब) 'अ' चूक असून 'ब' बरोबर आहे.

क) 'अ' आणि 'ब' चूक आहे

ड) 'अ' आणि 'ब' बरोबर आहे.

ब. योग्य जोडी जुळवा.

| 'अ ' गट (ग्रंथाचे नाव ) | 'ब' गट (लेखकाचे नाव ) |
|---|---|
| १. 'बदलापूर' | १. श्री. दे. गो. लांडगे |

| | |
|---|---|
| २. 'पुणे शहराचे वर्णन' | २. श्री. ना. गो. चाफेकर |
| ३. 'नोट्स ऑन कोल्हापूर' | ३. गोविंद माडगावकर |
| ४. 'मुंबईचे वर्णन', | ४. श्री. आर. व्ही. सबनीस |
| ५. 'नागपूरच्या सांस्कृतिक इतिहास', | ५. श्री. ना. वि. जोशी |

## २.४ सारांश

इतिहास लेखन शास्त्रामध्ये अनेक नवनवीन विचार प्रवाह उदयास आले आहेत. त्यामध्ये स्थानिक इतिहास, स्त्रीवादी इतिहास, समकांलीन इतिहास, ग्रामीण इतिहास, नागरी इतिहास, सूक्ष्म इतिहास, अशा अनेक विद्याशाखांचा समावेश होतो. सूक्ष्म अथवा अंशलक्षी इतिहास म्हणजे एखाद्या सूक्ष्म किंवा लहान अभ्यास घटकाचे संशोधन करत असताना घटनेचे सूक्ष्म विश्लेषण व पुराव्यांचा सखोल अभ्यासाद्वारे केलेली विश्लेषण होय. हा एक स्थानिक इतिहासाचा उपघटक मानला जातो. सूक्ष्म इतिहासामध्ये इटालियन व ब्रिटिश इतिहासकारांचे योगदान मोठे आहे. भारतामध्ये रणजीत गुहा व त्यांच्या सहकाऱ्यानी सूक्ष्म इतिहासाची मांडणी केलेली दिसून येते. सूक्ष्म इतिहासाची सूक्ष्म अभ्यास घटकाची निवड, स्थळ व काळ, व्यक्ती मर्यादित अभ्यास विषय, दुर्लक्षित व कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांवर प्रकाश इत्यादी वैशिष्ट्ये आहेत. या लेखनाचे जसे फायदे आहेत तशा काही मर्यादा देखील आहेत.

फॅमिली हिस्टरी म्हणजेच कुळाचा इतिहास हा सुद्धा एक अभ्यासप्रकार वर्तमान काळामध्ये महत्त्वाचा होत आहे. हा केवळ एक व्यक्तिगत अभ्यास नसून तो एक सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. एखाद्या कुटुंबाचा म्हणजेच फॅमिलीचा पूर्ण आणि सखोल अभ्यास फॅमिली हिस्टरी मध्ये केला जातो. ही घराणी तत्कालीन समाजावर राजकारणावर प्रकाश टाकणारी असतात, समाजाचे राजकारणाचे नेतृत्व करणारी असतात म्हणून यांचा अभ्यास म्हणजेच तत्कालीन समाजाचा राजकारणाचा काही अंशी अभ्यास असतो. फॅमिली मिळून समाज बनत असतो व या समाजाचे ग्रामीण व शहरी असे दोन भाग पडतात. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण समाज आहे हा ग्रामीण इतिहास सुद्धा भारताच्या इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहे. ग्रामीण इतिहासाच्या अभ्यासामुळे समाजाची सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, परिस्थिती लक्षामध्ये येते. मानव समाजाची उगमभूमीच ग्रामीण क्षेत्रात आहे. त्यामुळे ग्रामीण इतिहासाला अत्यंत महत्त्व आहे. ग्रामीण समाजाचा विकास होत जाऊनच त्याचे शहरांमध्ये रूपांतर झालेले दिसून येते. त्यामुळे शहरे अथवा नगरांचा इतिहास म्हणजेच नागरी इतिहास सुद्धा इतिहासाच्या विविध प्रकारातील एक महत्त्वपूर्ण इतिहास प्रकार आहे. नागरी इतिहास म्हणजे एका विशिष्ट समाजाची संस्कृतीची आणि नागरी संस्थांची उत्पत्ती विकास आणि प्रवास यांचा अभ्यास होय. औद्योगिक क्रांतीनंतर मोठ्या प्रमाणामध्ये शहरांची निर्मिती झाली. त्यामुळे शहरांच्या अभ्यासाला आधुनिक इतिहासामध्ये महत्त्व आलेले दिसून येते. शहरांच्या अभ्यासामुळे शहराचा एतिहासिक वारसा जपला जातो. तसेच शहराचे समकालीन प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्यास मदत होते. सूक्ष्म इतिहास, शहरांचा इतिहास, ग्रामीण इतिहास, कौटुंबिक इतिहास अशा अनुषंगाने संदर्भ साधने मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. ही

संदर्भ साधने प्राथमिक, दुय्यम, मौखिक अशा विविध प्रकारची आहेत. या संदर्भ साधनांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अन्वयार्थ लावून वस्तुनिष्ठ इतिहास लिहिल्यास समाजाच्या व देशाच्या ऐतिहासिक लेखन परंपरेमध्ये संपन्नता येते.

## २.५ परिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. सूक्ष्म - सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना

२. वंचित - तळागाळातील दुर्लक्षित व्यक्ती अथवा समूह

३. मौखिक - पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले

४. समकालीन - त्याच काळातील

५. संदर्भ साधने - कागदपत्रे अथवा पुरावे

६. वस्तुनिष्ठ - नि:पक्षपातीपणे, जसे आहे तसे

७. कुळ - घराणे, कुटुंब

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. अ) २. ड) ३. क) ४. ब) ५. क)

**स्वयं अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

अ) १- ब) २- ड)

ब) १ -४ २ - ३ ३ - २ ४ - १

**स्वयं अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

अ) १ - ड) २ - अ)

ब) १ - २ २ - ५ ३ - ४ ४ - ३, ५ - १

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा.

१) सूक्ष्म इतिहास म्हणजे काय?

२) कुळाचा इतिहास लिहिण्यासाठी उपयुक्त संधर्भ साधने कोणती आहेत?

३) ग्रामीण इतिहासाचे प्रमुख घटक कोणते आहेत?

४) नागरी इतिहासाचे प्रमुख घटक कोणते आहेत?

५) नागरी इतिहास आणि स्थानिक इतिहासाचा संबंध स्पष्ट करा.

ब) सविस्तर उत्तरे लिहा.

१) सूक्ष्म इतिहास म्हणजे काय स्पष्ट करून त्याची वैशिष्ट्ये, मर्यादा व उपयोग याचे सविस्तर विवेचन करा.

२) कुळाचा इतिहासाचा अर्थ सांगून त्याची संदर्भ साधने आणि ठळक उदाहरणासहित ऐतिहासिक महत्व स्पष्ट करा.

३) ग्रामीण इतिहासाचा अर्थ सांगून त्याचे प्रमुख घटक, संदर्भ साधने आणि ठळक उदाहरणासहित ऐतिहासिक महत्व स्पष्ट करा.

४) नागरी इतिहासाचा अर्थ सांगून त्याचे प्रमुख घटक, संदर्भ साधने आणि ठळक उदाहरणासहित ऐतिहासिक महत्व स्पष्ट करा.

## २.७ संदर्भ आणि अधिक वाचनासाठी ग्रंथ


१) डॉ. कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन नागपूर, २००५.

२) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., हनमाणे, इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९६.

३) सरदेसाई बी. एन., इतिहास लेखन परिचय, फडके प्रकाशन कोल्हापूर, २०१२.

४) बांबूरकर जास्वंदी (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०१४.

५) डॉ. पाटील अवनीश, समकालीन इतिहास लेखन, विभागीय अध्यक्ष भाषण, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, संशोधन पत्रिका २०१६.

६) डॉ. पाटील अवनीश, मायक्रो हिस्टरी : परिचयात्मक टिपण, निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर, २०१३.

७) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, महाराष्ट्र, दूर शिक्षण केंद्र, एम. ए. भाग-२: इतिहास, इतिहास लेखनातील नवे प्रवाह. (२०१९-२०).

८) रणजीत गुहा, सबाल्टर्न स्टडीज रीडर, ६ खंड, १९८६- १९९५, युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा प्रेस.


❑❑❑

# घटक ३
# स्थानिक इतिहासाची साधने

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ खाजगी कागदपत्रे आणि संग्रह

३.२.२ वर्तमानपत्रे

३.२.३ मौखिक मुलाखत

३.२.४ कलाकृती आणि स्मारके

३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास;

१. स्थानिक इतिहास लेखनातील ऐतिहासिक साधनांचे महत्व समजून घेता येईल.

२. खाजगी कागदपत्रे आणि संग्रह यांच्या विश्लेषणाचे स्थानिक इतिहास लेखनातील महत्व समजून घेता येईल.

३. ऐतिहासिक साधने म्हणून  वर्तमानपत्रांचे महत्व समजून घेता येईल.

४. मौखिक मुलाखत हा स्थानिक इतिहास लेखनाचा साधन म्हणून समजून घेता येईल.

५. स्थानिक इतिहास लेखनाच्या पुनर्रचनेतील कलाकृती आणि स्मारकांचे योगदान समजून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना

स्थानिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील भूतकाळाचा अभ्यास, जो गाव, शहरे किंवा प्रदेशांवर केंद्रित असतो. हा इतिहास पुन्हा जिवंत करण्यासाठी आणि त्याची माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक विविध साधनांचा वापर करतात, ज्यातील प्रत्येक साधन अनोख्या दृष्टिकोनातून माहिती देते. खाजगी दस्तऐवज, संग्रह, वैयक्तिक अनुभव आणि व्यक्तींच्या जीवनातील गोष्टींवर प्रकाश टाकतात, तर वृत्तपत्रे सार्वजनिक घटनांचे आणि मतांचे विस्तृत चित्र मांडतात. तोंडी इतिहास अथवा मुलाखती म्हणजे लोकांचे आवाज आणि आठवणींचे संग्रह असतात, जे परंपरा आणि अनुभव जपतात. कलाकृती आणि स्मारके भूतकाळाशी जोडणारे दृश्यमान दुवे असतात, ज्यामुळे समाजाची भौतिक संस्कृती आणि मूल्ये प्रकट होतात. थोडक्यात, ही साधने स्थानिक इतिहासाचा पाया तयार करतात आणि आपल्याला भूतकाळाच्या समृद्ध आणि विविध पैलूंना एकत्र आणण्यात मदत करतात.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ खाजगी कागदपत्रे आणि संग्रह

स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी खाजगी कागदपत्रे आणि संग्रह महत्त्वाची साधने आहेत. ही कागदपत्रे भूतकाळाशी थेट जोडलेली असतात. त्यातून दैनंदिन जीवनातील तपशीलवार माहिती मिळते. यामुळे सामाजिक बदल, आर्थिक हालचाली आणि विशेष समाजातील सांस्कृतिक पद्धती समजून येतात. अशा कागदपत्रांमुळे भूतकाळातील लोकांच्या जीवनशैलीचा अभ्यास करता येतो.

**स्थानिक इतिहासातील खाजगी कागदपत्रे आणि संग्रहांचे महत्त्व:**

स्थानिक इतिहास लहान समूह, शहरे किंवा प्रदेशांवर लक्ष केंद्रित करतो. तो लोकांमधील नातेसंबंध, परस्परसंवाद आणि घटनांचे परीक्षण करतो. स्थानिक इतिहासाची पारंपारिक साधने, जसे की जनगणनेच्या नोंदी, जमीन कागदपत्रे आणि नगरपालिका अभिलेख खूप महत्त्वाचे असतात. मात्र, खाजगी कागदपत्रे आणि संग्रह वेगळा दृष्टिकोन देतात. त्यातून समाजात राहणाऱ्या लोकांचे विचार, भावना आणि दैनंदिन अनुभव समजतात. खाजगी कागदपत्रे स्थानिक इतिहासाला सूक्ष्मता आणि संदर्भ देतात. या कागदपत्रांमध्ये वैयक्तिक माहिती, खाजगी पत्रव्यवहार आणि कौटुंबिक परस्परसंवादाची माहिती मिळते. इतिहासकारांसाठी ही कागदपत्रे खूप मौल्यवान असतात. यामुळे विशिष्ट समूहाच्या समाजाची पुनर्रचना करता येते आणि स्थानिक स्तरावरील मोठ्या घटनांचा प्रभाव समजून येतो.

**खाजगी कागदपत्रांचे प्रकार आणि त्यांचे ऐतिहासिक मूल्य**

**१) वैयक्तिक पत्रव्यवहार आणि रोजनिशी :**

स्थानिक इतिहासकारांसाठी वैयक्तिक पत्रे आणि रोजनिशी ही महत्त्वाची साधने आहेत. उदा., युद्धाच्या काळात सैनिकाने आपल्या घरी पाठवलेली पत्रे त्याच्या रणांगणातील अनुभवांचे वर्णन करतात. यासोबतच,

त्या संघर्षाचा त्याच्या कुटुंबावर आणि समाजावर काय परिणाम झाला, हे देखील स्पष्ट होते. रोजनिशीमध्ये व्यक्तीचे विचार, हालचाली आणि दैनंदिन जीवनाच्या नोंदी आढळतात. या दस्तऐवजांमुळे स्थानिक लोकांनी आर्थिक संकटे, नैसर्गिक आपत्ती आणि सामाजिक बदलांना कसा प्रतिसाद दिला, हे समजण्यास मदत होते. अशा दस्तऐवजांमुळे भूतकाळातील घटना आणि त्यासंबंधित लोकांची प्रतिक्रिया अधिक स्पष्टपणे समोर येते.

**२) आत्मचरित्र:** आत्मचरित्र एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना, यश किंवा आव्हानांचा आढावा घेते. हे लेखन त्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून असतं, त्यामुळे त्यात स्मृती आणि पूर्वग्रहांचा प्रभाव असू शकतो. तरीदेखील, आत्मचरित्र समाजातील लोकांच्या जीवनातील अनुभव समजून घेण्यास मदत करतं. स्थानिक इतिहासकारांसाठी, आत्मचरित्रे त्या काळातील सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती स्पष्ट करतात तसेच त्या व्यक्तींच्या वैयक्तिक प्रेरणा आणि आकांक्षा समजायला मदत करतात. यामुळे विशिष्ट काळातील लोकांचे जीवन आणि त्यांची विचारसरणी अधिक चांगल्या प्रकारे उलगडते.

**३) कौटुंबिक नोंदी आणि वंशावळी:** कौटुंबिक नोंदी जसे की जन्म, मृत्यू प्रमाणपत्रे, विवाह नोंदी आणि वंशावळी, स्थानिक कुटुंबांचे वंश आणि नातेसंबंध समजून घेण्यासाठी उपयुक्त असतात. या नोंदींमुळे स्थलांतर, विवाह आणि कुटुंब निर्मितीच्या उदाहरणांवर प्रकाश टाकला जातो. वंशावळीच्या नोंदींमुळे सामाजिक संबंध, वारसा पद्धती आणि कौटुंबिक बदलांची माहिती मिळते. बऱ्याच वेळा अशा नोंदी खाजगी संग्रहात जपल्या जातात आणि पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होतात. पश्चिम महाराष्ट्रात हेळवी समाजाचे वंशावली जतनात मोठे योगदान आहे. त्यांनी याला पारंपारिक सांस्कृतिक व्यवसाय म्हणून मान्यता दिली आहे. विशेषतः कौटुंबिक नोंदी आणि स्थानिक इतिहास जतन करण्यात हेळवी समाजाचे महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी मौखिक परंपरा, कथा, लोकगीते यांच्या माध्यमातून स्थानिक इतिहास एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेला आहे. हे योगदान त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. मूळचा बेळगाव जिल्ह्यातील असलेला हा समाज सध्या चिकोडी, अथणी, कागवड परिसरात राहतो. तरीही यांच्याकडे कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर आणि बेळगाव जिल्ह्यांतील गावागावांच्या वंशावळींची नोंदी आहेत. या नोंदी मोडी लिपित आहेत, ज्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे.

**४) छायाचित्रे आणि दृक साहित्य:** छायाचित्रे, पोस्टकार्ड्स आणि इतर दृक साहित्य समाजाच्या भौतिक आणि सामाजिक परिस्थितीची मांडणी करण्यासाठी महत्त्वाची साधने आहेत. या प्रतिमा दैनंदिन जीवन, स्थानिक खुणा आणि महत्त्वाच्या घटनांचे दृश्य रेकॉर्ड ठेवतात. उदाहरणार्थ, कौटुंबिक छायाचित्रांचा संग्रह शहराचा मुख्य रस्ता किंवा कुटुंबाचे घर कसे बदलले हे दाखवू शकतो. दृश्य साहित्यामधून कपडे, शैली, वाहतूक, स्थापत्य आणि समाजाच्या सांस्कृतिक पैलूंची माहिती मिळते. त्यामुळे भूतकाळातील बदल अधिक स्पष्टपणे समजू शकतात.

**५) व्यवसाय कागदपत्रे आणि आर्थिक दस्तऐवज:** खाजगी संग्रहांमध्ये खाते पुस्तके, पावत्या, आणि व्यवसायाशी संबंधित पत्रव्यवहार असतात. या नोंदींमुळे स्थानिक उद्योग, व्यापार, आणि कामगार पद्धती

समजण्यास मदत होते. या दस्तऐवजांमुळे समाजाचा आर्थिक इतिहास आणि ग्राहकांचे वर्तन उघड होते. व्यवसायाच्या नोंदींमुळे रहिवाशांची आर्थिक स्थिती, पायाभूत सुविधांचा विकास, आणि समाजातील आर्थिक संबंधांवरही प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, स्थानिक दुकानातील खाते पुस्तके कर्जाचे नमुने, खरेदीची पद्धती, आणि आर्थिक संकटाचा समाजावर झालेला परिणाम दाखवू शकतात.

**६) सामाजिक आणि नागरी सहभाग नोंदी:** स्थानिक क्लब, सोसायट्या, धार्मिक संस्था यांच्याकडे अनेकदा सदस्य नोंदी, कार्यक्रम पत्रिका आणि वृत्तपत्रे असतात. या नोंदी खाजगी संग्रहात जपल्या जातात. अशा नोंदींमुळे समुदायाच्या सामाजिक आणि नागरी जीवनाचे चित्र उभे राहते. रहिवाशांनी कसे संघटित केले, त्यांना कोणत्या समस्या महत्त्वाच्या वाटल्या, आणि त्यांनी स्थानिक प्रशासन, सांस्कृतिक उपक्रम, व सामाजिक सेवांमध्ये कसा सहभाग घेतला हे यातून समजते.

**७) राजकीय आणि कायदेशीर कागदपत्रे:** स्थानिक राजकारणी, कार्यकर्ते किंवा समूह नेत्यांच्या खाजगी कागदपत्रांमध्ये पत्रव्यवहार, भाषणे, प्रचार साहित्य आणि कायदेशीर कागदपत्रे असतात. या नोंदींमुळे स्थानिक धोरणांचा विकास, निवडणूक प्रचार, आणि तळागाळातील हालचाली समजतात. कायदेशीर कागदपत्रे, जसे इच्छापत्रे, कृत्ये, करार, आणि न्यायालयीन नोंदी, मालमत्तेची मालकी आणि वारसा विवाद याबद्दल माहिती देतात. हे दस्तऐवज स्थानिक पातळीवर कसे वापरले जातात आणि रहिवासी राजकीय व कायदेशीर बाबींमध्ये कसे गुंतले आहेत, हे देखील स्पष्ट करतात.

**८) धार्मिक आणि शैक्षणिक नोंदी:** खाजगी संग्रहांमध्ये स्थानिक मंदिर, मशीद, चर्च, शाळा आणि इतर धार्मिक व शैक्षणिक संस्थांच्या नोंदी असू शकतात. या नोंदींमुळे समाजाच्या धार्मिक जीवनात आणि सामाजिक-सांस्कृतिक घटनांमध्ये धार्मिक संस्थांची भूमिका समजते. विवाह नोंदीही महत्त्वाची असतात. शैक्षणिक नोंदी, जसे शाळेची नोंदणी, वार्षिक पुस्तके, आणि शिक्षकांच्या नोंदी, स्थानिक शाळांचा इतिहास दर्शवतात. या नोंदी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अनुभव देखील दाखवतात. या माहितीमुळे स्थानिक शिक्षण प्रणाली, अभ्यासक्रमातील बदल, आणि शिक्षणावर सामाजिक-सांस्कृतिक प्रभाव समजण्यास मदत होते.

**खाजगी कागदपत्रे आणि संग्रह वापरातील आव्हाने:**

**१) उपलब्धता:** खाजगी कागदपत्रे आणि संग्रह अनेकदा कौटुंबिक संग्रहणांमध्ये, स्थानिक ऐतिहासिक संस्थांमध्ये किंवा खाजगी भांडारांमध्ये ठेवले जातात, ज्यामुळे ते संशोधकांसाठी सहज उपलब्ध नसतात. सार्वजनिक नोंदी जरी सरकारी अभिलेखागार किंवा ग्रंथालयांमध्ये असल्या, तरी खाजगी कागदपत्रे व्यक्ती किंवा कुटुंबांच्या ताब्यात असतात. अशा वेळी, कुटुंबे ते सार्वजनिक करण्यास नाखूष असतात. कधी कधी ही कागदपत्रे अर्काइव्ह किंवा संग्रहालयांना दान केली जातात, परंतु वापरावर निर्बंध असू शकतात, कारण गोपनीयतेचे संरक्षण किंवा सामग्रीच्या स्थितीची काळजी घेतली जाते. त्यामुळे इतिहासकारांना या साधनांचा शोध घेणे आणि वापरणे कठीण होते.

**२) संरक्षण आणि स्थिती:** खाजगी कागदपत्रे बऱ्याचदा चुकीच्या परिस्थितीत ठेवली जातात. विशेषतः पोटमाळा, तळघर किंवा इतर अशा ठिकाणी जिथे योग्य अभिलेखीय सुविधा नसतात. यामुळे प्रकाश, उष्णता, आर्द्रता आणि कीटकांचा परिणाम होऊन कागद, छायाचित्रे आणि इतर सामग्रीचे नुकसान होते. जुन्या कागदपत्रांची नाजूक स्थिती असल्यामुळे ती कधी कधी अपूर्ण किंवा खराब झालेली असतात, ज्यामुळे इतिहासकारांसाठी त्यांचा अभ्यास करणे अवघड होते.

**३) पूर्वाग्रह:** खाजगी कागदपत्रे त्यांच्या निर्मात्यांचे वैयक्तिक दृष्टिकोन आणि अनुभव दाखवतात, त्यामुळे ती व्यक्तिनिष्ठ असू शकतात. या कागदपत्रांमध्ये व्यक्तींचे वैयक्तिक विचार आणि भावना असतात, त्यामुळे त्यामध्ये पूर्वग्रह असण्याची शक्यता असते. इतिहासकारांना ही कागदपत्रे तपासताना वस्तुनिष्ठतेसह आणि काळजीपूर्वक विचार करावा लागतो.

**४) सत्यता आणि पडताळणी:** खाजगी कागदपत्रांची सत्यता पडताळणे कधी कधी कठीण असते. यामध्ये खोटेपणा, चुकीची माहिती किंवा बदल होण्याची शक्यता असते. इतिहासकारांना या कागदपत्रांच्या सत्यतेचे मूल्यांकन करण्यासाठी पॅलेग्राफी, पेपर विश्लेषण आणि इतर साधनांचा वापर करावा लागतो. यामुळे कागदपत्रांची उत्पत्ती आणि त्याच्या ताब्यातील इतिहास समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

**५) स्थानिक इतिहासासाठी खाजगी कागदपत्रांचे योगदान:** खाजगी कागदपत्रे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामुळे इतिहासकारांना अधिकृत नोंदींमध्ये मिळणार नाहीत असे अनेक तपशील आणि वैयक्तिक अनुभव मिळतात. अशा दस्तऐवजांमुळे स्थानिक जीवनाची गती आणि जटिलता समजते, आणि त्यातून स्थानिक इतिहासाला नवीन दृष्टीकोन मिळतो.

**६) मानवीकरणाचा इतिहास:** खाजगी कागदपत्रे व्यक्तींच्या वैयक्तिक कथा आणि अनुभवांद्वारे इतिहास जिवंत करतात. यातून व्यक्तींच्या भावना, प्रेरणा आणि आकांक्षा समोर येतात, ज्यामुळे इतिहास अधिक जवळचा आणि समजण्यास सोपा होतो. उदा., गरिबीच्या काळातील पत्रे सामान्य लोकांच्या अडचणी आणि लवचिकतेचे चित्र उभे करतात.

**७) दुर्लक्षित इतिहास उघड करणे:** खाजगी कागदपत्रांमुळे अधिकृत नोंदींमध्ये स्थान न मिळालेल्या व्यक्तींचा अनुभव उघड होतो. विशेषत: महिला, अल्पसंख्याक, स्थलांतरित आणि कामगार वर्गाच्या जीवनाचे दस्तऐवज यातून उपलब्ध होतात, ज्यामुळे इतिहास अधिक व्यापक आणि समृद्ध बनतो.

**८) विस्तृत ऐतिहासिक घटनांचे संदर्भ:** खाजगी कागदपत्रे व्यापक ऐतिहासिक घटनांवर स्थानिक दृष्टिकोन देतात. उदा., दुसऱ्या महायुद्धाचा छोट्या शहरावर कसा परिणाम झाला, हे सैनिकांच्या पत्रांमधून स्पष्ट होते. यामुळे इतिहासाचे अधिक सूक्ष्म आणि व्यापक चित्र समोर येते.

**९) आंतरविद्याशाखीय संशोधनास सहाय्यक:** खाजगी कागदपत्रांची विविधता आणि समृद्धता त्यांना आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी महत्त्वाचे साधन बनवते. उदाहरणार्थ, ग्रामीण समुहांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचे अध्ययन करण्यासाठी शेतीच्या नोंदींचा उपयोग होतो. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी

खाजगी कागदपत्रे महत्त्वाची ठरतात. ती इतिहासाला मानवतेचा दृष्टिकोन देतात, लपलेले पैलू उघड करतात आणि समृद्ध स्मृती जपण्यास मदत करतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १ :**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१) आत्मचरित्र एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे ............दृश्य प्रदान करतात.

अ) ऐतिहासिक ब) सांस्कृतिक ब) व्यक्तिनिष्ठ क) पूर्वलक्षी

२) ........................इतिहासकारांसाठी वैयक्तिक पत्रे आणि रोजनिशी ही सर्वात मौल्यवान संसाधने आहेत.

अ) सार्वजनिक ब) ऐतिहासिक क) खाजगी कागदपत्रे ड) स्थानिक

३) ............ इतिहास सहसा लहान समुदाय, शहरे किंवा प्रदेशांवर केंद्रित असतो.

अ) जागतिक ब) राष्ट्रीय क) स्थानिक ड) प्रादेशिक

४) खाजगी कागदपत्रांचे महत्त्व स्थानिक इतिहासाला संदर्भ आणि ........... प्रदान करण्याच्या त्यांच्या क्षमतेमध्ये आहे.

अ) आधार ब) दृष्टीकोन क) उपयुक्तता ड) संदर्भ

ब) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. जगाचा इतिहास | अ) राज्याचा इतिहास |
| २. राष्ट्राचा इतिहास | ब) गावचा इतिहास |
| ३. प्रादेशिक इतिहास | क) भारताचा इतिहास |
| ४. स्थानिक इतिहास | ड) जागतिक महायुद्धाचा इतिहास |

अ) १-अ, २-ब, ३-क, ४-ड ब) १-ब, २-ई, ३-अ, ४-क

क) १-ड, २-क, ३-अ, ४-ब ड) १-ब, २-अ, ३-क, ४-ड

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : जागतिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी खाजगी कागदपत्रे आणि संग्रह हे एक अपरिहार्य स्त्रोत आहेत.

विधान २ : खाजगी कागदपत्रांची सत्यता पडताळणे अतिशय सोपे असते.

अ) पहिले विधान बरोबर, दूसरे विधान चुकीचे

ब) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे

क) दोन्ही विधाने बरोबर

ड) दोन्ही विधाने चुकीची

### ३.२.२ वर्तमानपत्रे

स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वर्तमानपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. ती घटनांची आणि सामाजिक बदलांचे दैनंदिन दस्तऐवज असतात. अधिकृत नोंदींमध्ये सरकारी कामकाजावर भर दिला जातो, परंतु वर्तमानपत्रे समाजातील विविध विचार, चिंता आणि समस्या व्यक्त करतात. म्हणून, इतिहासकारांना भूतकाळ समजून घेण्यासाठी ही एक महत्त्वाची साधने ठरतात.

**स्थानिक इतिहासातील वर्तमानपत्रांचे महत्त्व:**

वर्तमानपत्रे समाजाच्या दैनंदिन जीवनाचे प्रतिबिंब दर्शवतात. ती समाजाच्या विविध चिंतेचे आणि घटनांचे साक्ष देतात. मोठ्या घटनांबरोबरच, ती लहान घटनांचीही नोंद करतात, ज्यामुळे स्थानिक परिसरातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वातावरण उभे होते. वर्तमानपत्रे समाजातील विचारांवर प्रभाव टाकतात आणि स्थानिक ओळख निर्माण करण्यास मदत करतात. त्यामुळे इतिहासकारांच्या अभ्यासात यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

**वृत्तपत्रांमध्ये आढळणाऱ्या मजकुराचे प्रकार**

**१) लेख:** लेख कोणत्याही वृत्तपत्राचा मुख्य भाग असतात. हे लेख समाजातील विविध घटनांवर तथ्यात्मक माहिती देतात. या लेखांमध्ये स्थानिक सरकारी निर्णय, गुन्हे, व्यावसायिक क्रियाकलाप, शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांचा समावेश असतो. इतिहासकारांसाठी, हे लेख महत्त्वपूर्ण असतात कारण ते घटनांची कालक्रमानुसार नोंद ठेवतात. उदाहरणार्थ, स्थानिक निवडणुकांच्या बातम्या त्या काळातील प्रमुख मुद्दे आणि राजकीय गतिशीलता दर्शवते.

**२) संपादकीय:** वृत्तपत्राचे संपादक आणि योगदानकर्त्यांचे विचार दर्शवतात. हे स्तंभ समाजातील वादविवाद आणि सार्वजनिक भावना याबाबत अंतर्दृष्टी देतात. संपादकीय स्थानिक समस्यांवर लक्ष केंद्रित करतात, तर स्तंभांमध्ये विविध सदस्यांचे योगदान असते. हे विभाग समाजाचे वैचारिक दृश्य समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

**३) संपादकांना पत्रे:** संपादकांना पत्रे हे वर्तमानपत्रांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हे पत्रे सामान्य लोकांच्या समस्या आणि चिंतेवर प्रकाश टाकतात. यामुळे इतिहासकारांना सार्वजनिक भावना मोजता येतात आणि समाजातील विविधता समजते. या पत्रांमुळे विविध दृष्टीकोनांचा समावेश होतो, जो समाजातील मतांची विविधता दर्शवतो.

**४) जाहिराती:** जाहिराती सामान्यत: ऐतिहासिक साधन म्हणून दुर्लक्षित केल्या जातात. पण त्यातून समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनाबद्दल महत्त्वाची माहिती मिळते. जाहिराती स्थानिक व्यवसाय, ग्राहकांच्या सवयी आणि आर्थिक प्रवाह दर्शवतात. वर्गीकृत जाहिराती नोकऱ्या, गृहनिर्माण आणि वैयक्तिक सेवांबद्दल माहिती देतात. यामुळे स्थानिक नोकरीच्या बाजारपेठेतील बदल आणि घरांच्या उपलब्धतेतील माहिती मिळते.

**५) मृत्युपत्रे आणि जन्म नोंदी:** मृत्युपत्रे आणि जन्मनोंदी समाजातील व्यक्तींच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांची नोंद करतात. मृत्युपत्रांमध्ये व्यक्तीच्या कौटुंबिक कनेक्शन, करिअर आणि समाजातील सहभागाची माहिती असते. जन्माच्या घोषणा कुटुंबांच्या वाढीचे दस्तऐवजीकरण करतात. एकत्रितपणे, हे विभाग समुदायाच्या जीवनचक्राचे चित्रण करतात.

**६) सामाजिक आणि सांस्कृतिक बातम्या:** वृत्तपत्रे सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बातम्या करतात. विवाह, सामुदायिक मेळावे, धार्मिक समारंभ आणि स्थानिक उत्सव यांचा समावेश असतो. यामुळे समाजातील परंपरा आणि सांस्कृतिक संवाद समजून घेता येतो. सांस्कृतिक बातम्या पुस्तकं, संगीत, चित्रपट इत्यादींची पुनरावलोकनेही समाविष्ट करतात.

**७) खेळ आणि मनोरंजन:** स्थानिक खेळ आणि मनोरंजनाच्या बातम्या वृत्तपत्रांचा एक महत्त्वाचा भाग असतो. क्रीडा लेख स्थानिक संघ आणि खेळाडूंच्या कामगिरीवर प्रकाश टाकतात. यामुळे समाजातील खेळाच्या महत्त्वाचे चित्रण होते. मासेमारी, शिकार किंवा बागकाम यासारख्या मनोरंजक घडामोडीच्या बातम्या  बाह्य परंपरांची माहिती देते.

**८) कायदेशीर सूचना आणि सार्वजनिक नोंदी:** वृत्तपत्रांमध्ये कायदेशीर सूचना आणि सार्वजनिक नोटिसांचा समावेश असतो. या विभागांमध्ये मालमत्ता विक्रीच्या सूचना, न्यायालयीन कारवाई आणि सरकारी बैठका यांचा समावेश असतो. हे समाजातील कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींवर महत्त्वाची माहिती देतात. इतिहासकारांसाठी, हे दस्तऐवज जमीन व्यवहार, वारसा विवाद आणि अन्य कायदेशीर बाबींचा मागोवा घेण्यासाठी उपयुक्त असतात. या सर्व विभागांमुळे वर्तमानपत्रे स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एक महत्त्वाचा साधन बनतात. यामुळे समाजातील विविध घडामोडी, भावना, सांस्कृतिक पैलू आणि कायदेशीर माहिती मिळवता येते.

**वर्तमानपत्रे स्थानिक इतिहास लेखनासाठी कशी मदत करतात**

वर्तमानपत्रे स्थानिक इतिहास लेखनासाठी अनेक दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरतात. या माध्यमाद्वारे स्थानिक समाजाची गोष्ट, त्यांचे संघर्ष, अडचणी, आणि उपलब्धी सर्वांना समजून घेता येतात. वृत्तपत्रे स्थानिक इतिहास लेखनाला पुढीलप्रमाणे मदत करतात.

**१) स्थानिक भावना निर्माण करणे:**

वृत्तपत्रे स्थानिक समस्यांवर आणि घटनांवर लक्ष केंद्रित करून स्थानिक भावना निर्माण करण्यात मदत करतात. स्थानिक भाषेत आणि परिचित संदर्भांमध्ये घडामोडींचा उल्लेख करून, वाचनाऱ्यांना आपल्या

समुहाशी जोडणारे एक बंधन निर्माण केले जाते. या लेखांमुळे स्थानिक लोकांच्या चिंता, जसे की पर्यावरणीय बदल, शैक्षणिक धोरणे, किंवा सामाजिक वाद, यांचा खुलासा केला जातो. त्यामुळे, स्थानिक समुहाची एक वेगळी ओळख बनते.

**२) सामाजिक नियम आणि मूल्ये मजबूत करणे**

वृत्तपत्रे स्थानिक सामाजिक रूढी आणि मूल्यांना बळकटी देण्याचे कार्य करतात. संपादकीय लेखांमध्ये, विशिष्ट वर्तन आणि नैतिकतेवर जोर दिला जातो, ज्यामुळे समुहाच्या सांस्कृतिक मूल्यांचा प्रचार केला जातो. उदाहरणार्थ, नागरी सहभाग, स्थानिक परंपरा, आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व दर्शवून वृत्तपत्रे सकारात्मक विचारांना प्रोत्साहन देतात. यामुळे, स्थानिक इतिहास लेखनात सामाजिक मूल्यांची समज वाढते.

**३) सामाजिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण**

वृत्तपत्रे स्थानिक घटनांच्या बातम्या तयार करतात, ज्यामुळे समुदायाचा इतिहास जतन होतो. स्थानिक उपलब्धी, महोत्सव, आणि विशेष प्रसंग इतिहासाचे एक महत्त्वाचे दस्तऐवज बनतात. यामध्ये, काळानुसार बदल, विकास, आणि अडचणी यांचा समावेश असतो. उदाहरणार्थ, शहराच्या शताब्दी उत्सवाचे वृत्तपत्रातील लेख त्या शहराच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकतात आणि त्याचबरोबर बदलत्या काळातील आव्हानांचा उल्लेख करतात.

**४) स्थानिक प्रश्नाची महत्त्वपूर्णता**

वृत्तपत्रांद्वारे स्थानिक लोकांचे विचार, अनुभव आणि मते मांडली जातात. संपादकांना पत्रे, बातम्या लेख, आणि संपादकीय या माध्यमातून विविध आवाजांना स्थान मिळते. या विविधता समुहाच्या इतिहासात व्यक्त केलेल्या अनुभवांचा समावेश होतो, ज्यामुळे इतिहास लेखन अधिक समृद्ध आणि व्यापक बनते.

**५) सामाजिक चळवळींचा इतिहास**

वृत्तपत्रे सामाजिक चळवळींच्या ऐतिहासिक घटकांना देखील उजागर करतात. स्थानिक चळवळी, आंदोलने, आणि त्यांच्या प्रभावांचा दस्तऐवज ठरतो. यामुळे, स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना या चळवळींचा संदर्भ घेऊन वाचनाऱ्यांना या प्रक्रियांची माहिती मिळते. वृत्तपत्रे स्थानिक इतिहास लेखनाला महत्त्वपूर्ण प्रमाणात योगदान देतात. त्यांच्या माध्यमातून स्थानिक समुदायाची भावना, सामाजिक मूल्ये, आणि ऐतिहासिक घटनांची माहिती मिळवली जाते, ज्यामुळे त्या समुदायाचा समृद्ध इतिहास तयार होतो.

**वृत्तपत्रांचा ऐतिहासिक साधन म्हणून वापर करण्यातील आव्हाने**

वृत्तपत्रे ऐतिहासिक संशोधनाचे महत्त्वाचे साधन असली तरी, त्यांचा वापर करताना काही आव्हाने येतात. या आव्हानांमुळे संशोधकांना त्यांच्या कामात अडचणी येऊ शकतात. खालील मुद्द्यांमध्ये या आव्हानांचा विस्तार करण्यात आलेला आहे:

**१) पूर्वाग्रह:** वृत्तपत्रे त्यांच्या संपादक, मालक आणि योगदानकर्त्यांच्या दृष्टीकोनांमुळे प्रभावित होतात. त्यांच्या बातम्यांची निवड आणि मुद्द्यांची मांडणी ही संपादकीय भूमिका दर्शवते. उदा., एक स्थानिक व्यवसायाच्या मालकीचे वृत्तपत्र कामगार हक्क किंवा पर्यावरण संरक्षणासंबंधीच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणे शक्य आहे. त्यामुळे इतिहासकारांनी वृत्तपत्रातील माहितीच्या संदर्भात सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, आणि त्या साधनाकडे गंभीर नजरेने पाहिले पाहिजे.

**२) प्रतिनिधीत्व (विशिष्ठ जात धर्म अथवा वर्गाचे):** वृत्तपत्रे समाजातील सर्व आवाजांचे प्रतिनिधित्व करतीलच असे नाही. त्यात सामान्यतः प्रबळ सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय गटांची मते अधिक प्रमाणात असतात, ज्यामुळे इतर गटांचे विचार वगळले जातात. १९ व्या आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या वृत्तपत्रांमध्ये महिला, अल्पसंख्याक, आणि कामगार वर्गाचे अनुभव वगळण्यात आले आहेत. त्यामुळे, इतिहासकारांनी वृत्तपत्रे एकमात्र स्रोत म्हणून वापरण्याबाबत सावध राहावे आणि इतर साधनांचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा.

**३) वर्तमानपत्र कागदपत्राची हाताळनी:** वर्तमानपत्रांची भौतिक स्थिती एक महत्त्वाची आव्हान ठरते. जुन्या वृत्तपत्रांचा कागद अनेकदा ठिसूळ आणि पिवळा होतो, ज्यामुळे त्यांचे संरक्षण कठीण होते. काही वृत्तपत्रे खराब स्टोरेज परिस्थितीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे हरवले जातात. सर्व वृत्तपत्रे डिजीटल किंवा मायक्रोफिल्म केलेली नसतात, ज्यामुळे त्यांचा वापर करणे कठीण होते. याशिवाय, मोठ्या प्रमाणात माहिती शोधण्याची प्रक्रिया वेळखाऊ असू शकते. तथापि, डिजिटायझेशनच्या प्रगतीमुळे यामध्ये काही सुधारणा झाल्या आहेत.

**४) व्याख्या आणि संदर्भ:** वृत्तपत्रातील सामग्रीचा अर्थ लावताना संदर्भ महत्वाचा असतो. इतिहासकारांनी ज्या सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक परिस्थितीत वृत्तपत्र तयार झाले, त्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, कामगार संपाच्या वृत्तपत्रातील कव्हरेज कामगार आणि नियोक्ते (मालक) यांच्यातील तणाव दर्शवते. वृत्तपत्रातील सामग्रीचे महत्त्व समजून घेण्यासाठी संदर्भ आणि सांस्कृतिक परिस्थितींचा अभ्यास महत्त्वाचा आहे. वृत्तपत्रांचा ऐतिहासिक साधन म्हणून वापर करताना या आव्हानांचा विचार करणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासकारांना एक सुसंगत आणि विश्वासार्ह ऐतिहासिक दस्तऐवज तयार करण्यात मदत मिळेल.

**स्थानिक इतिहासात वर्तमानपत्रांचे योगदान**

वृत्तपत्रे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण योगदान देतात, जरी त्यांच्यासमोर काही आव्हाने असली तरीही. त्यांचे योगदान कसे महत्त्वाचे आहे, याबद्दल खालील मुद्द्यांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

**१) दैनंदिन जीवनाचे दस्तऐवजीकरण:** वृत्तपत्रे स्थानिक समुदायातील दैनंदिन जीवनाचे समृद्ध नोंदी देतात. यामध्ये नियमित घटना, सामाजिक संवाद, आणि स्थानिक संस्कृती परिभाषित करणाऱ्या पद्धतींचा

समावेश असतो. संशोधकासाठी, हे दस्तऐवजीकरण अमूल्य आहे, कारण यामुळे त्यांना रहिवाशांचे दैनंदिन अनुभव, मूल्ये, आणि त्यांना महत्त्वाचे मुद्दे समजून घेता येतात.

**२) सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचा मागोवा घेणे:** वर्तमानपत्रे सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा मागोवा घेण्यासाठी महत्त्वाचे साधन आहेत. त्यांच्या सामग्रीच्या उत्क्रांतीचा अभ्यास करून, संशोधक सार्वजनिक वृत्ती, सामाजिक नियम, आणि सांस्कृतिक पद्धतींमध्ये होणारे बदल पडताळू शकतात. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या समस्यांचा, वंशीय संबंधांचा, किंवा पर्यावरणीय समस्यांचा बातम्या बदलल्याने सामाजिक परिवर्तने कशा प्रकारे घडली आहेत, हे स्पष्ट होते.

**३) राजकीय आणि आर्थिक इतिहासाचे विश्लेषण:** वृत्तपत्रे स्थानिक राजकारण आणि आर्थिक घडामोडींची तपशीलवार माहिती देतात. यामुळे इतिहासकारांना सत्तेच्या बदलाची, धोरणात्मक वादविवाद, आणि आर्थिक बदल याबद्दल माहिती मिळते. स्थानिक निवडणुका, उद्योगधंदे, किंवा कामगार विवादांचे अहवाल यामुळे समुदायाच्या विकासावर प्रभाव टाकणाऱ्या शक्तींची मौल्यवान माहिती मिळते.

**४) तुलनात्मक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनास सहाय्यक:** वर्तमानपत्रांमध्ये आढळणारी सामग्री संशोधक तुलनात्मक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी महत्त्वाचे साधन आहे. विविध समाजाची तुलना, प्रादेशिक भिन्नता करणे, आणि स्थानिक व जागतिक घटनांमधील बिंदू तपासणे यासाठी वृत्तपत्रांचा वापर केला जातो. उदा., अनेक शहरांतील वृत्तपत्रांच्या अध्ययनामुळे राष्ट्रीय धोरणे किंवा जागतिक कार्यक्रमांच्या प्रतिसादात प्रादेशिक फरक प्रकट होऊ शकतात.

**५) सामुहिक जीवनाचा आरसा:** स्थानिक इतिहासाच्या अभ्यासास वृत्तपत्रे समाजाचा आरसा आणि आकार असतात. त्या सामुदायिक जीवनाचा तपशीलवार नोंदी तयार करतात. वृत्तपत्रे घटना, मते आणि स्थानिक ओळख व अनुभवांना आकार देणाऱ्या सामाजिक बदलाची माहिती देतात. वृत्तपत्रे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात अपरिहार्य साधन आहेत. त्यांचा उपयोग करून इतिहासकार भूतकाळाची पुनर्रचना, सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा मागोवा, आणि स्थानिक समाजाच्या गुंतागुंतीचा अभ्यास करू शकतात. हे एक महत्त्वाचे साधन आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर विविध संस्कृतींचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण इतिहास समजून घेता येतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१) वृत्तपत्रांमध्ये .......... विभाग स्थानिक व्यवसाय आणि ग्राहकांच्या सवयी दर्शवतो?

अ) संपादकांना पत्रे ब) जाहिराती क) लेख ड) संपादकीय

२) काळानुरूप सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा मागोवा घेण्यासाठी ............ हे महत्त्वाचे साधन आहेत.

अ) वृत्तमानपत्रे ब) जाहिराती क) संगीत ड) नाटक

३) स्थानिक इतिहास लेखनात .......... चा वापर महत्वाचा आहे.

अ) वृत्तमानपत्र ब) गीत क) चित्रपट ड) नाटक

४) वृत्तपत्रातील ............. विभागामुळे समुदायाच्या जीवनचक्राचे चित्रण होते?

अ) जाहिराती ब) संपादकीय क) मृत्युपत्रे आणि जन्म नोंदी ड) कायदेशीर सूचना.

आ) जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| १. वर्तमानपत्रे | अ) घटना आणि तथ्यात्मक माहिती देतात |
| २. वृत्तपत्रांचे आव्हान | ब) स्थानिक ओळख निर्माण करतात. |
| ३. लेख | क) समाजातील वादविवाद दर्शवितात |
| ४. संपादकीय | ड) पुर्वाग्रह |

अ) १-अ, २-ब, ३-क, ४-ड ब) १-ब, २-ड, ३-अ, ४-क

क) १-ड, २-ब, ३-क, ४-अ ड) १-ब, २-अ, ३-क, ४-ड

इ) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी वर्तमानपत्रे हा एक अपरिहार्य स्रोत आहे

विधान २ : काळानुरूप सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा मागोवा घेण्यासाठी वर्तमानपत्रे हे महत्त्वाचे स्रोत आहेत

अ) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

ब) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

क) दोन्ही विधाने बरोबर.

ड) दोन्ही विधाने चुकीची

## ३.२.३ तोंडी मुलाखत:

**स्थानिक इतिहासाचे साधन म्हणून तोंडी मुलाखत:**

तोंडी मुलाखत म्हणजे स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एक अत्यंत प्रभावी साधन आहे. अधिकृत दस्तऐवज किंवा लिखित नोंदींपेक्षा वेगळे, तोंडी मुलाखत वैयक्तिक अनुभव, आठवणी, आणि कथांचा संग्रह करते, ज्या गोष्टी अनेकदा लिखित स्वरूपात आढळत नाहीत. या माध्यमातून इतिहासकारांना

व्यक्ती आणि समुहाच्या अनुभवांमध्ये थेट प्रवेश करता येतो. त्यामुळे स्थानिक घटना, परंपरा आणि दृष्टीकोनांवर अधिक सखोल आणि वास्तवदर्शी माहिती मिळवता येते.

**१) स्थानिक इतिहास लेखनातील मुलाखतीचे महत्त्व:** मुलाखतीचे स्थानिक इतिहासात विशेष महत्त्व आहे, विशेषतः अशा समुहासाठी ज्या अधिकृत नोंदी ठेवण्यात मागे राहिल्या, ज्या ठिकाणी साक्षरतेचा अभाव होता किंवा जिथे लिखित दस्तऐवज सामान्यतः श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांच्या अनुभवांवरच केंद्रित होते. अशा परिस्थितीत, तोंडी मुलाखती लोकांच्या अनुभवांच्या मूळ आणि अनोख्या कहाण्या समजून घेण्यास मदत करतात.

**२) मौखिक परंपरेतील स्थान:** अनेक संस्कृतींमध्ये मौखिक परंपरा इतिहास एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोचविण्याचे प्रमुख साधन राहिली आहे. लोक त्यांच्या अनुभवांच्या गोष्टी सांगून ज्ञान, परंपरा, आणि त्यांच्या सामाजिक ओळखीची माहिती देतात. अशा गोष्टीमधून इतिहासकारांना त्या समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांचे महत्व कळते. स्थानिक मौखिक इतिहासामध्ये जमिनीचा वापर, परंपरागत जीवनशैली आणि सामाजिक संघटनांचे तपशील आढळतात, जे अनेकदा अधिकृत लिखित नोंदींमध्ये अनुपस्थित असतात.

**३) दुर्लक्षित घटनांचे दस्तऐवजीकरण:** मुलाखत ही उपेक्षित किंवा दुर्लक्षित समूहांचा आवाज जपण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. अनेक वेळा महिला, अल्पसंख्याक किंवा श्रमिक वर्गाच्या लोकांकडे लिखित इतिहासात दुर्लक्ष केले जाते, परंतु मौखिक इतिहासाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनातील अनुभव आणि संघर्ष इतिहासाच्या पटलावर आणले जातात. उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धातील कारखान्यात काम करणाऱ्या महिलांच्या मुलाखती त्यांच्या योगदानाचा आणि सामाजिक बदलांचा महत्वाचा इतिहास उलगडतात.

**४) घटनेची व्याख्या करणे:** मुलाखती फक्त घटनांची नोंद ठेवत नाही, तर त्या घटनांचे संदर्भ आणि व्याख्या देखील पुरवतात. लोक त्यांच्या अनुभवांबद्दल सांगताना त्यांचे महत्त्व स्पष्ट करतात, त्यांवर विचार करतात, आणि त्यांना व्यापक स्वरूपात मांडतात. या प्रक्रियेमुळे इतिहासकारांना केवळ काय घडले याचा अंदाज येत नाही, तर त्या लोकांनी त्याचा कसा अर्थ लावला याचे देखील स्पष्टीकरण मिळते. उदा., अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीतील सहभागींनी त्यांच्या भूमिकांचा कसा अर्थ लावला आणि चळवळीच्या यश-अपयशांविषयी त्यांच्या भावना कशा होत्या हे मौखिक मुलाखतीतून कळते.

**मुलाखतीच्या मर्यादा**

मुलाखत ही स्थानिक इतिहास संशोधनासाठी उपयुक्त साधन असली तरी तिच्या काही मर्यादा देखील आहेत. या मर्यादा विचारात घेऊन इतिहासकारांनी त्यांच्या अभ्यासात सावधपणे पावले उचलणे आवश्यक आहे.

**१) व्यक्तिनिष्ठता :** मुलाखत ही मुळात व्यक्तिनिष्ठ असते. मुलाखत देणारी व्यक्ती तिचे अनुभव सांगताना आपला वैयक्तिक दृष्टिकोन मांडते. अशा वेळी तिच्या आठवणी निवडक असू शकतात, काही वेळा विकृतही होऊ शकतात किंवा नंतरच्या घटनांमुळे त्या प्रभावित होऊ शकतात. परिणामी, मुलाखतीतून मिळालेल्या माहितीत अचूकतेची खात्री करणे कठीण ठरते.

**२) मुलाखत प्रक्रियेचा प्रभाव:** मुलाखतीची प्रक्रिया स्वतःच मुलाखतीच्या उत्तरांवर परिणाम करू शकते. मुलाखतकाराने विचारलेले प्रश्न, त्याचे संवादाचे कौशल्य, तसेच मुलाखत घेणारा आणि देणारा यांच्यातील संबंध हे सर्व परिणामकारक ठरतात. तसेच, मुलाखत ज्या परिस्थितीत घेतली जाते त्यावरही उत्तरांचा परिणाम होऊ शकतो. उदा., मुलाखत देणारी व्यक्ती विशिष्ट प्रश्नांना योग्यरित्या उत्तर देत नाही किंवा ताणतणावाखाली असते.

**३) विखंडन आणि अपूर्ण माहितीची शक्यता:** मुलाखत बहुतेक वेळा खंडित किंवा अपूर्ण असते. मुलाखत देणारी व्यक्ती तिच्या स्मृती सामायिक करण्याच्या तिच्या इच्छेनुसारच माहिती पुरवते. त्यामुळे काही महत्त्वाचे तपशील गहाळ होऊ शकतात किंवा विसरले जाऊ शकतात. कधीकधी, कालांतराने आठवणी बदलू शकतात, ज्यामुळे माहितीचे पूर्णपणे अचूक चित्र तयार करणे कठीण होऊन जाते. यामुळे, इतिहासकारांनी अधिक संपूर्ण आणि विश्वसनीय चित्र उभे करण्यासाठी अनेक मुलाखतींचे एकत्रीकरण करणे आवश्यक ठरते.

**४) नैतिक विचार:** मुलाखत नैतिक दृष्टिकोनातून देखील विचार करण्यास भाग पाडते. मुलाखत देणारे कधीकधी संवेदनशील किंवा खाजगी माहिती सामायिक करू शकतात, ज्यासाठी विशेष काळजी घेतली पाहिजे. मुलाखतकाराने त्या व्यक्तीची संमती घेऊन, तिच्या गोपनीयतेचा आदर ठेवत मुलाखतीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. तसेच, या माहितीचा समुदायावर काय परिणाम होईल याचीही पूर्ण जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे, मौखिक मुलाखतीचे फायदे आहेत तसेच तिच्या मर्यादाही आहेत. त्या समजून घेतल्यास इतिहासकारांना अधिक विश्वासार्ह आणि सखोल संशोधन करणे शक्य होते.

**स्थानिक इतिहास लेखनात मौखिक मुलाखतींचे महत्व:** मुलाखतींमुळे स्थानिक इतिहास लेखन समृद्ध होते. मुलाखती वैयक्तिक अनुभव, आठवणी, आणि दृष्टिकोन मांडतात, जे अनेकदा अधिकृत दस्तऐवज किंवा लिखित नोंदींमध्ये नसतात. मुलाखतींचे स्थानिक इतिहास लेखनासाठी काही प्रमुख योगदान पुढीलप्रमाणे:

**१) सामाजिक आणि सांस्कृतिक प्रथांवर प्रकाश टाकणे:** मुलाखती समाजाच्या दैनंदिन जीवनातील, परंपरा आणि रूढी यासंबंधी मौल्यवान माहिती देतात. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील वयोवृद्ध लोकांच्या मुलाखती पारंपरिक शेती पद्धती, स्थानिक सण किंवा पारंपारिक हस्तकला यांची माहिती समोर आणतात. हे घटक अनेक पिढ्यांपासून समाजाची ओळख घडवतात, पण ते लिखित नोंदींमध्ये पुरेसे मांडलेले नसतात.

**२) सामूहिक स्मृतींचे जतन व संरक्षण:** मुलाखतींमुळे आठवणी जतन होतात, ज्या काळानुसार हरवू शकतात. वैयक्तिक गोष्टी नोंद करून इतिहासकार हे सुनिश्चित करतात की त्या व्यक्तींचे अनुभव इतिहासाचा भाग म्हणून जतन होतील. हे विशेषतः वेगवान बदलांचा सामना करणाऱ्या समाजासाठी महत्त्वाचे आहे. मौखिक इतिहास भूतकाळ आणि वर्तमान यांच्यातील पूल तयार करतो आणि ओळख कायम ठेवतो.

**३) दुर्लक्षित इतिहास व्यक्त होतो:** अधिकृत नोंदी अनेकदा समाजातील उच्चवर्गीय किंवा प्रबळ गटांवर लक्ष केंद्रित करतात. त्यामुळे महिलांचे, अल्पसंख्याकांचे किंवा कामगार वर्गाचे अनुभव दुर्लक्षित होतात. मौखिक मुलाखतींमुळे या गटांना आपले अनुभव मांडण्यासाठी एक व्यासपीठ मिळते. यामुळे स्थानिक इतिहास अधिक सर्वसमावेशक आणि सखोल बनतो.

**४) लिखित साधनांची पूर्तता:** मुलाखती लिखित नोंदींपेक्षा वेगळा दृष्टिकोन देतात. त्यामुळे इतिहासकारांना घडलेल्या घटनांचे तथ्य तपासणे आणि अधिक सखोल समज मिळवणे शक्य होते. व्यक्तींच्या आठवणींमुळे ऐतिहासिक घटनांमध्ये भावनिक घटक आणि संदर्भ जोडले जातात, जे अधिकृत नोंदींमध्ये नसतात.

**५) स्थानिक बोली आणि भाषा जतन करणे:** इतिहास स्थानिक बोली, भाषा, आणि बोलण्याच्या पद्धती जतन करण्यासाठी विशेषतः उपयुक्त आहे. हे भाषिक घटक समुहाच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग असतात. मुलाखतींमुळे या भाषांचे जतन होते, ज्यामुळे स्थानिक इतिहासात आणखी एक महत्त्वपूर्ण स्तर जोडला जातो.

**६) ऐतिहासिक घटनांचा अर्थ समजून घेणे:** मुलाखतींमुळे इतिहासकारांना व्यक्तींच्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटनांचे अर्थ समजून घेता येतात. त्यामुळे केवळ काय घडले हेच नव्हे, तर लोकांनी त्या घटनांना कसा अर्थ दिला हेही समजते. उदाहरणार्थ, स्थानिक संघर्षावरील मुलाखती अधिकृत नोंदींपेक्षा वेगळ्या असू शकतात आणि वैयक्तिक भावना, पूर्वग्रह आणि सांस्कृतिक दृष्टिकोन उघड करू शकतात. मौखिक मुलाखती स्थानिक इतिहास लेखनासाठी अमूल्य साधन आहेत. त्या लिखित नोंदींमध्ये राहिलेली पोकळी भरून काढतात, दुर्लक्षित इतिहास समोर आणतात, आणि सांस्कृतिक व सामाजिक प्रथांचे संरक्षण करतात. या मुलाखतींचा समावेश केल्याने स्थानिक इतिहास अधिक सजीव आणि व्यापक बनतो, ज्यामुळे समाजाच्या भूतकाळाच्या विविध अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा सखोल विचार केला जातो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१) ………… हा दुर्लक्षित गट किंवा समुदायांचा अभ्यास करण्यासाठी महत्वाचे साधन आहे.

अ) धर्माचा इतिहास　　ब) जातीचा इतिहास

क) आर्थिक इतिहास　　ड) सांस्कृतिक इतिहास

२) मौखिक मुलाखत ही मूळत ………… असते.

अ) लिखित	ब) तोंडी पारंपरिक मुलाखत

क) चित्रित	ड) स्थापत्य

३) तोंडी मुलाखत अनेकदा ........... आणि अपूर्ण असतात.

अ) विश्वासार्ह ब) अपारदर्शक क) स्पष्ट ड) नियमित

४) अनेक संस्कृतींमध्ये .......... हे इतिहास एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रसारित करण्याचे प्राथमिक माध्यम आहे.

अ) तोंडी परंपरा ब) शिलालेख क) लेखन ड) चित्रकला

ब) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. तोंडी मुलाखत | अ) कौटुंबिक इतिहास |
| २. दुर्लक्षित गट | ब) अपारदर्शक |
| ३. मौखिक मुलाखत | क) जातीचा इतिहास |
| ४. स्थानिक इतिहास | ड) तोंडी पारंपरिक मुलाखत |

अ) १-अ, २-ब, ३-क, ४-ड	ब) १-ब, २-क, ३-ड, ४-अ

क) १-ड, २-क, ३-अ, ४-ब	ड) १-ब, २-अ, ३-क, ४-ड

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : व्यक्ती तीचे अनुभव सांगताना सार्वजनिक दृष्टीकोन प्रतिबिंबित करते

विधान २ : तोंडी मुलाखत गोळा करण्याची प्रक्रिया स्वतःच साक्षीच्या सामग्रीवर प्रभाव टाकू शकते

अ) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

ब) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

क) दोन्ही विधाने बरोबर.

ड) दोन्ही विधाने चुकीची.

## ३.२.४ कलाकृती आणि स्मारके

**स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात कलाकृतीची भूमिका**

कलाकृती (Artifacts) स्थानिक इतिहास समजून घेण्यासाठी खूप महत्त्वपूर्ण असतात. ही प्राचीन वस्तूंची उदाहरणे, ज्या वस्तू पूर्वीच्या समाजांनी तयार केल्या आणि वापरल्या, त्या लोकांच्या जीवनशैलीचे स्पष्ट पुरावे देतात.

**कलाकृती म्हणजे काय?**

कलाकृती (पुरातत्व सामग्री) म्हणजे मानवी हस्तकलेचे प्राचीन वस्त्र, हत्यारे, मातीची भांडी, नाणी, शस्त्रे, आणि इतर दैनंदिन वापराच्या वस्तू. या वस्तू इतिहासकारांना भूतकाळाच्या समाजांचे जीवन, तंत्रज्ञान, आणि संस्कृती समजून घेण्यास मदत करतात.

**कलाकृतीचे महत्व**

**१) दैनंदिन जीवन कळते:** कलाकृतीच्या आधारे भूतकाळातील लोकांच्या दैनंदिन क्रिया समजून घेता येतात. स्वयंपाक, शेती, किंवा कारागिरी करताना वापरलेले साधन त्यांची जीवनशैली दाखवतात. लोक कसे जगले, त्यांची गरजा कशा पूर्ण केल्या हे समजते. उदा. ग्रामीण भागात आढळलेले शेतीचे साधन तेथील शेती व्यवसाय आणि स्थानिक लोकांची उपजीविका कशी होती हे दाखवते.

**२) आर्थिक परिस्थिती लक्षात येते**: मातीची भांडी, नाणी, आणि व्यापारातील वस्तू स्थानिक अर्थव्यवस्थेबद्दल माहिती देतात. कोणत्या वस्तू स्थानिक भागात तयार केल्या गेल्या आणि कोणत्या आयात केल्या याचे पुरावे मिळतात. उदा. नाणी राजे, अर्थव्यवस्था, आणि संपत्तीचे वितरण याविषयी माहिती देतात.

**३) सामाजिक आणि सांस्कृतिक प्रथा कळतात**: कलाकृती समाजाची सामाजिक रचना आणि सांस्कृतिक प्रथा उघड करतात. दागिने, धार्मिक चिन्हे, आणि कलात्मक वस्तू लोकांच्या श्रद्धा आणि समारंभ दाखवतात. उदा. धार्मिक वस्तू लोकांच्या आध्यात्मिक प्रथा आणि स्थानिक ओळख घडवण्यात धर्माचे महत्त्व दर्शवतात.

**४) तांत्रिक प्रगती समजते:** कलाकृतीच्या बनावटीतून स्थानिक तांत्रिक प्रगतीचे पुरावे मिळतात. साधनांचा विकास कसा झाला, नवीन तंत्रज्ञानाचा वापर कसा झाला हे या वस्तूंच्या अभ्यासातून समजू शकते. उदा. धातूच्या हत्यारांचा शोध लावल्यास ते त्या क्षेत्रात धातूचे काम करणारे समाज होते याचे संकेत मिळतात.

**५) राजकीय संरचना लक्षात येते:** कलाकृती राजकीय व्यवस्था आणि स्थानिक सत्तेबद्दलही माहिती देतात. शिलालेख किंवा धार्मिक वस्तू राजकीय नेत्यांची माहिती देतात, आणि समाजात कसे सरकार होते हे उघड होते.

**कलाकृती चा अर्थ लावण्यातील आव्हाने:**

कलाकृती महत्त्वाची असली तरी त्याचा अर्थ लावणे सोपे नाही. नेमके कार्य आणि महत्व शोधण्यासाठी इतर पुरावे आणि संदर्भ तपासावे लागतात.

**तुकडे झालेली वस्तू:** कलाकृती अनेकदा तुटलेल्या अवस्थेत सापडतात, त्यामुळे त्यांचा पूर्ण अर्थ समजणे अवघड होते.

**संदर्भाचा अभाव:** वस्तू त्यांच्या मूळ ठिकाणाबाहेर सापडल्यास, त्यांचा अर्थ समजायला अधिक वेळ लागतो.

**सांस्कृतिक सातत्य:**

कलाकृती परंपरांचा आणि संस्कृतीतील बदलांचा पुरावा देतात. लोक कशा परंपरांना जपतात आणि कोणत्या बदलतात हे या वस्तू दाखवतात. उदा. शतकानुशतके स्थिर राहिलेल्या मातीच्या भांड्यांचे नमुने त्या समाजात परंपरा किती खोलवर रुजल्या आहेत हे दाखवतात. पुरातत्व सामग्री स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अपरिहार्य आहेत. त्या भूतकाळाच्या समाजांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, आणि सांस्कृतिक पैलू उघड करतात. या वस्तूंमुळे इतिहासकारांना समाजाचा विकास समजून घेता येतो.

**स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात स्मारकांचे महत्त्व**

स्मारके ही स्थानिक इतिहास समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन आहेत. ही स्मारके एखाद्या महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, किंवा सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणून उभी केली जातात. ती भूतकाळातील समाजाच्या ओळखीचे आणि घटनांचे मूर्त स्वरूप दर्शवतात.

**स्मारक म्हणजे काय?**

स्मारके म्हणजे विशेष घटना, नेते, नायक, किंवा सांस्कृतिक प्रथा यांचे स्मरण ठेवण्यासाठी उभारलेली रचना. ती समाजाच्या ऐतिहासिक घडामोडींचा आणि मूल्यांचा पुरावा देतात.

**स्मारकाचे महत्व**

**१) समाजाची सामुहिक ओळख कळते:** स्मारके समाजाच्या ओळख जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. ती भूतकाळातील लढाया, करार, किंवा महत्त्वाच्या व्यक्तींचे स्मरण करून देतात. अशा प्रकारे, ती समाजाला त्यांच्या भूतकाळाच्या घटनांची आठवण करून देतात. उदा. युद्धस्मारक स्थानिक सैनिकांचे स्मरण करून देते, ज्यांनी युद्धात सहभाग घेतला होता.

**२) राजकीय आणि सामाजिक शक्ती ज्ञात होते:** स्मारके अनेकदा राजकीय शक्तीचे आणि सत्तेचे प्रतीक असतात. ती शासकांनी त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी उभारलेली असतात. त्यामुळे त्या काळातील सत्ताकेंद्र आणि त्यांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब यात दिसते. उदा. राजाच्या पुतळ्यातून त्या काळातील समाजाची राजकीय व्यवस्था आणि शासकाचे महत्त्व दिसून येते.

**३) सांस्कृतिक सातत्य लक्षात येते:** स्मारके सांस्कृतिक परंपरांचे सातत्य दाखवतात. ती कालांतराने टिकून राहिल्यामुळे समाजाच्या संस्कृतीत कोणते बदल घडले, आणि कोणत्या परंपरांनी स्थिरता राखली हे समजू शकते.

उदा. एखादे प्राचीन मंदिर समाजाच्या धार्मिक श्रद्धांचे आणि परंपरांचे प्रतीक ठरते.

**१) तंत्रज्ञान आणि वास्तुकला समजते:** स्मारकांची रचना आणि बांधकाम हे त्या काळातील तंत्रज्ञान आणि वास्तुकलेचा पुरावा असतात. स्मारकांचा अभ्यास करून स्थानिक समाजाच्या तांत्रिक प्रगतीची माहिती मिळते. उदा. किल्ल्याच्या बांधकामातील तंत्रज्ञान त्या काळातील शस्त्रास्त्र आणि सुरक्षेबाबतची माहिती देतो.

**२) सांस्कृतिक आणि धार्मिक प्रथा समजतात:** स्मारके अनेकदा धार्मिक किंवा सांस्कृतिक विधींशी संबंधित असतात. ती लोकांच्या श्रद्धा, समारंभ, आणि त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या प्रतीकांचे दर्शन घडवतात. उदा. धार्मिक स्मारक समाजातील आध्यात्मिकता आणि त्यांची आस्था किती खोलवर रुजलेली आहे हे दाखवते.

**ऐतिहासिक साधन म्हणून आव्हाने:**

स्मारके महत्त्वपूर्ण असूनही, त्यांचे अर्थ लावणे सोपे नसते. त्यांचा नेमका संदर्भ शोधण्यासाठी अन्य पुरावे आणि इतिहासाचा अभ्यास आवश्यक असतो.

**१) संदर्भाचा अभाव:** स्मारके त्यांच्या मूळ अर्थापासून कधी दूर जातात, ज्यामुळे त्यांचा अर्थ समजून घेणे कठीण होऊ शकते. स्मारके स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अपरिहार्य आहेत. ती भूतकाळाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय संरचनांचा पुरावा देतात. स्मारकांच्या अभ्यासातून स्थानिक समाजाच्या विकासाची, ओळखीची, आणि सांस्कृतिक सातत्याची माहिती मिळते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४**

अ) रिकाम्या जागा पर्यायासह भरा.

१. सामुहिक स्मृती आणि ओळख जपण्यात .......... महत्त्वाची भूमिका बजावतात.

अ) शहरे ब) स्मारके क) राज्ये ड) शाळा

२. ............. आणि स्मारके अनेकदा खंडित किंवा अपूर्ण अवस्थेत टिकून राहतात.

अ) बाजारपेठा ब) वस्त्र क) प्राचीन इमारती ड) वाहतूक व्यवस्था

३. ............ जपण्यात आणि जतन करण्यात स्मारके महत्त्वाची भूमिका बजावतात.

अ) पर्यावरण ब) इतिहास क) संगीत ड) खेळ

४. स्मारके अनेकदा त्यांची निर्मिती करणाऱ्या लोकांच्या ........... आणि परंपरांना मूर्त रूप देतात.

अ) वास्तुकला ब) संस्कृती क) कला ड) विज्ञान

ब) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १. कलाकृती | अ) राजकीय व्यवस्था आणि सत्तेचे प्रतीक |
| २. स्मारके | ब) लोकांच्या जीवनशैली |
| ३. प्राचीन नाणी | क) तांत्रिक विकास |
| ४. धातूकाम | ड) समाजाची अर्थव्यवस्था |
| इ) १-अ, २-ब, ३-क, ४-ड | ब) १-ब, २-क, ३-ड, ४-अ |
| क) १-ड, २-क, ३-अ, ४-ब | ड) १-ब, २-अ, ३-ड, ४-क |

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : सामूहिक स्मृती कशी तयार केली जाते आणि ती कशी राखली जाते याचा अभ्यास करण्यासाठी स्मारके मुख्य स्त्रोत बनतात.

विधान २ : प्रत्येक कलाकृतीमध्ये त्या लोकांबद्दलची कथा असते

अ) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

ब) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

क) दोन्ही विधाने बरोबर.

ड) दोन्ही विधाने चुकीची.

## ३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

**१) पुराभिलेखागार:** अशी जागा जिथे सार्वजनिक नोंदी किंवा ऐतिहासिक कागदपत्रे, जसे की खाजगी कागदपत्रे, संग्रह आणि वर्तमानपत्रे, संशोधनासाठी जतन केली जातात.

**२) मौखिक परंपरा :** कथा, इतिहास आणि सांस्कृतिक ज्ञान मौखिकपणे पिढ्यान्पिढ्या पाठवण्याची प्रथा, मौखिक साक्ष देण्यासाठी आधार बनवते.

**३) अवशेष :** पूर्वीच्या काळापासून अस्तित्वात असलेली एखादी वस्तू, विशेषत: ऐतिहासिक किंवा भावनिक स्वारस्य असलेली, बहुतेक वेळा कलाकृती मानली जाते.

**४) वंशावळी :** कौटुंबिक इतिहास आणि वंशांचा अभ्यास, अनेकदा खाजगी कागदपत्रे आणि संग्रहांमध्ये दस्तऐवजीकरण केले जाते.

**५) संपादकीय :** संपादक किंवा प्रकाशकाचे मत व्यक्त करणारा लेख, सामान्यतः वर्तमानपत्रांमध्ये आढळतो, जो तत्कालीन सामाजिक आणि राजकीय वातावरण प्रतिबिंबित करतो.

**६) मोनोग्राफ :** इतिहासाच्या एका विशिष्ट विषयावर किंवा पैलूंवर तपशीलवार लिखित अभ्यास, अनेकदा विविध स्थानिक स्त्रोतांकडून रेखाचित्रे.

**७) शिलालेख :** स्मारक किंवा कलाकृतीवर कोरलेला किंवा कोरलेला मजकूर, त्याच्या मूळ, उद्देश किंवा इतिहासातील महत्त्व याबद्दल माहिती प्रदान करतो.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

अ) रिकाम्या जागा भरा.

१) पूर्वलक्षी २) स्थानिक ३) स्थानिक ४) सूक्ष्मता

ब) क) १-ई, २-इ, ३-अ, ४-आ

क) दोन्ही विधाने चुकीची

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२

अ) रिकाम्या जागा भरा.

१. जाहिराती २. वृत्तमानपत्र ३. वृत्तमानपत्र ४. जाहिराती

५. मृत्युपत्रे आणि जन्म नोंदी

ब) १-आ, २-ई, ३-अ, ४-इ

क) दोन्ही विधाने बरोबर.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३

अ) रिकाम्या जागा भरा.

१. जातीचा इतिहास, २. तोंडी पारंपरिक मुलाखत, ३. अपारदर्शक, ४. मौखिक परंपरा

ब) १-आ, २-इ, ३-ई, ४-अ

क) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४

अ) रिकाम्या जागा भरा.

१. स्मारके २. कलाकृती ३. इतिहास ४. संस्कृती

ब) १-आ, २-अ, ३-ई, ४- इ

क) दोन्ही विधाने बरोबर

## ३.५ सारांश

स्थानिक इतिहासाची साधने या घटकात विशिष्ट परिसराच्या भूतकाळाचा अभ्यास व पुनर्रचना करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साहित्य आणि पद्धतींचा शोध घेतला जातो. यात खाजगी कागदपत्रे व संग्रहांचे महत्त्व अधोरेखित केले आहे, कारण ती वैयक्तिक जीवनाच्या तपशीलवार नोंदी मिळतात. सार्वजनिक घडामोडी, लोकांची मते आणि काळानुसार समाजात झालेले बदल समजून घेण्यासाठी वर्तमानपत्रे महत्त्वपूर्ण साधन म्हणून वापरली जातात. मुलाखती या साधनावरही भर दिला जातो, कारण त्या सामूहिक स्मृती जतन करण्यासाठी उपयुक्त ठरतात आणि त्या अनुभवांचे दस्तऐवजीकरण करतात, जे कदाचित इतरत्र उपलब्ध नसतील. कलाकृती व स्मारके इतिहासाचे भौतिक अवशेष म्हणून महत्त्वपूर्ण असतात, कारण त्यामध्ये एखाद्या समूहाचा सांस्कृतिक वारसा आणि मूल्ये मूर्त स्वरुपात व्यक्त होतात. ही सर्व साधने एकत्रितपणे स्थानिक इतिहासाचा सखोल व सर्वसमावेशक दृष्टिकोन देतात. या विविध साधनांच्या वापरामुळे स्थानिक समाजाच्या इतिहासाचे अधिक परिपूर्ण व व्यापक चित्र उभे राहते. यामुळे इतिहासकारांना त्या परिसराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रवाहांचा अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास करता येतो, ज्यामुळे समाजाच्या अस्मितेचा व वारशाचा मागोवा घेणे शक्य होते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१. स्थानिक इतिहासाचे साधन म्हणून रोजनिशी चे महत्व सांगा.

२. स्थानिक इतिहासाचे साधन म्हणून आत्मचरित्रा चे महत्व सांगा.

३. कलाकृती म्हणजे काय?

४. स्मारके म्हणजे काय?

ब) सविस्तर उत्तरे लिहा.

१. स्थानिक इतिहासाचे  साधन त म्हणून वर्तमानपत्रांचे योगदान स्पष्ट करा.

२. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातील कलाकृती आणि स्मारके यांचे महत्व स्पष्ट करा.

३. खाजगी कागदपत्रे ही स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाचे महत्वाचे साधन आहे हे सविस्तर स्पष्ट करा.

क) टिपा लिहा.

१. स्थानिक इतिहासासाठी मौखिक मुलाखतीचे चे योगदान

२. स्थानिक इतिहासात वर्तमानपत्रांचे योगदान

३. वृत्तपत्रांमध्ये आढळणाऱ्या मजकुराचे प्रकार

४. खाजगी कागदपत्रे आणि संग्रह वापरण्यातील आव्हाने

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५.

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे.

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणेः एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००.

६. पाटील अवनीश, मायक्रोहिस्ट्री: परीचयात्मक टिप्पण, विजयराव नलावडे आणि इतर (संपादकीय), निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद प्रकाशन, कोल्हापरू, २०१३, पान ८४ ते ८९.

७) धैर्यशील जाधव, स्थानिक इतिहास, एज्युकेशन ॲन्ड सोसायटी, डॉ. प्रकाश साळवी (संपा.), इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्युकेशन, जुलै २०२३, पृष्ठ क्र. १४५.

८) दिक्षित, राजा., इतिहास वाङःमय, संपादक जाधव, र. ग., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०.

९) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२.

१०) ढेरे, रा. चि., लोकसाहित्यः शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९.

११) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८.


❑❑❑

# घटक ४
# स्थानिक इतिहासातील पुराभिलेखीय संशोधन
# (Methodology Archival Research in Local History)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ पुराभिलेखीय संशोधन (Archival Research)

  ४.२.२ सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण (Survey and Documentation)

  ४.२.३ मुलखात (Oral Interview)

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणांस -

- पुराभिलेखीय संशोधन म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.
- पुराभिलेखागाराचे प्रकार, कागदपत्रांचे प्रकार कोण-कोणते ते स्पष्ट करता येईल.
- सर्वेक्षण म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.
- सर्वेक्षणातून संशोधनासाठी माहिती कोणत्या पद्धतीने प्राप्त करावायची याची माहिती होईल.
- सर्वेक्षणाचे इतिहासलेखनातील फायदे व तोटे स्पष्ट करता येतील.
- मुलखात म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.
- मुलखातीचे प्रकार, मुलाखत कशी घ्यावी याची माहिती होईल.
- मुलखातीचे इतिहासलेखनातील फायदे व तोटे स्पष्ट करता येतील.

## ४.२ विषय विवेचन

पुराभिलेखीय संशोधन हा भूतकाळातील सूक्ष्म आणि बारीकसारिक तपाशीलांचा माहिती देणारा एक प्रकार आहे. पुराभिलेखीय ऐतिहासिक नोंदी आणि दस्तऐवजांच्या संशोधनाद्वारे अदृश्य महितीचा खजिना आणि न सांगितल्या जाणाऱ्या कथांचा उलगडा होतो. पूर्वीच्या काळातील अनुभव, घटना आणि सांस्कृतिक इतिहासाची खिडकी म्हणून, पुराभिलेखीय संग्रह महत्त्वाची आणि ठोस स्वरूपाची माहिती देतात. आपल्या सामूहिक वारशासाठी, पुराभिलेखागारांच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण बाबींचा अभ्यास करून, संशोधक ऐतिहासिक संदर्भांची सखोल माहिती मिळवू शकतात. प्रचलित कथांना आव्हान देऊ शकतात आणि भूतकाळातील गुंतागुंतांवर नवीन प्रकाश टाकू शकतात. पत्रे, रोजनिशी, छायाचित्रे, कलाकृती आणि इतर प्राथमिक साधनांच्या काळजीपूर्वक विश्लेषणाद्वारे, संग्रहित संशोधन आपणास एखादी व्यक्ती अथवा विशिष्ट समाजाचे जीवन व अनुभव इतिहासाची पुनर्रचना करण्यास आणि त्यांच्या जगाला आकार देणाऱ्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक शक्तींचा शोध घेण्यास प्रवृत्त करते. विस्मृतीच्या कालखंडातील रहस्ये उलगडणे किंवा परिचितांची पुनर्व्याख्या करणे असो, अभिलेखीय संशोधन हे मानवी इतिहास आणि संस्कृतीची गुंतागुंत समजून घेण्यासाठी एक महत्वाचे साधन आहे. सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण हे ऐतिहासिक नोंदी आणि दस्तऐवजांच्या माहितीचे पद्धतशीर संकलन, ध्वनीमुद्रण आणि जतन यांचा समावेश असलेल्या अभिलेखीय संशोधनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तर मुलाखत हे इतिहासकार आणि संशोधक यांच्यासाठी एक मौल्यवान साधन आहे, जे ऐतिहासिक घटनांमधून जगलेल्या व्यक्तींच्या आवाज आणि अनुभवांद्वारे भूतकाळातील झाकलेला एखादा पडता खुला करतो म्हणून याला आपण 'लपविलेल्या इतिहासाचे अनावरण' असे म्हणू शकतो.

**अ) पुराभिलेखीय संशोधन:**

इतिहासलेखनासाठी प्राथमिक संदर्भ साधने मिळण्याचे खात्रीशीर ठिकाण म्हणून पुराभिलेखागारास ओळखतो. पुराभिलेखागारामध्ये विविध प्रकारची हस्तलिखिते, जुने दुर्मिळ ग्रंथ, विविध शासकांची कागदपत्रे, हिशेबाची दफ्तरे, शासकीय कागदपत्रे, सरकारी अहवाल, गॅझेट, विविध वृत्तपत्रे इत्यादीचे व्यवस्थित जतन व संवर्धन केलेले असते. पुराभिलेखागार म्हणजे पुरातन अथवा जुने उपयुक्त अभिलेख म्हणजेच दस्तऐवज अथवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण. ऐतिहासिक दस्तऐवज, राज्यकारभाराची कागदपत्रे, हिशेबाची कागदपत्रे ज्या ठिकाणी जतन करून ठेवली असतात त्याला दप्तरखाना (Record Office) किंवा पुराभिलेखागार (Archives) असे म्हणतात. पुराभिलेखागारामधील ही साधने प्रकाशित अथवा अप्रकाशित स्वरूपामध्ये असतात. पुराभिलेखागारामधील ही साधने मूळ अस्सल, प्राथमिक दर्जाची असतात. या साधनांच्या आधारे केलेले संशोधन अत्यंत विश्वसनीय व दर्जेदार मानले जाते. भारतातील विविध राज्यातील पुराभिलेखागारांच्यामध्ये विविध कालखंडातील कागदपत्रे सद्यस्थितीत उपलब्ध होतात. यामध्ये विविध राजकीय कागदपत्रांच्या बरोबरच संस्थानी राज्यकर्ते, विविध आदेशपत्रे, गुप्त पत्रव्यवहार, लष्करी हालचाली, दळणवळण, शेती, पाणीपुरवठा, नागरी सुविधा, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रस्ते,

धरणे, बंदरे, जमिनीची कागपत्रे, इत्यादी संबंधीची माहिती उपलब्ध होण्यास मदत होते, यातून संशोधक स्थानिक इतिहासाचे विविध पैलू अतिशय बारकाव्याने मांडू शकतो. पुराभिलेख स्थानिक इतिहासाचे साधने प्राप्त करण्याचे एक खात्रीशीर ठिकाण आहे.

**दफ्तरखाने अथवा पुराभिलेखागाराचे प्रकार:**

पुराभिलेखागार अथवा दप्तरखान्याचे विविध स्तरावर जतन व संवर्धनाचे कार्य चालू आहे. पुराभिलेखागारांचे प्रामुख्याने पुढील प्रकार आहेत.

१) शासकीय पुराभिलेखागार

२) निमशासकीय पुराभिलेखागार

३) संशोधन संस्था पुराभिलेखागार

४) विद्यापीठ/महाविद्यालय पुराभिलेखागार/स्थानिक दप्तरखाने

५) खाजगी पुराभिलेखागार अथवा दप्तरखाने

६) देवस्थान दप्तरखाने

**व्यवसाय अथवा औद्योगिक पुराभिलेखागार**

याशिवाय स्थानिक इतिहास लेखनामध्ये अथवा पुराभिलेखीय संशोधनामध्ये खालील गोष्टींचादेखील समावेश होतो;

१) स्थानिक अभिलेख अथवा पुराभिलेख कार्यालये

२) नगरपालिका अथवा तालुका स्तरावरील कार्यालये

३) ऐतिहासिक संस्था आणि संग्रहालये

४) खाजगी संग्रह आणि कौटुंबिक कागदपत्रे

५) ऑनलाइन संग्रह अथवा डिजिटल भांडार

**भारतातील प्रमुख पुराभिलेखागारांची ओळख:**

भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर दप्तरखाना अथवा पुराभिलेखागाराकडे लक्ष देण्यास सुरूवात केली. भारताची राज्यकारभाराच्या सोयीसाठी बंगाल, मद्रास, मुंबई असे चार प्रांत केले. त्या-त्या प्रांताच्या ठिकाणी त्यांनी आपले दप्तरखाने स्थापन केले. ब्रिटिशांनी मद्रास येथे सन १८१८ मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची स्थापना केली. पुढे सन १९१९ मध्ये कलकत्ता, सन १८२१ मध्ये मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना केली. प्रारंभी ब्रिटिशांनी कलकत्ता ही भारताची राजधानी म्हणून केलेली होती. याच ठिकाणी त्यांनी सन १८९१ मध्ये 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस' ची स्थापना करून त्याचे प्रमुख म्हणून डॉ. जी. डब्ल्यू. फॉरेस्ट

यांची नेमणूक केलेली होती. भारतात ब्रिटिशसत्ता जस-जशी दृडमूल होत गेली तशी नागपूर, लाहोर, पाटणा, अलाहाबाद, गोहत्ती, कटक, श्रीनगर याठिकाणी नवीन पुराभिलेखागारांची स्थापना केलेली दिसते. सध्या भारतात केंद्रीय पुराभिलेखागारांच्या शिवाय राजस्थान २१, महाराष्ट्र ५, मध्यप्रदेश ५, उत्तर प्रदेश २, केरळ २, गुजरात २ तर बाकी राज्यात प्रत्येकी एक पुराभिलेखागार आहेत. राजस्थानमधील बिकानेर येथील पुराभिलेखागार सर्वात मोठे आहे.

**१) दिल्ली राष्ट्रीय पुराभिलेखागार:**

दिल्ली राष्ट्रीय पुराभिलेखागाराची स्थापना ११ मार्च १८९१ रोजी कलकत्ता येथे प्रथम झाली होती. पुढे १९११ मध्ये नवी दिल्ली येथे त्याचे स्थलांतर करण्यात आले. या पुराभिलेखागारामध्ये सन १८५७ च्या उठावापूर्वीचे व नंतरचे असे कागदपत्रांचे दोन भाग आहेत. ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकार या दोघांचेही कागद आहेत. याची संख्या २.७ मिलियन इतकी आहे. यातील बरीच कागदपत्रे सध्या ऑनलाइन स्वरुपात उपलब्ध आहेत. हे कागद मुख्यतः फार्सी, उर्दू, हिंदी, मराठी, संस्कृत, बांगला या भाषांत आहेत. पैकी फार्सी भाषेतील काही कागदपत्रांची बृहत्सूची 'कॅलेंडर ऑफ पर्शियनकॉरेस्पाँडन्स्' या मालेच्या ११ खंडांत प्रकाशित झाली आहे. तसेच संस्कृत, हिंदी, बांगला या भाषांतील कागद प्रकाशित झाले असून मराठी भाषेतील कागदही प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. यांखेरीज या राष्ट्रीय अभिलेखागाराने 'फोर्ट विल्यम कॉरेस्पाँडन्स', काही यूरोपीय प्रवासवृत्ते व काही भारतीय भाषांतील कागदपत्रांच्या सूचि प्रकाशीत केल्या आहेत. या राष्ट्रीय अभिलेखागाराची भोपाळ येथे एक शाखा असून यामध्ये पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागद सुरक्षित ठेवले आहेत.

**२) जम्मू व काश्मीर राज्य पुराभिलेखागार, श्रीनगर :**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९५१ मध्ये करण्यात आलेली आहे. श्रीनगर येथे मुख्य कार्यालय असून जम्मू येथे शाखा आहे. या पुराभिलेखागारात १७२४ ते १९७५ पर्यंतची फार्सी, काश्मीरी, तिबेटीयन, इंग्रजी या भाषांतील कागदपत्रे आहेत.

**३) पंजाब राज्य पुराभिलेखागार, पतियाळा:**

पंजाबचे पुराभिलेखागार सन १९४७ मध्ये अस्तित्वात आले. फाळणीपूर्वी पंजाबचे पुराभिलेखागार लाहोर येथे होते. विद्यमान पुराभिलेखागार पतियाळा येथे आहे. येथील कागदपत्रांत सिमला येथील विविध ब्रिटीश कार्यालयांचे कागदपत्रे आहेत. यांशिवाय येथे जुनी चित्रे, हस्तलिखिते, शस्त्रादी वस्तू इत्यादींचा संग्रह आहे.

**४) उत्तर प्रदेश राज्य पुराभिलेखगार, अलाहाबाद :**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९४९ मध्ये अलाहाबाद येथे झाली. पुढे सन १९७३ मध्ये लखनौ येथे त्याचे मुख्यालय करण्यात आले. सध्या याची अलाहाबाद, वाराणसी येथे शाखा आहे. या ठिकाणी सन १८०० ते १९१७ या कालखंडातील कागदपत्रे असून या कागदपत्रांच्या काही सूची प्रकाशित केल्या आहेत.

५) **बिहार राज्य पुराभिलेखागार, पटणा:**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १८६१ मध्ये सिविल सेक्रेटरियट रेकॉर्ड ऑफिस, पाटणा या नावाने झाली. पुढे सन १९५४ मध्ये राज्य पुराभिलेखागारामध्ये रूपांतर करण्यात आले. या ठिकाणी सन १७७१ ते १९६३ पर्यंतच्या कालखंडातील कागदपत्रे उपलब्ध आहे.

६) **मध्यप्रदेश राज्य पुराभिलेखागार, भोपाळ:**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९७५ मध्ये भोपाळ येथे झाली. येथील पुराभिलेखागारात इंदूर, ग्वाल्हेर, देवास, रतलाम, धार, जावरा, बढवानी इ. संस्थानांचे व पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागदपत्रांचा संग्रह ३३ हजार बस्त्यांच्या रूपात बांधून ठेवला आहे. तर इतर कागद १६ लाख १६ हजार फायलींच्या रूपात आहेत. जुन्या मध्य प्रांतातील कागदपत्रांचे ५ इंग्रजी खंड प्रसिद्ध केले आहेत.

७) **आसाम राज्य पुराभिलेखागार शिलोंग:**

आसाम येथील पुराभिलेखागार सन १८७४ मध्ये आसाम सिविल सेक्रेटरियट रेकॉर्ड ऑफिस या नावाने येथे शिलाँग स्थापन झाले. येथे सन १८२३ ते १९४९ या कालखंडातील पत्रव्यवहार उपलब्ध आहे. या पुराभिलेखागारातील हँडबूक डॉ. एस. के. भुयान यांनी सन १९५१ मध्ये प्रकाशित केलेली आहे.

८) **ओरिसा राज्य पुराभिलेखागार, भुवनेश्वर:**

या पुराभिलेखागाराची स्थापना १९४८ मध्ये भुवनेश्वर येथे झाली. या अभिलेखागारात कटक, बलसोर, संबळपूर इ. विभाग आणि धैकनाल, पर्लाकिमिडी इ. संस्थाने यांचे कागदपत्र संरक्षित ठेवले आहेत. या पुराभिलेखगारात मराठ्यांच्या इतिहासाच्या संबंधी कागदपत्रे उपलब्ध आहेत.

९) **पश्चिम बंगाल राज्य पुराभिलेखगार, कलकत्ता:**

कलकत्ता हे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राजधानीचे ठिकाण होते. सन १८२९ मध्ये कलकत्ता प्रांताचे रेकॉर्ड ऑफिस म्हणून याची स्थापना करण्यात आली. पुढे सन १९६१ मध्ये राज्य पुराभिलेखागारमध्ये याचे रूपांतर करण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीचे सुरुवातीचे सर्व कागद मूळ वा नक्कल स्वरूपात संग्रहीत होते. ते सर्व कागद राष्ट्रीय पुराभिलेखागारामध्ये नेले असून आता फक्त पश्चिम बंगालसंबंधीचे कागद येथे आहेत. येथून 'एन्शीयट इंडियन हिस्ट्री' व 'इंडियन हिस्टॉरिकल क्वाटर्ली' या संशोधन पत्रिका प्रकाशित होतात.

**१०) राजस्थान राज्य पुराभिलेखागार, जयपूर:**

राजस्थान हे स्वतंत्र राज्य होण्यापूर्वी म्हणजे सर्व संस्थाने राजस्थान राज्यात विलीन होण्यापूर्वी प्रत्येक संस्थानाचे स्वतंत्र दफ्तरखाने होते. मात्र सर्व संस्थाने राजस्थान ह्या एका राज्यात रुपांतरीत झाल्यानंतर ह्या राज्याचे एक मोठे पुराभिलेखागार सन १९५५ मध्ये स्थापन करण्यात आले. या पुराभिलेखागारातील सर्व कागदपत्र एकाच ठिकाणी ठेवणे अशक्य झाल्यामुळे बिकानेर येथे मुख्य पुराभिलेखागार करून जयपूर, जोधपूर, कोटा, अलवर इ. वीस ठिकाणी विभागीय पुराभिलेखागारे स्थापन करण्यात आली. या सर्व

अभिलेखागारांत सन १६३५ ते १९४८ या कालखंडातील सुमारे ८० लाख बस्ते (रुमाल) व फायली असून त्यांतील सर्व कागदपत्रांची संख्या दोन ते तीन अब्ज इतकी आहे.

**११) गुजरात राज्य पुराभिलेखागार, अहमदाबादः**

गुजरात राज्य पुराभिलेखागार सन १९७१ मध्ये स्थापन करण्यात आले. या पुराभिलेखागाराचे मुख्य कार्यालय अहमदाबाद येथे असून एक शाखा बडोडा व राजकोट येथे आहे. अहमदाबादचे पुराभिलेखागार गुजरात राज्य स्वतंत्र झाल्यानंतर स्थापन झाले असून बडोदे येथील शाखा सयाजीराव गायकवाड यांनी स्थापन केलेली आहे. बडोद्याच्या शाखेमध्ये अधिक जुने कागदपत्र उपलब्ध आहेत. या ठिकाणी सन १७२८ ते १९४७ या कालखंडातील कागदपत्रे उपलब्ध आहेत. यातील कागदपत्रे मराठी, गुजराती व इंग्रजी या तीन भाषांत असून बडोद्याच्या कार्यालयाने तेथील कागदपत्रांचे ८ खंड मराठीत व १० खंड इंग्रजीत प्रकाशित केले आहेत.

**१२) गोवा राज्य पुराभिलेखगार, पणजीः**

या दफ्तरखान्याची स्थापना सन १५९५ मध्ये केली असे मानले जाते. येथील कागदपत्रे पोर्तुगीजांनी वसाहत स्थापनेपासून जपून ठेवलेली आहेत. पोर्तुगीजांना ऐतिहासिक कागदपत्रांचे महत्त्व चांगले माहीत होते. त्यामुळे येथे गोव्यासह आशियातील सर्व पोर्तुगीज प्रदेशांचे कागदपत्रे जपून ठेवले आहेत. येथील कागद मुख्यतः पोर्तुगीज व मराठी या दोन भाषांत आणि अगदी थोडे फार्सी भाषेत आहेत. यांतील काही थोडे कागद सुटे असून इतर कागदांची कातडी बांधणीची सुमारे ७० हजार पुस्तके करून ठेवली आहेत. 'अशेताँश' नावच्या मालेमध्ये या पुराभिलेखागाराने आतापर्यंत ५ खंड प्रसिद्ध केलेले आहेत. त्याशिवाय मिस्टर बेकर, फादर विकी, पा. स. पिसुर्लेकर यांनी येथील कागदपत्रांचा पुरेपुर उपयोग करून 'ट्रीटीज, एंगेजमेंट्स अँड सनद्स' या मालेत १५ खंड व पोर्तुगीज व मराठाज् या मालेत ५ खंड प्रकाशित केले आहेत. या बांधीव पुस्तकात सोळाव्या शतकातील गोव्यामधील हिंदू समाजसंस्थेची माहिती देणारे हजारो कागद आहेत.

**१३) कर्नाटक राज्य पुराभिलेखागार, बंगलोरः**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १८५८ मध्ये मैसूर राज्याचा भाग म्हणून झालेली होती. पुढे सन १९७३ मध्ये कर्नाटक राज्य पुराभिलेखागार, बंगलोर असे रूपांतर झाले. या ठिकाणी सन १७९९ ते १९५६ पर्यंतचे रेकॉर्ड असून फार्सी, मराठी, कन्नड या भाषांतील कागदांचा भरणा फार मोठा आहे. हे कागद मुख्यतः पूर्वीचे म्हैसूर संस्थान आणि त्याच्या लगतचे पाळेगार व नायक यांजकडील आणि अग्रहारासंबंधीचे आहे.

**१४) आंध्र प्रदेश राज्य पुराभिलेखागार, हैदराबादः**

हैद्राबाद संस्थानने सन १८९४ मध्ये सुरू केले. या मधील दफ्तरे दीवानी, माल-मुलकी या नावाने प्रसिद्ध होती. हैदराबाद संस्थान शेजारच्या तीन राज्यांत विलीन झाल्यानंतर या पुराभिलेखागारांस सन १९६२ मध्ये आंध्र प्रदेश राज्य पुराभिलेखागार असे नाव देण्यात आले. यामध्ये २,०००,००० हून अधिक कागदपत्रे

असून मुघल काळातील १६२८ पासूनची व सालारजंग संग्रहामध्ये १८००ते १९६० पर्यंतची फार्सी, मराठी, काही उर्दू व तेलुगू कागदपत्रे आहेत. या पुराभिलेखागाराने एक उर्दू, दहा फार्सी-इंग्रजी व चार मराठी कागदपत्रांचे खंड प्रसिद्ध केले आहेत.

**१५) तामिळनाडू राज्य पुराभिलेखागार, मद्रास :**

तामिळनाडू येथील दफ्तरखाना सन १८०६ मध्ये फोर्ट सेंट जॉर्ज येथे स्थापन करण्यात आला. पुढे सन १९०९ मध्ये याचा विस्तार करण्यात आला. मलबार व कोरोमांडल किनाऱ्यावरील इंग्रज वखारींतील तसेच ईस्ट इंडिया कंपनीच्या वेळचे मद्रास सरकार व मद्रास इलाखा या संबंधीचे सन १६७० पासूनचे लक्षावधी कागदपत्र इथे आहेत. त्यांतील इंग्रजी कागद मुख्यतः फाईल रूपात असून तमिळ, तेलुगू, मराठी इ. भाषांतील कागद बस्त्यांच्या रूपात ठेवले आहेत. यांत शेकडो ताडपत्रावरीलही आभिलेख आहेत. याचबारोबर याठिकाणी डच (१६ वे शतक), डॅनिश (१७ व १८ वे शतक), तंजोर राज्य रेकॉर्ड (१७३८-१७८३), चर्च रेकॉर्ड (१७६५-१८८४) या पुराभिलेखारारातील सर्व कागदपत्रांच्या सूची तयार करण्यात आलेल्या आहेत.

**१६) केरळ राज्य पुराभिलेखागार, त्रिवेंद्रम:**

केरळ राज्य पुराभिलेखागाराची सुरवात त्रावनकोर व कोचीन राज्याचे रेकॉर्ड ऑफिस म्हणून अनुक्रमे सन १८८७ व १९०९ मध्ये झाली. पुढे सन १९६२ मध्ये केरळ राज्य पुराभिलेखागार अस्तित्वात आले. याचे मुख्य कार्यालय त्रिवेंद्रम येथे असून एर्नाकुलम व कोझिकोडे येथे त्याची शाखा आहेत. येथील कागदपत्रे सन १६२५ ते १९५६ पर्यंतच्या कालखंडातील असून ती प्रामुख्याने ताडपत्रे व कागद या स्वरुपांत असून ते मुख्यतः मल्याळम, तमिळ भाषांत व क्वचित मोडी-देवनागरी लिप्यांत आहेत. यातील सुमारे १,३०० लेख वेळुपत्रांवर लिहिलेले आहेत. येथून 'इंडियन हिस्ट्री जर्नल' नावाची संशोधन पत्रिका प्रकाशित होते.

**१७) महाराष्ट्रातील प्रमुख दफ्तरखाने व पुराभिलेखागार:**

**१) मुंबई पुराभिलेखागार:**

मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या कालखंडात १५ सप्टेंबर, १८२१ रोजी झाली. यामध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या पासून ते स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्व महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आहेत. १७ व्या शतकापासून मुंबई ब्रिटिशांच्या कारभाराचे प्रमुख केंद्र होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने हुबळी, धारवाड, कारवार, राजापूर, ठाणे इ. ठिकाणी ज्या वखारी स्थापन केलेल्या होत्या तेथील पत्रव्यवहार या ठिकाणी आहे. ब्रिटीशांनी मुंबई, बंगाल व मद्रास हे तीन इलाखे स्थापन करून मराठे, म्हैसूरकर, निजाम, राजपूत आदींशी सत्ता संपादनासाठी तह केले त्यासंबंधीचा व ह्या सत्ताधिशांस अंकित करून केलेल्या राज्यकारभाराचा सर्व इंग्रजी पत्रव्यवहार आहे. या अभिलेखागारात ९८,००० हस्तलिखित कागदांचे पुठ्ठा बांधणीचे ग्रंथ (फाईल्स), ४,००,९९९ हस्तलिखित फाईल्स व साध्या बांधणीचे ८०,००० छापीलग्रंथ आहेत. येथील कागदपत्रांचे रेसिडेंटचे दप्तर,

सचिवालयातील विविध विभागांचे दप्तर, किरकोळ दप्तर, खाजगी दप्तर व छापील दप्तर असे पाच विभाग आहेत. यामधील सर्वात जुना अभिलेख सन १६३० मधील आहे. ब्रिटिश कालखंड व मराठा कालखंडाचा इतिहास अभ्यासण्यासाठी मुंबईचे पुराभिलेखागार अत्यंत महत्त्वाचे आहे. या पुराभिलेखागारात अनेक दुर्मीळ मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रे आहेत. यामध्ये 'बॉम्बे समाचार' (१८३१), 'दर्पण' (१८३२), 'मॉर्निंग स्टार्ट' (१८३६), 'बॉम्बे कुरिअर' (१७९७ – १८४६), 'हरिजन' (१९४२) इत्यादी वृत्तपत्रांचा समावेश आहे. याशिवाय ६,००० ऐतिहासिक नकाशे आहेत. पुराभिलेखागाराच्या माध्यमातून सन १९८४ पासून प्रकाशन शाखा सुरू केली आहे. मुंबई पुराभिलेखागारात परदेशाविषयी असणाऱ्या अभिलेखांची माहिती संकलित करून 'रेकॉर्ड पर्टेनिंग टू फॉरिन कंट्रीज' (आबुधाबी ते पर्शिया भाग – १ व भाग – २) इत्यादी प्रकाशने केलेली आहेत.

**२) पुणे पुराभिलेखागार (पेशवा दफ्तर) :**

पुणे पुराभिलेखागाराची स्थापना १ सप्टेंबर १८९१ रोजी करण्यात आली. याला पेशवे दप्तर अथवा एलिनेशन ऑफिस असेही म्हणतात. मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रांनी समृद्ध असा हा दप्तरखाना आहे. पेशवे दप्तरातील कागदपत्रे मोठ्या प्रमाणात मोडी लिपीत आहेत. त्याच बरोबर याठिकाणी फार्सी, गुजराती, हिंदी व इंग्रजी कागदपत्रे आहेत. मोडी कागदांची दप्तरे ३९ हजार असून त्यातील सर्व कागद साडेतीन कोटींच्यावर आहेत. पेशवे दप्तरात कागदपत्रांचे एकूण ३६ विभाग आहेत. त्यामध्ये शाहू दप्तर, रोजकीर्द (रोजच्या खर्चाच्या नोंदी), घडणी (आर्थिक व्यवहाराचे दप्तर), प्रांत अजमास (प्रांताच्या हिशेबाचे कागद), पागा, आंग्रे दफ्तर, चिटणीशी, जमाव, सातारा महाराज दप्तर, इनाम कमिशन, पैमाश, पाहणी खर्डे, डेक्कन कमिशनर दप्तर, एजंट दप्तर, रेसिडेंसी दप्तर हे त्यांपैकी काही विभाग आहेत. पेशवे काळातील काशी, मथुरा, त्र्यंबकेश्वर, नाशिक, वाशी, पंढरपूर इ. धार्मिक स्थळांचा पत्रव्यवहार पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. अशा पत्रव्यवहारातून त्या धार्मिक स्थळाचे महत्त्व, जतन, आर्थिक व्यवहार इत्यादीची माहिती मिळते. पेशव्यांनी मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण पुरोहितांना धार्मिक सनदा व दानपत्रे दिली आहेत त्याची माहिती मोठ्या प्रमाणात मिळते. या कागदपत्रांतून काही इतिहासोपयोगी कागदपत्र निवडून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले आहेत. सर जदुनाथ सरकार व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रसिद्ध केलेले आहेत. सर जदुनाथ सरकार यांनी पुण्याच्या रेसिडेन्सीची कागदपत्रे जमवून त्याचे १५ खंड प्रसिद्ध केले. त्यानंतर डॉ. पी. एम. जोशी व डॉ. व्ही. जी. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरातील इतर कागदपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत.

**३) कोल्हापूर पुराभिलेखागार :**

कोल्हापूर पुराभिलेखागाराची स्थापना १ मार्च १९४९ रोजी करण्यात आली. या पुराभिलेखागारात मराठेकालीन मराठी व फारसी कागदपत्रांचा समावेश आहे. याचे पारसनिशी, निवडी, चिटणीशी, जमेनिशी, हुजूर खाजगी इत्यादी विभाग आहेत. ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीत असून ती सुमारे तीन हजार रूमालात बांधून ठेवली आहेत. यात कोल्हापूर छत्रपतींचा पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीकर, निजाम, पोर्तुगीज, इंग्रज, कर्नाटकचे पाळेगार यांच्याशी झालेला पत्रव्यवहार आहे. गगनबावडा, विशाळगड, इचलकरंजी, तोरगल,

कागल इत्यादी संस्थाने विलीन झाल्यावर त्यांच्याकडील कागदपत्रे या दप्तरखान्यात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. सन १७३४ ते १९४९ पर्यंतची कागदपत्रे या पुराभिलेखागारात आहेत. या पुराभिलेखागारात विविध खातेनिहाय ४० हजार बस्ते आहेत. राजर्षी शाहू छत्रपती महाराज व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील सर्व कागदपत्रे येथे उपलब्ध आहेत. कोल्हापूर संस्थानच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कलाविषयक इत्यादी अभ्यासासाठी हे पुराभिलेखागार संशोधकांच्यासाठी महत्वाचे आहे.

**४) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे :**

भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी सन १९१० मध्ये करण्यात आली. भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची शिवकालीन व पेशवेकालीन कागदपत्रे आहेत. याशिवाय यूरोपियन वकील, बादशाह व त्यांचे वजीर, सरदार, शिलेदार, जहागीरदार, जासुद इत्यादी विविध विषयावरील कागदपत्रे आहेत. त्याचबरोबर चिंचवड संस्थानची कागदपत्रे, चिपळूणकर घराण्याची कागदपत्रे, इचलकरंजीच्या घोरपडे घराण्याची कागदपत्रे, जेजुरी देवस्थानची कागदपत्रे, ज्योतिषविषयक कागदपत्रे आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाकडे वेळोवेळी प्रसिद्ध झालेली त्रैमासिके, इतिवृत्त, स्वीय ग्रंथमाला, पुरस्कृत ग्रंथमाला इत्यादीचा मोठा संग्रह आहे.

**स्थानिक इतिहास आणि पुराभिलेखीय कागदपत्रे:**

पुराभिलेखीय संशोधन म्हणजे पुराभिलेख, भांडार अथवा विशेष संग्रहांमध्ये संग्रहित ऐतिहासिक नोंदी किंवा दस्तऐवजांची पद्धतशीर आणि सखोल माहिती घेणे. हे पुराभिलेख आपणास विविध स्वरूपमध्ये प्राप्त होवू शकतात. यामध्ये लिखित कागदपत्रे, छायाचित्रे आणि प्रतिमा, ध्वनीमुद्रण आणि चलचित्रण, कलाकृती आणि वस्तू, डिजिटल फाइल्स व नोंदी याशिवाय इतर अनेक कागदपत्रांचा समावेश होतो.

**१) पत्रव्यवहार, अहवाल आणि इतिवृत:**

राज्यकर्ते, अधिकारी आणि व्यक्ती यांच्यातील पत्रव्यवहार, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विचार व कार्य यावर प्रकाश टाकण्यात मदत होते. सार्जंशीलता अथवा गतिशीलता प्रकट करते. विविध प्रकारच्या स्थानिक प्रशासकीय नोंदी, सर्वेक्षणे तपासणी अहवाल, शासकीय कर आकारणी आणि जमीन व्यवस्थापनाचे विश्लेषण करण्यास मदत करते. विविध शासकीय बैठकीच्या नोंदी, कार्यवाही, स्थानिक परिषद, समित्या आणि संस्थांचे निर्णय, हे निर्णय प्रक्रियेवर प्रकाश टाकतात. स्थानिक इतिहासाशी संबंधित लिखित कागदपत्रांची उदाहरणे खालील प्रमाणे देता येतील, पेशवे कालीन प्रशासनाशी संबंधीती कागदपत्रे, बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या स्थानिक प्रशासन संस्थांचे कार्यवृत्त, दरखन दंगलीशी संबंधित पत्रव्यवहार, जिल्हा परिषद, पंचायत समिति, बाजार समिती, नगरपालिका, ग्रामपंचायत इत्यादीची कागदपत्रे. या संदर्भ साधनांच्या मदतीने संशोधक स्थानिक प्रशासन आणि व्यवस्थापनाचा अभ्यास करू शकतो. स्थानिक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संरचनांचे विश्लेषण करू शकतो. ब्रिटिश वसाहतवाद आणि स्थानिक आधुनिकीकरणाच्या प्रभावाचा अभ्यास करता येवू शकतो. वरील कागदपत्रांच्या आधारे विविध धार्मिक प्रथांची विस्तृत प्रमाणात चर्चा करू शकतो. याशिवाय सामान्य लोक आणि स्थानिक नेत्यांच्या जीवनाची

पुनर्रमांडणी करणे शक्य आहे. या लिखित दस्तऐवजांचे परीक्षण करून, संशोधकांना महाराष्ट्राच्या विशेषत: स्थानिक समृद्ध इतिहासाबद्दल आणि भारतीय इतिहासाच्या व्यापक संदर्भात त्याचे महत्त्व याविषयी बारकाईने समज मिळू शकते.

### २) छायाचित्रे, प्रतिमां नकाशे:

स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील पुराभिलेखीय संशोधनामध्ये मौल्यवान अस्सल साधने संशोधकास विश्लेषण करण्यात मदत करतात. विशेषत: ऐतिहासिक घटना आणि हालचाली, सामाजिक आणि सांस्कृतिक पद्धती, स्थापत्य आणि शहरी विकास, औद्योगिक आणि आर्थिक वाढ, विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वे आणि नेते यांची छायाचित्रे आणि प्रतिमांच्या माध्यमातून वेध घेतला जावू शकतो. यामध्ये प्राचीन कालखंड ते सध्या स्थितीच्या संदर्भात विचार होवू शकतो. स्थानिक बाबीच्या विविध विषयाशी निगडीत मोठ्या प्रमाणात छायाचित्रे आणि प्रतिमांचा संग्रह उपलब्ध आहे. उदा. मुंबई पुराभिलेखागार, भारतीय राष्ट्रीय पुराभिलेखागार (नवी दिल्ली), इंडिया ऑफिस रेकॉर्ड्स (ब्रिटिश लायब्ररी, लंडन), विविध स्थानिक ग्रंथालये आणि हस्तलिखित संग्रह, खाजगी संग्रह आणि कौटुंबिक अल्बम आणि ऑनलाइन भांडार जसे की, Flickr, Wikimedia Commons इत्यादि. महाराष्ट्रातील स्थानिक इतिहासाशी संबंधित छायाचित्रे आणि प्रतिमां जसे की विविध शहरातील रस्ते, इमारती, किल्ले, राजवाडे, गढया, नेत्यांची छायाचित्रे, पारंपारिक सण, उत्सव, चालीरीतींची चित्रे इत्यादी, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीतील औद्योगिक आणि कृषी दृश्ये, इत्यादिचे सर्मपक चित्रण करण्यास मदत होवू शकते.

ऐतिहासिक नकाश्यांच्या माध्यमातून स्थानिक इतिहास समजून घेणे शक्य आहे. जसे की, नकाशावर चित्रित केलेला कालावधी, भौगोलिक क्षेत्र आणि ऐतिहासिक घटना. स्थानिक संबंध समजून घेण्यासाठी भौगोलिक वैशिष्ट्ये, सीमा व ठिकाणे ओळखण्यासाठी मदत होते. याच बरोबर नकाशे आणि इतिहासामधील अंतरसंबंध समजून घेता येतात. जसे की, भौगोलिक वैशिष्ट्यांचा ऐतिहासिक घटनांवर कसा प्रभाव पडला. नकाशे ऐतिहासिक दृष्टिकोन, पूर्वाग्रह आणि ज्ञान कसे प्रतिबिंबित करतात याचे विश्लेषण होते. भौगोलिक बदलांचा ऐतिहासिक घटनांवर कसा परिणाम झाला याची माहिती मिळते. ऐतिहासिक घटनांची पुनर्रचना करण्यासाठी नकाशे महत्वाची भूमिका बजावतात.

स्थानिक इतिहास संशोधनात छायाचित्रे, प्रतिमा आणि नकाशे वापरण्याचे काही ठळक फायदे स्पष्ट करता येतील. जसे की, ऐतिहासिक घटना आणि संदर्भांचे दृश्य प्रतिनिधित्व. इतिहासाचे वैयक्तिक आणि मानवीकरण पैलू, लिखित नोंदींना पूरक पुरावा, भौतिक संस्कृती आणि दैनंदिन जीवनाचे विश्लेषण इत्यादि. पुराभिलेखीय संशोधनामध्ये छायाचित्रे, प्रतिमांचा आणि नकाशे यांचा समावेश करून, इतिहासकार, संशोधक स्थानिक इतिहासाचे अधिक व्यापक आणि आकर्षक कथन तयार करू शकतात.

### ३) ध्वनीमुद्रण आणि चलतचित्रण:

स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील ध्वनीमुद्रण आणि चलतचित्रण हे दृश्य पुरावे संशोधकास विश्लेषण करण्यास मदत करू शकतात. उदा. मौखिक परंपरा आणि मुलाखत, संगीत आणि सादरीकरणाची कला

सार्वजनिक भाषणे आणि कार्यक्रम, स्थानिक नेते आणि विविध व्यक्तिच्या मुलाखती, दैनंदिन जीवन आणि सांस्कृतिक पद्धतीचे चित्रण यांचा समावेश होतो. उदा. मुंबई पुराभिलेखागार, भारतीय राष्ट्रीय पुराभिलेखागार (नवी दिल्ली), इंडिया ऑफिस रेकॉर्ड्स (ब्रिटिश लायब्ररी, लंडन), ऑल इंडिया रेडिओ (AIR) संग्रह, दूरदर्शन (भारतीय राष्ट्रीय दूरदर्शन) संग्रह, स्थानिक ग्रंथालये, खाजगी संग्रह आणि कौटुंबिक संग्रहण आणि ऑनलाइन भांडार (उदा. YouTube, Sound Cloud) इत्यादि. महाराष्ट्राच्या स्थानिक इतिहासाशी संबंधित ध्वनीमुद्रण आणि चलतचित्रनाची अनेक साधने आहेत. यामध्ये पारंपारिक महाराष्ट्रीयन लोकगीते आणि संगीताचे ध्वनीमुद्रण, विविध चळवळीतील स्थानिक नेते, कार्यकर्ते, समाजसेवक यांची भाषणे, मुलाखती, स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारकांच्या मुलाखती, महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती यावर माहितीपट, पारंपारिक सण आणि समारंभांचे ध्वनीमुद्रण इत्यादिचा यामध्ये समावेश होतो.

स्थानिक इतिहास संशोधनात ध्वनीमुद्रण आणि चलतचित्रण वापरण्याचे अनेक फायदे आहेत. भूतकाळातील आवाज आणि अनुभवांवर थेट प्रकाश टाकणे शक्य आहे. लिखित नोंदी आणि छायाचित्रांचे पूरक पुरावे निर्माण करता येते. अमूर्त सांस्कृतिक वारशाचे विश्लेषण करता येते आणि लुप्त होत चाललेल्या भाषा आणि बोलींचे जतन करणे शक्य आहे. पुराभिलेखीय संशोधनामध्ये ध्वनीमुद्रण आणि चलतचित्रणाचा समावेश करून, संशोधक स्थानिक इतिहासाचे अधिक विलक्षण आणि सूक्ष्म कथन तयार करू शकतात.

**४) कलाकृती आणि वस्तूं :**

स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील पुराभिलेखीय संशोधनामध्ये विविध कालखंडातील कलाकृती आणि वस्तूंचा समावेश होतो. स्थानिक इतिहासाचे विश्लेषण व आकलन करण्यास संशोधकास मदत करतात. भौतिक संस्कृती आणि दैनंदिन जीवन, पारंपारिक हस्तकला आणि उद्योग, सामाजिक आणि सांस्कृतिक पद्धती आणि ऐतिहासिक घटना आणि हालचाली इत्यादि. स्थानिक इतिहासाशी संबंधित कलाकृती आणि वस्तूंचीच्यामध्ये स्थानिक पारंपारिक कपडे आणि कापड (उदा. साड्या, पगडी), हस्तकला (उदा. मातीची भांडी, लाकूडकाम, धातूकाम), कृषी साधने आणि उपकरणे, वाद्ये (उदा. तानपुरा, तबला), नाणी, चलन आणि आर्थिक साधने, उल्लेखनीय व्यक्तींच्या वैयक्तिक वस्तू, ऐतिहासिक अवशेष (उदा. तलवारी, ढाल, तोफ) इत्यादि. या कलाकृती आणि वस्तु आपणास विविध संस्था आणि शासकीय संग्रहालये, खाजगी संग्रह आणि कौटुंबिक संग्रह, पुरातत्व स्थळे आणि उत्खनने, स्थानिक बाजारपेठा आणि पुरातन वस्तूंची दुकाने इत्यादि मधून त्या प्राप्त होवू शकतात. स्थानिक इतिहास संशोधनात कलाकृती आणि वस्तू वापरण्याचे अनेक फायदे सांगता येतील. भूतकाळाशी ठोस अथवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध स्थापित करणे शक्य आहे. भौतिक संस्कृती आणि दैनंदिन जीवनाचे विश्लेषण करता येणे शक्य आहे. लिखित नोंदी आणि छायाचित्रांचे पूरक पुरावे आहेत आणि स्थानिक इतिहास लेखांच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा जतन करण्यास प्रोत्साहन देणे शक्य आहे. पुराभिलेखीय संशोधनामध्ये कलाकृती आणि वस्तूंचा समावेश करून, संशोधक स्थानिक इतिहासाचे अधिक व्यापक आणि आकर्षक कथन तयार करू शकतात.

**५) डिजिटल फाइल्स आणि नोंदीं:**

स्थानिक इतिहासाच्या संदर्भातील पुराभिलेखीय संशोधन ज्यामध्ये डिजिटल फाइल्स आणि नोंदींचा समावेश आहे. यामध्ये समकालीन घटना आणि समस्या या संबंधीची माहिती प्राप्त करणे अभिप्रेत आहे. याशिवाय सरकारी नोंदी आणि धोरणे, संस्थात्मक संग्रह, वैयक्तिक डिजिटल संग्रह आणि सोशल मीडिया, क्राउडसोर्स आणि समुदाय-व्युत्पन्न साहित्याचा समावेश आहे. स्थानिक इतिहासाशी संबंधित डिजिटल फाइल्स व नोंदीची उदाहरणे आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील. सरकारी अहवाल आणि कागदपत्रे (उदा. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर्स), संस्थात्मक संग्रह (उदा. विद्यापीठे, ग्रंथालये, संग्रहालये), डिजिटल वृत्तपत्रे आणि बातम्या संग्रहण (उदा. टाइम्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र टाइम्स), सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन समुदाय (उदा. Facebook, Twitter, WhatsApp), क्राउडसोर्स केलेले प्रकल्प (उदा., विकिपीडिया, ओपनस्ट्रीटमॅप), हस्तलिखिते, छायाचित्रे आणि कलाकृतींचे डिजिटल संग्रह आणि मौखिक इतिहास संग्रह यांचा समावेश होतो. डिजिटल फाइल्स आणि नोंदीचे संशोधक विविध सरकारी वेबसाइट आणि ऑनलाइन पोर्टल मधून प्राप्त करू शकतो. याशिवाय संस्थात्मक भांडार आणि डिजिटल संग्रह, ऑनलाइन लायब्ररी आणि डिजिटल संग्रह, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन समुदाय, क्राउडसोर्स्ड आणि समुदाय-व्युत्पन्न सामग्री आणि डिजिटल संग्रहालये आणि सांस्कृतिक वारसा मंच यांच्या माध्यमातून आपण ही साधने प्राप्त करू शकतो. स्थानिक इतिहास संशोधनात डिजिटल फाइल्स आणि नोंदी वापरण्याचे फायदे आहेत. पुराभिलेखीय संशोधनामध्ये डिजिटल फाइल्स आणि नोंदीचा समावेश करून, संशोधक डिजिटल तंत्रज्ञान आणि पद्धतींच्या फायद्यांचा फायदा घेऊन स्थानिक इतिहासाचे अधिक व्यापक आणि गतिमान चित्रण तयार करू शकतो.

**पुराभिलेखीय संशोधन पद्धती:**

१) पुराभिलेखीय संशोधनासाठी संशोधक करत असलेल्या संशोधांनाची योजना व पूर्ण तयारी करणे गरजेचे असते, जसे की संशोधकास कोणती कागदपत्रे अथवा संग्रह प्राप्त करावायची आहेत आणि कोण-कोणत्या पुराभिलेखगारात मिळू शकतात याची माहिती घेणे.

२) संशोधक ज्या पुराभिलेखगारात जाणार आहे त्याची रीतसर परवानगी घेतली पाहिजे.

३) पुराभिलेखाचे काही एक नियम असतात त्याचे पालन केले पाहिजे आणि साधनांची काळजी व खबरदारी घेणे गरजेचे असते. अर्थात कागदपत्रांची योग्य हाताळणी केली पाहिजे.

४) पुराभिलेखीय साधने शोधण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी पद्धतशीर दृष्टीकोन विकसित केला पाहिजे.

५) पुराभिलेखीय कागदपत्रांच्या तपशीलवार नोंदी अथवा नोट्स घेणे. परवानगी असल्यास नक्कल प्रत तयार करून घेणे.

६) क्रॉस-रेफरन्सिगद्वारे प्राप्त माहिती अथवा कागदपत्रे यांची सत्यता तपासणे.

७) मिळालेली साधने योग्यरित्या मान्य करा, सांधोधनात मांडणी करा आणि योग्य त्याठिकाणी त्याचा संदर्भ द्या.

८) पुराभिलेखागारातून प्राप्त कागदपत्रांचे डिजिटायझेशन करणे शक्य असल्यास तसा प्रयत्न करणे आणि मिळालेल्या साधनांचे अथवा साहित्याचे जतन करण्याचा विचार करा.

**अभिलेखीय संशोधनामध्ये हे समाविष्ट आहे:**

९) साधनांचे अथवा साहित्याचे विश्लेषण आणि अर्थ लावणे

१०) संशोधनाचे निष्कर्ष काढण्यासाठी आणि युक्तिवादांना समर्थन देण्यासाठी निष्कर्षांचे संश्लेषण करणे

**पुराभिलेखीय संशोधनाचे फायदे:**

पुराभिलेखीय संशोधनाचा समावेश करून, स्थानिक इतिहास लेखक अथवा संशोधक आपले संशोधन अधिक आकर्षक आणि अचूक कथा तयार करून स्थानिक भूतकाळ जिवंत करू शकतात.

१) पुराभिलेखीय साधने प्रत्यक्ष माहिती देतात. सत्यता आणि विश्वासार्हता जोडण्यास मदत होते.

२) पुराभिलेखीय साधने दुर्मिळ असतात हे साहित्य संशोधकस नवीन ज्ञान देतात.

३) ऐतिहासिक घटना आणि प्रक्रियांचे संदर्भ प्राप्त होतात.

४) विद्यमान ज्ञान आणि आव्हानात्मक गृहितकांची पडताळणी करणे शक्य होते.

५) ऐतिहासिक घटनांना सखोल संदर्भ देता येतात, घटनांची योग्य प्रमाणात पुष्टी करता येते आणि त्या घटनेला सखोल व विस्तृत मांडणे शक्य होते.

६) एखाद्या स्थानिक घटनेला नवीन दृष्टी आणि दृष्टीकोन प्रकट करता येवू शकतो.

७) स्थानिक ऐतिहासिक घटना आणि प्रक्रियांची पुनर्रचना करता येते.

८) विशिष्ट जाती समुदायाची सर्जशीलता आणि सामाजिक संरचना समजून घेण्यास मदत होते.

९) स्थानिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटकांचे विश्लेषण करण्यास मदत होते.

१०) सामाजिक प्रतिबद्धता आणि स्वारस्य वाढविण्यास मदत होते.

११) स्थानिक ओळख आणि संस्कृतीच्या सखोल आकलनात योगदान देते येते.

**पुराभिलेखीय संशोधनातील आव्हाने:**

१) विविध पुराभिलेखागारातील संबंधित संग्रह आणि साहित्याचा शोध घेणे हे वेळ खावू आणि खर्चिक बाब आहे.

२) पुराभिलेखागारात प्रवेश मिळवणे आणि तिथे असलेल्या नियमांचे पालन करून तेथील माहिती किंवा दस्तऐवजापर्यंत पोहचणे.

३) पुराभिलेखागारातील नाजूक किंवा संवेदनशील साहित्य हाताळणे.

४) पुराभिलेखागारातील कागदपत्रातील कालबाह्य भाषा, शब्दावली किंवा स्वरूपांचा उलगडा करणे.

५) पुराभिलेखागारातील साधने अथवा सामग्री ही मोठ्या प्रमाणात असते प्राप्त माहिती ही विपुल प्रमाणात असेल तर त्या साधनांचे व्यवस्थापन करणे फार जिकिरीचे असते.

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) ब्रिटिशांनी कोणत्या ठिकाणी सन १८१८ मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची स्थापना केली.

अ) मद्रास ब) मुंबई क) दिल्ली ड) कलकत्ता

२) दिल्ली राष्ट्रीय पुराभिलेखागाराची स्थापना प्रथम कोठे झाली होती.

अ) मद्रास ब) मुंबई क) दिल्ली ड) कलकत्ता

३) मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना केंव्हा झाली.

अ) १८२१ ब) १८२२ क) १८२३ ड) १८२४

४) घडणी म्हणजे काय

अ) आर्थिक व्यवहाराचे दप्तर ब) प्रांताच्या हिशेबाचे कागद

क) रोजच्या खर्चाच्या नोंदी ड) यापैकी नाही

५) भारतातील सर्वात मोठे पुराभिलेखागार कोठे आहे.

अ) बिकानेर ब) मुंबई क) दिल्ली ड) कलकत्ता

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस' कोणत्या ठिकाणी स्थापन करण्यात आले.

२) पुणे पुराभिलेखागार कोणत्या नावाने परिचित आहे.

३) कोहापूर पुराभिलेखागाराची स्थापना केंव्हा झाली.

४) प्रांत अजमास म्हणजे काय.

५) भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना कोणी केली.

### ४.२.२ सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण: (Survey and Documentation)

ऐतिहासिक नोंदी आणि दस्तऐवजांच्या सर्वसमावेशक आकलनासाठी सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण हे अभिलेखीय संशोधनातील मूलभूत आणि पायाभूत पायरी आहे. या प्रक्रियांमध्ये संग्रहित साहित्याबद्दल माहितीचे पद्धतशीर संकलन, संग्रहण आणि जतन करणे, संशोधकांना भूतकाळाचा उलगडा, विश्लेषण आणि

अर्थ लावणे यांचा समावेश होतो. सर्वेक्षणासाठी सूक्ष्म नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि तपशीलाकडे लक्ष देणे आवश्यक असते. कारण ते संपूर्ण संशोधन प्रकल्पासाठीचा पाया भक्कम करण्यास मदत करते.

**१) सर्वेक्षण पद्धतीची संकल्पना:**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखनाचे महत्वाचे माध्यम म्हणून सर्वेक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वेक्षण म्हणजेच चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण, अथवा एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधीची चिकित्सक पाहणी करणे व तत्संबंधी सर्व त-हेची विस्तृत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण अशी सर्व साधारण व्याख्या केली जाते. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जावू शकतो. उदा. प्राचीन, मध्ययुगीन शिल्पस्थापत्य, शिलालेख, पुरातत्वीय स्थळे, मंदिरे इत्यादीसंबंधीच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरावी लागते. सर्वेक्षण पद्धतीनुसार प्राप्त अवशेषांची सविस्तर माहिती नोंदवून त्या अवशेषांची व्याप्ती, भौगोलिक विस्तार, सीमा लक्षात घ्यावी लागते. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी स्थानिक किंवा समकालीन इतिहास लेखनासाठी सर्वेक्षण पद्धती उपयोगी ठरते. सर्वेक्षण पद्धतीला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणून उल्लेख देखील ओळखले जाते. एका विशिष्ट भू-भागावर अथवा भौगोलिक ठिकाणी राहणाऱ्या विशिष्ट व्यक्तीसमूह अथवा जाती, धर्म, पंथ समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची विस्तृत माहिती सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातून प्राप्त करू शकतो. सामाजिक सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते. सर्वेक्षणातून माहिती संकलित करून विश्लेषण केल्यानंतर विशिष्ट निवडलेली समस्या अथवा प्रश्नासंबंधी निश्चित स्वरूपाची मांडणी करता येते.

**२) सर्वेक्षण पद्धतीची पार्श्वभूमी:**

सर्वेक्षण पद्धती प्राचीन कालखंडापासून वापरत असल्याच्या नोंदी मिळतात. इ. स. पू. ३०० मध्ये हिरोडोटसने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता. ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये काही सामाजिक प्रश्नांसाठी पाहणी हाती घेतल्याची नोंद आहे. सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व वेल्समध्ये जॉन हॉवर्ड यांनी तुरुंगाची पाहणी करून केली. कैद्यांची स्थिती व त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ते स्वत: तुरुंगात कैद्यांसमवेत राहिले होते. अमेरिकेमधील जेकोब राईस यांने सन १८९० मध्ये झोपडपटीमधील लोकांचे आर्थिक जीवनमान पाहण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते. त्यानंतर सन १९०९ मध्ये पॉल केलांगने सर्वेक्षण केले, आधुनिक समाजावरील आधुनिकीकरणाचे व नागरीकरणाचे परिणाम हा त्यांचा अभ्यासविषय होता.

भारतामध्ये सामाजिक सर्वेक्षणाची सुरुवात प्राचीन कालापासून झाली असल्याचे विविध उल्लेख सापडतात. कौटिल्याकृत अर्थशास्त्रा आणि अकबराच्या 'ऐन-ई-अकबरी' मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजीने आर्थिक धोरण पाहणीवरून ठरविले होते. शेरशहाने जमिनी विषयक पाहणी करून आपले करविषयक धोरण निश्चित केलेले होते असे दिसते. मात्र, भारतासारखा प्रचंड आकाराचा देश, सर्वेक्षणासाठी होणारा प्रचंड खर्च, लोकांमध्ये संशोधनासंबंधीची

उदासीनता, बहुसंख्यांचे खेड्यातील वास्तव्य आणि भाषेची विविधता यामुळे अपेक्षित यश मिळू शकलेले नाही.

### ३) सर्वेक्षण पद्धतीची व्याप्ती:

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गाव, शहर, कुटुंब, कुल, जान, जमात, वर्ग, समूह अशा कोणत्याही घटक संबंधी अथवा लोकांची अगर संशोधन संबंधी प्रश्नाशी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करण्याचे सर्वेक्षण हा महत्वाचे माध्यम आहे. लोकांची सामाजिक परिस्थिती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यापुढील प्रश्न, त्यांच्यातील होत असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, दिशा व गती इत्यादी बाबींची तपशीलवार आणि विस्तृत माहिती सर्वेक्षणाने घेता येते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी विषयाशी निगडीत संशोधन स्थानिक किंवा समकालीन परिप्रेक्षातून करता येते. कोणत्याही भागातील समाजाच्या जीवनासंबंधी सविस्तर माहिती मिळतेच पण त्या समाज पुढचे प्रश्न समजतात व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी उपाय-योजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणाने शक्य होते.

### ४) सर्वेक्षणाचे प्रकार:

सर्वेक्षणाची उद्दिष्टे ज्याप्रकारे वेगवेगळी असतात त्याप्रमाणे माहिती प्राप्त करण्याचे मार्ग आणि पद्धती व तंत्रे यामध्येही विविधता आढळते. यावरून सर्वेक्षणाचे प्रकार पाडता येतात. सर्वसामान्य व विशिष्ट सर्वेक्षण, नियमित व नैमित्तिक सर्वेक्षण, प्रारंभिक व अंतिम सर्वेक्षण, वैश्विक व नमूना सर्वेक्षण इत्यादीचा यामध्ये समावेश होतो.

### ५) सर्वेक्षण आणि प्रश्नावली:

सर्वेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला जातो. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाला हवी असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करता येते. वृत्तपत्रामधील बातम्या, सरकारकडून जाहीर केली जाणारी माहिती, शासकीय योजना, राजकीय नेत्यांच्या मुलाखती, इ. माहिती सर्वेक्षणातून ताडून पाहता येते. एखाद्या घटनेबद्दल जनसामान्यांचे मत समजावून घ्यावयाचे असेल तर ही सर्वात चांगली पद्धत आहे. सर्व्हेक्षणासाठी वापरली जाणारी प्रश्नावली साधी सोपी व सुटसुटीत असावी. अशा प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध नसावेत व प्रश्नावली परिपूर्ण असावी. त्यामुळे मिळणारी माहिती परिपूर्ण व उपयुक्त मिळते.

### ६) सर्वेक्षण करताना कोणती खबरदारी घ्यावी:

सर्वेक्षण करताना काही मूलभूत स्वरूपाची खबरदारी संशोधकाने घेणे जरूरी असते. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो,

१) सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली जास्तीत जास्त अचूक आणि परिपूर्ण असावी.

२) संशोधकास जी माहिती हवी आहे त्याची मांडणी स्पष्ट शब्दात केलेली असावी.

३) संदिग्ध प्रश्न विचारू नयेत.

४) सर्वेक्षणामधील मुद्दे सोपे, स्पष्ट आणि सुटसुटीत असावेत.

५) सर्वेक्षणातून प्राप्त माहिती हा पूरावा असल्याने त्याच्या नोंदी घाईगडबडीने न करता त्या अचूक व निर्दोष करव्यात.

६) सर्वेक्षणामधून प्राप्त महितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे गरजेचे असते.

७) चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा दुसरा टप्पा असून प्राप्त माहिती विश्वासार्ह आहे का? नवीन माहिती मिळते का? अथवा नव्या पैलूवर प्रकाश पडतो का? या दृष्टीकोणातून विचार करणे गजेचे असते.

८) बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे असणे गजचे आहे.

**७) सर्वेक्षण करून संशोधक काय साध्य करू शकतो:**

१) सहभागी, निरीक्षणे किंवा मोजमापांमधून मूळ, थेट माहिती गोळा करू शकतो.

२) संशोधन आराखडा, संदर्भ आणि सहभागी यांची सखोल समज विकसित होते.

३) विद्यमान संशोधन, सिद्धांत किंवा गृहितके यांची पडताळणी करा.

४) न शोधलेले क्षेत्र किंवा वर्तमान ज्ञानातील अंतर शोधू शकतो.

५) सहभागी, समुदाय किंवा संस्थांसोबत विश्वास आणि संबंध निर्माण होण्यास मदत होते.

६) वर्तन, घटना किंवा प्रक्रियांचे थेट निरीक्षण करणे शक्य होते.

७) भौतिक नमुने, मोजमाप किंवा कलाकृती गोळा करण्यास मदत होते.

८) गृहीतके किंवा सिद्धांतांचे मूल्यमापन करणे शक्य होते.

९) विशिष्ट प्रकरणे किंवा घटनांच्या सखोल, तपशीलवार परीक्षांची तयारी होते.

१०) संशोधन पद्धतींमध्ये कठोरता, पारदर्शकता आणि जबाबदारी दाखवता येते.

११) संशोधन प्रक्रियेत समुदाय, संस्था किंवा भागधारकांसह सहभाग वाढवणे शक्य होते.

१२) लपविलेले किंवा कमी ज्ञात स्रोत प्राप्त करू शकतो.

१३) भविष्यातील संशोधकांसाठी संदर्भ निर्माण करू शकतो.

थोडक्यात, सर्वेक्षणाद्वारे संशोधक समृद्ध, सूक्ष्म माहिती व विषयासंबंधी अंतर्दृष्टी निमण करू शकतो आणि त्यांच्या संशोधन विषय सखोलपणे समजून घेण्यास मदत होते. सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण हे अभिलेखीय संशोधनाचा मूलभूत आरखडा व संशोधन रचना तयार करण्यास मदत होते.

**८) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा:**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे सर्वेक्षण हे प्रभावी साधन असले तरी त्याच्या काही मर्यादा अथवा उणिवा आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे.

१) सरकारी, निमसरकारी, व्यावसायिक आणि वैयक्तीक पातळीवर केले जाते.

२) संशोधकाने संशोधनासाठी इतरांनी सर्वेक्षण करून गोळा केलेल्या माहितीवर आधारीत स्वत:चे निष्कर्ष काढवयाचे असतील तर, कोणाचे सर्वेक्षण निश्चित करायचे आणि त्याचे निष्कर्ष कसे घ्यायचे हे जिकरीचे आहे.

३) संशोधक ज्या तंत्र पद्धतीचा उपयोग करीत आहे याचा संशोधकाने विचार केला पाहिजे.

४) मुळात सर्वेक्षण ही खर्चीक बाब आहे. याला वेळ आणि पैसा अधिक लागतो.

५) सर्वेक्षणातून मिळालेली तथ्ये एकसारखी असतीलच असे नाही.

६) मिळालेल्या तथ्य संकलनाची विश्वसनीयता सांगता येत नाही.

७) विशिष्ठ लोकसमुदायचा एका विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास करणे कठीण असते, कारण यासाठी निवडलेले नमुने एकसारखे, समान आणि खात्रीशीर माहिती प्रदान करतील याची शक्यता नसते.

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) आधुनिक पद्धतीच्या सर्वेक्षणाची सुरवात कोणत्या देशात झाली.

अ) इंग्लंड ब) अमेरिका ब) भारत ड) फ्रान्स

२) मध्ययुगीन भारतामध्ये सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा वापर कोणी केला.

अ) बाबर ब) अकबर क) औरंगजेब ड) छत्रपती शिवाजी महाराज

३) सर्वेक्षणाच्या माध्यमातून संशोधकास काय करणे शक्य होते.

अ) गृहीतके किंवा सिद्धांतांचे मूल्यमापन ब) भौतिक नमुने

क) घटनांचे सखोल व तपशीलवार परीक्षण ड) वरील सर्व

४) सर्वेक्षणातून मिळालेल्या तथ्य संकलनाची ............ सांगता येत नाही.

अ) विश्वसनीयता ब) खात्री क) सत्यता ड) वरील सर्व

५) सर्वेक्षणाचे ............ प्रकार पाडता येतात.

अ) सर्वसामान्य व विशिष्ट सर्वेक्षण ब) नियमित व नैमित्तिक सर्वेक्षण

क) प्रारंभिक व अंतिम सर्वेक्षण ड) वैश्विक व नमूना सर्वेक्षण

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) प्राचीन काळात सर्वेक्षण पद्धतीचा वापर कोणी केल्याचा संदर्भ मिळतो.

२) अमेरिकेमध्ये सर्वेक्षणाची सुरवात कोणी केली.

३) स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे कोणते प्रभावी साधन आहे.

४) सर्वेक्षणाच्या माध्यमातून भविष्यकालीन संशोधांनासाठी काय तयार होते.

५) सर्वेक्षणाचे किती प्रकार आहेत.

### ४.२.३ मुलखात (Oral Interview)

मुलाखत हे इतिहासकार, संशोधक आणि कथाकारांसाठी एक मौल्यवान साधन आहे, जे ऐतिहासिक घटनांमधून जगलेल्या व्यक्तींच्या आवाज आणि अनुभवांद्वारे भूतकाळातील एक अद्वितीय खिडकी खुली करतो. म्हणून मुलाखतीस 'लपविलेल्या इतिहासाचे अनावरण' असे म्हणतात. मुलाखत ही तथ्य संकलनाची अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा (दाता) यात प्रत्यक्ष समोरासमोरचा संवाद प्रस्थापित होतो. मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते. स्थानिक व समकालीन इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून मुलाखतीला विशेष महत्त्व आहे. सामाजिकशास्त्र संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखत पद्धतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्तीचा विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधकाला कोणती माहिती प्राप्त करवयाची आहे, मुलाखत कोणाची घ्यावयाची आहे, मुलाखतीचे स्वरूप कोणते असावे, किती लोकांच्या मुलाखती घेणे अपेक्षित आहे, याचा संशोधकाने विचार करणे गरजेचे असते.

**१) मुलाखतीची उद्दिष्टे:**

१) मुलाखतीचा प्रमुख उद्देश आहे की संशोधक प्रत्यक्ष मुलाखतदात्याच्या प्रत्यक्ष संपर्कातून माहिती प्राप्त करतो. मुलाखतीतून व्यक्तीच्या मनात काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. मुलाखत मुलाखतदात्याच्या भावना, आंतरिक गोष्टी इत्यादीचे तो आकलन करणे हे असते.

२) संशोधकाने तयार केलेल्या गृहीतकांच्या पडताळणीचा प्रमुख स्रोत साधन आहे. व्यक्तिगत व सामुदायिक मुलाखतींच्या माध्यमातून संशोधक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाबद्दलचे अनुभव, विचार, प्रतिक्रिया, सामाजिक जाणिवा इत्यादींच्या संदर्भातील गृहीतके तपासू शकतो.

३) संशोधकाचा मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संबंध होत असल्याने प्रश्नांची उत्तरे देताना मुलाखतदात्याने व्यक्त केलेले हावभाव, वातावरण, आवाजातील चढउतार, चेहऱ्यावरील हावभाव, देहबोली इत्यादींचे निरीक्षण करता येते.

४) संशोधक मुलाखतीच्या माध्यमातून संशोधनास पूरक व गुणात्मक ज्ञान प्राप्त करू शकतो.

५) मुलाखत ही प्रायोगिक अथवा समस्यायुक्त संशोधनासाठी उपयुक्त आहे. एखाद्या विशिष्ट गंभीर सामाजिक समस्येच्या कारणाच्या तपशिलासाठी समूह अथवा व्यक्तींच्या मुलाखतींचा वापर करू शकतो.

२) **मुलाखत तंत्राची व्याख्या :**

एखाद्या प्रश्नाबाबत माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने सहाकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. अशी सर्व साधारण व्याख्या केली जात असली तरी समाजशास्त्रीय संशोधनातील माहिती संकलनाचे एक महत्वपूर्ण तंत्र असलेल्या या पद्धतीची अनेक संशोधकांनी/विचारवंतांनी व्याख्या केली आहे. त्यापैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **पॉलिन यंग:**

''मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शरित असतो.''

२) **हॅडर आणि लिंडमन:**

''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो'' .

वरील व्याख्यांवरुन मुलाखत म्हणजे संशोधक स्वत: निवेदकांना भेटून संशोधना विषयाशी संबंधित प्रश्न विचारतो व माहिती संकलीत करतो. मुलाखत हे माहिती संकलनाचे सोपे तंत्र आहे.

३) **मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये :**

ब्लॅक आणि चँपीयन यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१) संशोधक व निवेदक (मुलाखत दाता) यांच्यात प्रत्यक्ष संवाद असतो.

२) संशोधक प्रत्यक्ष प्रश्न निवेदकाला विचारुन माहिती घेतो यातून संवाद होतो.

३) संशोधक व निवेदकाचे संबंध तात्पुरते असतात.

४) संशोधकाने प्रत्यक्ष संवाद साधल्याने संशोधांन विषयाची सखोल माहिती प्राप्त होते.

५) तथ्यांचे सुव्यवस्थित संकलन प्राप्त होते.

६) अनावश्यक माहिती टाळता येते.

७) मुलाखतीचा मुख्य हेतू विश्वसनीय माहितीचे संकलन करणे हा असतो.

४) **मुलाखत तंत्राचे वर्गीकरण:**

मुलाखत तंत्राचा व्यापक उपयोग आणि वापर लक्षात घेता सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये विविध समाजशास्त्रज्ञांनी मुलाखतीचे खालील प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

**अ) लुंडबर्ग:** लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे तीन प्रकार सांगितलेले आहे, यामध्ये १) वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे, २) अभिवृत्ती निर्धारण व मापन करणे आणि ३) सामाजिक संघटन व संस्थांची माहिती करुन घेणारी इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**ब) पी. व्ही. यंग:** पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे चार प्रकार सांगीतलेले आहेत, यामध्ये १) संस्था सर्व्हेक्षण, २) निरीक्षण, ३) मूल्यांकन आणि ४) दस्तऐवज इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**५) मुलाखत तंत्राचे प्रकार:**

**अ) संरचित किंवा आकारीक मुलाखत :**

संरचित मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जात असल्याने संशोधकाचे काम सोपे होते. प्रश्नांची यादी अगोदरच तयार केल्याने मुलाखतदात्याला प्रश्नांच्या बाहेर जाता येत नाही, म्हणून मुलाखतीला संरचित किंवा आकारीक मुलाखत असे म्हणतात. यामध्ये प्रश्नाबरोबर संभाव्य उत्तरेही त्यांना दिली जातात. प्रश्न व उत्तरांची यादी छापून घेतलेली असते. संशोधक मुलाखतदात्याला प्रश्न विचारून पर्यायी उत्तरापैकी कोणते उत्तर निवेदकास द्यावयाचे आहे ते विचारतो व उत्तराबरोबर बरोबरची खूण करतो. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी संशोधक सहमत होत नसेल तर मुलाखतदात्याच्या उत्तराशी अधिकाधिक साम्य असणाऱ्या उत्तरासमोर तो वरील प्रमाणे खूण करतो. जर निवेदकास संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास ते उत्तर मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो.

**ब) असंरचि किंवा मुक्त मुलाखत:**

मुक्त मुलाखतीमध्ये संशोधक मुलाखतदात्यासमोर मुलाखतीचा विषय मांडतो. मुलाखतीमधील त्याचा हेतू स्पष्ट करून मुलाखतदात्याला मुक्तपणाने आपली मते मांडण्याची परवानगी देतो. संशोधकाने विषयाचा अभ्यास केला असल्याने कोणते प्रश्न विचारावयाचे याचा त्याने विचार केलेला असतो. संशोधक कोणताही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. प्रश्न व उत्तरे दोन्हीही पूर्वनियोजित नसल्यामुळे मुलाखतीचे स्वरूप अनिश्चित असते. मुलाखतदात्याला व काही प्रमाणात संशोधकाला मुक्त स्वातंत्र्य असते हे या मुलाखतीचे वैशिष्टय असते. मुलाखतीमध्ये मुलाखतदाता आणि संशोधक यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याने मुलाखतीमध्ये लवचिकता येते. मुलाखतदाता आपली मते स्पष्टपणे व स्वत:च्या शब्दात मांडू शकतो. संशोधकाकडे अधिक कौशल्य लागते.

**क) केंद्रित मुलाखत:**

केंद्रीत मुलाखत हा अनिर्देशित अथवा मुक्तमुलाखती प्रकार आहे. यामध्ये संशोधक मुलाखतदात्याच्या विशिष्ट अनुभवावर व त्याच्यावर झालेल्या परिणामावर आपले लक्ष केंद्रित करतो. अशा प्रकारच्या मुलाखती रेडिओ, टी.व्ही, चित्रपटामध्ये होतो.

**ड) पुनरावृत्ती किंवा फेरमुलाखत:**

एखाद्या घटनेबाबत व्यक्तीची मते कायमचीच राहतात असे नाही. त्या घटनेबाबतचा त्याचा दृष्टीकोनात अथवा विचार बदलत राहतात. अशा प्रकारच्या मुलाखती एखाद्या सामाजिक, मानसशास्त्रीय, आर्थिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत लोकांचे दृष्टीकोनात कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी होतो.

### इ) निदानोपचारात्मक मुलाखत:

निदानोपचारात्मक मुलाखतीत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो. केंद्रित मुलाखतीप्रमाणेच यामध्ये विशिष्ट वर्तनाचा अथवा अनुभवाच्या प्रेरणा कोणत्या आहेत जाणून घेण्यासाठी होतो. मुलाखतीची पूर्व तयारी असते. मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे व कोणत्या क्रमाने हे संशोधक ठरवत असतो.

वरील मुलाखत प्रकाराशिवाय औपचारिक, अनौपचारिक, व्यक्तीगत, सामूहिक, गुणात्मक, परिणामात्मक, उपचारात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार मुलाखतीचे आहेत.

### ६) मुलाखतीची पूर्व तयारी:

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी, मुलाखत देणाऱ्याला, विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याच्या मनात, स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखतीदरम्यान अथवा नंतर, मुलाखतीची टिपणे काढून, ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून, त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो. मुलाखत घेणे हे एक तंत्र असून ते कौशल्याने हाताळावे लागते. मुलाखत घेताना जर चूक झाली तर मुलाखतीचा हेतू साध्य होत नाही. मुलाखतीमधून हवी असणारी माहिती प्राप्त न झाल्याने संशोधक निराश अथवा हताश होवू शकतो. मुलाखतीची पूर्वतयारी करणे आवश्यक असते. मुलाखतीची पूर्वतयारी करताना पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.

१. प्रथम मुलाखतदात्याची सर्व इत्यंभूत माहिती घेणे गरजेचे असते. यामध्ये नाव, टोपण नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक व राजकीय दर्जा, सांस्कृतिक पातळी इत्यादीचा समावेश होतो. वरील माहिती वरुन त्या व्यक्तीची माहिती पुरविण्याची बौद्धिक क्षमता याचा अंदाज येतो.

२. मुलाखत घेणारा व देणारा यांच्यामध्ये संवाद निर्माण झाला तरच मुलाखत यशस्वी होवू शकते, अन्यथा अपेक्षित माहिती प्राप्त होत नाही.

३. मुलाखतददात्याची मानसिकता, आवड-निवड, मते, विचार पद्धती याची माहिती जमा केल्यास संशोधकाला हवी ती माहिती प्राप्त करता येते, संवादामध्ये अडथळा येत नये.

४. संशोधकाने मुलाखतददात्याला स्वत:ची ओळख व मुलाखतीचा स्पष्ट हेतू सांगितला पाहिजे, त्यामुळे संशोधनाविषयी कोणतीही शंका न राहता संवाद मोकळेपणाने होतो.

**७) मुलाखत देणारी व्यक्ती**

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, जवळच्या व्यक्ती, परिवारातील व्यक्ती, व्यवसायिक सहकारी आणि विरोधक इत्यादींच्या मुलाखती घेणे गरजेचे असते. संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तीशी थेट संबंध नसलेले, मात्र त्यांच्या संबंधीची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे महत्वाचे ठरते. चरित्रनायकाचे सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

**८) मुलाखतीमधील प्रश्न**

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. असे प्रश्न विचारल्यास मुलाखतदात्याचा गोंधळ उडत नाही. मुलाखतदात्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

**९) मुलाखतीमधील प्रश्नांचे स्वरूप:**

मुलाखतदात्याला आपला विषय कथन केलल्यानंतर संबंधीत विषयावर बोलण्याची मुभा दिली जाते. संशोधकाला आवश्यकता वाटल्यास मुलाखतदात्याला काही प्रश्न विचारावे लागतात. योग्य उत्तरे प्राप्त करण्यासाठी खबरदारीने प्रश्न तयार करावे लागतात. प्रश्न सरळ, नि:संदिग्ध, मुद्देसुद व सुटसुटीत असल्यास उत्तरे देताना मुलाखतदात्याचा गोंधळ होणार नाही. प्रश्न मुद्देसूद असले की उत्तरेही मुद्देसूद मिळतात.

**१०) मुलाखत ध्वनिफितींचे जतन आणि वापर:**

संशोधक विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करून मुलाखतींची नोंद करू शकतो. यामध्ये ध्वनिफिती, लोहचुंबकीय फिती (Ferromagnetic tape), वायर रेकॉर्डिंग, ध्वनिदृश्यफिती (Audiovisual tape) आणि संगणकाचा इत्यादिवचा समावेश होतो, याशिवाय इतही आधुनिक साधने आहेत. वरील सर्व उपकरणांमधील माहिती गुणात्मक पद्धतीची असल्याने महत्त्वाची असते. याचा वारंवार वापर करताना त्यातील तथ्ये खराब अथवा नष्ट होण्याचा ठोका असतो. एकाचवेळी अनेकांना त्याचा वापर करता येत नाही. त्यासाठी संगणकाचा वापर करून मुलाखती संकेतस्थळांवर उपलब्ध ठेवल्या जातात. याशिवाय इतर फितींचे जतन करण्याच्या पद्धती भिन्न आहेत. यासाठी आवश्यक हवामान व तापमानामध्ये त्या ठेवाव्या लागतात. या ध्वनीफिती विविध वस्तुसंग्रहालये, ग्रंथालये, अभिलेखागार, ध्वनिमुद्रण ग्रंथालये इत्यादिमध्ये जतन करतात. यामध्ये विविध लोकसाहित्य, लोकगीते व दुर्मिळ गाणी आणि मुलाखातींचा समावेश आहे.

**११) मुलाखतीमधील कायदेशीर बाबी:**

एखाद्या व्यक्तीचा जीवनवृत्तांत, आठवणी यांच्या मुलाखतींचा वापर करण्यास पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असावे. गोपनीयतेच्या संदर्भात मुलाखत देणाऱ्याची व ज्या संशोधकाने अथवा संस्थेने तो प्रकल्प पूर्ण केला असेल त्यांची परवानगी आवश्यक असते. एखाद्या व्यक्तीचा जीवनवृत्तांत आणि आठवणींचा संशोधनात वापर करताना जे विश्लेषण करून अन्वयार्थ काढला जातो, अशावेळी संबंधीची परवानगी काढून तो प्रकाशित करणे आवश्यक असते. कायदेशीर बाबींची पूर्तता केलेल्या मुलाखतीं प्रतिलेखन करून प्रकाशित करता येतात. प्रकाशनाचे अधिकार कोणाकडे असावेत इत्यादी प्रश्नांची कायद्यांतर्गत पूर्तता केल्यानंतर प्रकाशन करणे हिताचे असते.

**१२) मुलाखतीमधील नैतिकता:**

संशोधकाने मुलाखतीमधील गोपनीय माहिती प्रकाशित करण्याचे हक्क, अधिकार यासंबंधी मुलाखतीपूर्व नैतिकतेसंबंधी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. ऐतिहासिक घटनेसंबंधी काही महत्त्वाचा तपशील एखाद्या प्रशासनामधील उच्च अधिकारी देत असेल तर त्याची ध्वनिफितींवर नोंद होते. त्याचे प्रतिलेखन केल्यानंतर ती पुन्हा मुलाखत देणाऱ्यास दाखविणे बंधनकारक असते. पूर्वपरवानगीशिवाय असे प्रतिलेखन संशोधकास प्रकाशित करता येत नाही. थोडक्यात मुलाखतदात्याची माहिती प्रकाशित करणे अथवा संशोधनासाठी त्याचा वापर करण्यापूर्वी पूर्वपरवानगी आवश्यक असते.

**१३) मुलाखतीचा उपयोग आणि मर्यादा:**

सामाजिक शास्त्र अथवा स्थानिक/समकालीन इतिहासलेखनामध्ये तथ्य संकलनाचे प्रभावी साधन म्हणून मुलाखत सर्वमान्य आहे. मुलाखत तंत्र हे मुलाखतदात्याकडून अभ्यासविषय अथवा समस्येविषयीची माहिती संकलित करण्याचे प्रत्यक्ष तंत्र आहे. आज सामाजिक संशोधनात मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, त्याची ज्या प्रकारे उपयुक्ततात आहे त्याप्रमाणे त्याच्या काही उणिवादेखील आहेत.

**अ) मुलाखत तंत्राच उपयोग:**

१) संशोधक व मुलाखतदाता यांच्यातील सुसंवाद हा पारंपारिक व प्रेरणात्मक स्वरुपाचा असल्याने मुलखातीमधून मिळणारी माहिती यथार्थ व व्यापक स्वरुपाची असते.

२) मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद होत असल्याने सखोल संशोधनासंबंधी सखोल माहिती मिळते.

३) संशोधनासंबंधी असलेले प्रश्न ताठर स्वरुपाचे नसतात. त्यात लवचिकता असल्याने माहिती घेणे सोपे जाते.

४) समोरा समोर प्रश्न विचारत असताना मुलाखतदात्याच्या भावना जाणून घेता येतात.

५) माहितीची विश्वसनियता राहते.

६) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये औपचारिक संबंध असले तरी बोलण्याच्या ओघात संशोधकाला इतर पूरक माहिती प्राप्त होते.

७) मुलाखतदात्या कडून प्राप्त माहिती संशोधक पडताळणी करू शकतो.

८) मुलाखतीमुळे पूर्वग्रह कमी होण्यास मदत होते.

**ब) मुलाखत तंत्राच्या मर्यादा:**

संशोधनासाठी मुलाखतीचे अनेक उपयोग असले तरी काही मर्यादासुद्धा आहेत, येतात त्या पुढीलप्रमाणे.

१) मुलाखत हे खचिर्क आणि वेळखावू स्वरुपाची पद्धती आहे.

२) पूर्वगृहयुक्त प्रतिक्रिया मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) मर्यादित क्षेत्रात तथ्य संकलन होते, संशोधकाला सहकार्य मिळवण्यात अडचणी येतात.

४) संशोधकाकडे प्रचंड सहनशीलता असणे आवश्यक असते.

५) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यातील आंतरक्रिया पूर्णपणे परस्पर विश्वासावर आवलंबून असते.

६. मुलाखत घेण्याचे वैयक्तीक कौशल्य सर्वांनीच आत्मसात केलेले असते असे नाही.

वरील मर्यादा गृहीत धरल्या तरी सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखत तंत्राचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. एक विश्वसनिय तंत्र म्हणून याकडे पाहिले जाते.

**१४) मुलाखतीच्या माध्यमातून संशोधक काय साध्य करू शकतो:**

१) एखादी ऐतिहासिक घटना अथवा सांस्कृतिक पद्धतींची प्रत्यक्ष माहिती प्राप्त करू शकतो.

२) ऐतिहासिक कथांचे मानवीकरण करणाऱ्या वैयक्तिक कथा आणि किस्से गोळा जमा करू शकतो.

३) एखादी व्यक्ती अथवा विशिष्ट समुदायाच्या आठवणी आणि अनुभव जतन प्राप्त करून त्याचे जतन करू शकतो.

४) अभिलेखीय साधने अथवा स्रोतांमधील अंतर भरून काढू शकतो.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

रिकाम्या जागा भरा.

१) कोणाशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते.

अ) मुलाखतदाता ब) मुलाखतकर्ता क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

२) कोणत्या संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो.

अ) सामाजिकशास्त्र ब) वाणिज्यशास्त्र क) विज्ञानशास्त्र ड) यापैकी नाही

३) मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शरित असतो' ही व्याख्या ........ ची आहे.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर क) लिंडमन ड) ब्लॅक

४) ''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो'' ही व्याख्या ............. ची आहे.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर आणि लिंडमन

क) ब्लॅक आणि चँपीयन ड) यापैकी नाही

५) ................ यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर आणि लिंडमन

क) ब्लॅक आणि चँपीयन ड) यापैकी नाही

६) मुलाखत तंत्रामध्ये संशोधक व निवेदकाचे संबंध ........ असतात.

अ) तात्पुरते ब) कायम क) नेहमी ड) यापैकी नाही

७) लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे .............. प्रकार सांगितलेले आहे.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

८) पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे ............. प्रकार सांगीतलेले आहेत.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

९) .............. मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जातात.

अ) संरचित ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

१०) ........... मुलाखत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो.

अ) निदानोपचारात्मक ब) फेरमुलाखत क) केंद्रीत मुलाखत ड) वरील सर्व

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.
- अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)
- सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.
- मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.
- मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.
- सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.
- पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख
- पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र
- ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

● भौतिक साधने : पुरतत्वीय अवशेष

## ४.४ स्वय–अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) ड) कलकत्ता   २) ड) कलकत्ता   ३) अ) १८२१

४) अ) आर्थिक व्यवहाराचे दप्तर   ५) अ) बिकानेर

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) कलकत्ता   २) एलिनेशन ऑफिस ३) १ मार्च १९४९

४) प्रांताच्या हिशेबाचे कागद   ५) वि. का. राजवाडे

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) अ) इंग्लंड   २) ब) अकबर   ३) ड) वरील सर्व   ४) ड) वरील सर्व

५) ड) वरील सर्व

ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) हिरोडोटस   २) जेकोब राईस   ३) सर्वेक्षण   ४) संदर्भ

५) चार

**स्वय–अध्ययन प्रश्न क्र. ३**

अ) रिकाम्या जागा भरा.

१) मुलाखदाता   २) सामाजिकशास्त्र   ३) पॉलिन यंग   ४) हॅडर आणि लिंडमन

५) ब्लॅक आणि चँपीयन   ६) तात्पुरते   ७) तीन   ८) चार

९) संरचित   १०) निदानोपचारात्मक

## ४.५ सारांश

इतिहासलेखन प्रक्रियेत ‘No Documents No History’ हे प्रा. लॉजीलॉस व प्रा. सिईनबॉस यांचे विधान यथार्थ आहे. इतिहास हा संदर्भसाधनांच्या आधारे लिहिला जातो. तसे न केल्यास त्यास इतिहास ही संज्ञा प्राप्त होत नाही. इतिहासलेखन जास्तीत जास्त वास्तव, वस्तूनिष्ठ व सत्य लिहिण्यासाठी साधनाची नितांत आवश्यकता असते. इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये लिखित अलिखित, पुरातत्वीय मौखिक साधनाचा आधार घेतला जातो. लिखित साधनाच्यामध्ये प्राथमिक संदर्भ साधनाना अधिक महत्व असते. प्राथमिक संदर्भ साधनामधील पोकळी भरून काढण्याचे काम दुय्यम संदर्भ साधने करतात. लिखित संदर्भ साधन ज्या

प्रसंगी मिळत नाहीत खास करून प्राचीन कालखंडाचा अभ्यास करताना संशोधकास भौतिक संदर्भ साधनाचा म्हणजे पुरातत्वीय साधनाचा आधार घ्यावा लागतो. पुरातत्वीय साधने जरी बोलकी नसली किंवा त्यामधून प्रत्यक्षदर्शी पुरावा पटकन ती समोर येत नसला तरी त्या साधनांना बोलते करण्याचे काम संशोधक करतो. त्यामुळे ही साधनेही महत्वाची आहेत. लिखित अथवा पुरातत्वीय संदर्भ साधनांच्या पलिकडे जावून काही ऐतिहासिक घटना किंवा तथ्य आपणास मौखिक साधननाच्यामधून ही मिळतात. पिढ्यान पिढ्या एकाकडून दुसऱ्याकडे आलेले मौखिक साहित्य अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यास मदत करते. इतिहासलेखनामध्ये साधने खूप महत्वाची असतात. मग ती कोणत्याही स्वरूपातील असोत. संदर्भ साधनांचे महत्व स्पष्ट करताना थ्युसिडीज हा इतिहासकार असे म्हणतो की, ''ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, ततोतंत वर्णन करणे महत्वाचे असते. त्यासाठी योग्य साधने जमविणे आवश्यक असते की, ज्या पासुन भविष्यकाळात मानवाला काही बोध व धडा मिळू शकेल.''

थोडक्यात अभिलेखीय संशोधन, सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण आणि मुलाखत या तीन घटकांचा सारांश खालीलप्रमाणे करता येईल: अभिलेखीय संशोधन; भूतकाळातील घटना, संदर्भ आणि संस्कृती समजून घेण्यासाठी ऐतिहासिक नोंदी, दस्तऐवज आणि कलाकृतींचे सखोल परीक्षण करण्याचे अत्यंत महत्वाची पायरी आहे. सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण: घटना, वर्तन किंवा वातावरणाचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी निरीक्षणे, टिपा आणि छायाचित्रांद्वारे माहितीचे पद्धतशीर संकलन आणि रेकॉर्डिंग होय. मुलाखत; वैयक्तिक अनुभव, दृष्टीकोन आणि अंतर्दृष्टी एकत्रित करण्यासाठी व्यक्ती किंवा गट अथवा समुदायाशी सखोल, अर्ध-संरचित किंवा संरचित संभाषणे. एकत्रितपणे, या पद्धती गुणात्मक साधने एकत्रित करण्यासाठी आणि विश्लेषण करण्यासाठी एक व्यापक दृष्टीकोन प्रदान करतात. सामाजिक विज्ञान, मानविकी आणि सांस्कृतिक अभ्यासांमध्ये जटिल समस्या, संदर्भ आणि अनुभवांची सूक्ष्म समज मिळविण्यासाठी वापरली जातात.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय:

अ) टिपा लिहा:

१) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

२) मुलाखत तंत्राची वैशिष्ठ्ये

३) असंरचित मुलाखत

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) स्थानिक इतिहास आणि पुराभिलेखीय कागदपत्रे सांगा

२) भारतातील प्रमुख राभिलेखागारांची माहिती द्या

३) इतिहासलेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण पद्धतीची माहिती द्या.

४) इतिहासलेखनाचे साधन म्हणून मुलाखत तंत्राची माहिती द्या.

## ४.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके:


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.


❑❑❑